पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

आतील पानात...

३ निळवंडेच्या ओव्हरफ्लोमुळे प्रवरा-गोदावरी नदिजोड प्रकल्पाला चालना

४ महिलेचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण

५ आढळगावचे अनिल ठवाळ यांची बीएसएनएल दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती



पान ८ वर..

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ | वर्ष : १३ | अंक : ३५४ | पाने ८ | किंमत २ रुपये | www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

# विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर; १२ मे रोजी मतदान

## उद्धव ठाकरे, नीलम गोऱ्हे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे यांच्यासह नऊ सदस्यांचा कार्यकाळ संपणार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

मुंबई : राज्यातील विधान परिषदेच्या ९ रिक्त होणाऱ्या जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला असून १२ मे २०२६ रोजी मतदान पार पडणार आहे. त्याच दिवशी सायंकाळी मतमोजणी होणार असून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया १३ मे २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

विधानसभेच्या सदस्यांद्वारे निवडून आलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे, नीलम दिवाकर गोऱ्हे, अमोल रामकृष्ण मिटकरी, शशिकांत जयवंतराव शिंदे यांच्यासह एकूण नऊ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे २०२६ रोजी संपुष्टात



येत आहे. त्यामुळे या जागांसाठी निवडणूक घेण्यात येत आहे.

या निवडणुकीची अधिकृत अधिसूचना २३ एप्रिल २०२६ रोजी जारी होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० एप्रिल, अर्जांची छाननी २ मे, तर अर्ज माघारीची अंतिम मुदत ४ मे निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर १२ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान, तर सायंकाळी ५ वाजता मतमोजणी केली जाणार आहे.

विधानसभेतील सध्याच्या संख्याबळानुसार या ९ जागांपैकी भाजपला ५, शिवसेनेला २, राष्ट्रवादी काँग्रेसला १ आणि महाविकास आघाडीला १ जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे महायुतीला स्पष्ट आघाडी असल्याचे दिसत आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसकडे अतिरिक्त १३ मते असल्याने, महायुतीने आणखी उमेदवार दिल्यास निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

राजकीय समीकरणे आणि अतिरिक्त मतांचे गणित पाहता बिनविरोध निवडीची शक्यता कमी मानली जात आहे. पक्षांकडून अतिरिक्त उमेदवार दिले गेल्यास मतदान अटळ ठरणार आहे.

या निवडणुकीत संजय केणेकर, नीलम गोऱ्हे, उद्धव ठाकरे, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, रणजितसिंह मोहिते-पाटील, राजेश राठोड आणि शशिकांत शिंदे यांचा कार्यकाळ संपणार आहे.

या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असून पुढील काही दिवसांत उमेदवारांच्या नावांवर अंतिम शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

# आंब्याने खाल्ला भाव; हापूस ८०० ते १५०० रुपये डझन

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : अक्षय्य तृतीयेला आंबा खाण्याची आणि देवाला नैवेद्य दाखवण्याची जुनी परंपरा आहे. मात्र, यंदा ही परंपरा खिशाला कात्री लावणारी ठरणार आहे. आवक कमी आणि मागणी जास्त असल्याने अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर आंब्याचे दर २० ते ४० टक्क्यांनी वाढले आहे. प्रथमच आतापर्यंतच्या इतिहासात हे पहिल्यांदा घडले आहे. यंदाच्या अक्षय्य तृतीयेला आंबा महाग झाला आहे. सध्या ८०० ते १५०० रुपये डझन या दराने हापूस आंब्यांची विक्री होत आहे. अक्षय्य तृतीयेमुळे घाऊक बाजारात कच्च्या आंब्याची आवक होत आहे. मात्र तयार आंब्याचे प्रमाण कमी असल्याने अक्षय्य तृतीयेला आंब्यांनी भाव खाल्ला आहे.

मार्केटयार्ड गुलटेकडी घाऊक फळ बाजारात दर वर्षी अक्षय्य तृतीयेच्या पार्श्वभूमीवर आंब्याची



मोठ्या प्रमाणावर आवक होते. त्यामुळे दर कमी होतात. मात्र, यंदा कोकणातील हापूस आंब्यांवर वातावरणातील बदलांचा परिणाम झाला आहे. यामुळे उत्पादन कमी झाले असून, दर वर्षीच्या तुलनेत यंदा ३० ते ५० टक्क्यांनी आवक कमी झाल्याने आंब्याचे भाव वाढले असल्याचे व्यापा-यांनी सांगितले.

घाऊक बाजारात सध्या पाच ते सात डझन (कच्च्या) आंब्यांचे दर तीन हजार ते सहा हजार आहेत, तर तयार आंबा पाच ते सात डझन आंब्यांची पेटी ३ हजार ५०० ते ६ हजार ५०० रुपये या दराने विक्री होत आहे.

## संक्षिप्त

### 'कैसे हराया' फेम सहर शेख अन् वडील दोघेही गायब

**जनप्रवास । प्रतिनिधी**

ठाणे : ठाणे महापालिकेतील एमआयएमच्या नगरसेविका सहर शेख यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याची तक्रार दाखल झाली आहे. त्यामुळे आता या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी जोर धरत आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुंब्र्यातील प्रभाग क्रमांक ३० मधून विजयी झालेल्या एमआयएमच्या 'कैसे हराया' फेम नगरसेविका सहर शेख यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. सहर शेख यांच्याकडून शासकीय यंत्रणांची दिशाभूल झाल्याचं उघडकीस आलं असून या प्रकरणामुळे आता त्यांचं नगरसेवकपद धोक्यात आलं आहे.

या प्रकरणी त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली जात आहे. अशातच आता सहर शेख आणि त्यांचे वडील युनूस शेख नॉट रिचेबल असल्याची मोठी माहिती समोर आली आहे. त्यामुळे बोगस जात प्रमाणपत्र दाखला प्रकरण अंगलट येण्याची चिन्हे दिसताच सहर शेख गायब झाल्याचं बोललं जात आहे. ठाणे महापालिकेतील एमआयएम नगरसेविका सहर शेख यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक केल्याची तक्रार दाखल झाली आहे. तर या प्रकरणाची सखोल चौकशी करून सहर यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे.

शिवाय या तक्रारीवर जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीचा अहवाल लवकरच येणार आहे. अशातच आता सहर शेख आणि त्यांचे वडील दोघेही नॉट रिचेबल झाल्याची माहिती आहे. तक्रारदाराने उत्तर प्रदेशातील गाजियाबादचे मूळ रहिवासी असलेल्या युनूस इक्बाल शेख हे महाराष्ट्रात स्थलांतरित झाल्यानंतर त्यांनी इतर मागास प्रवर्गासाठीचा नमुना ८ वापरून अधिकाऱ्यांची दिशाभूल करून महाराष्ट्रातील बनावट जातीचा दाखला मिळवल्याचा आरोप केला आहे.

### पंचगंगेत रोज २०० एमएलडी सांडपाण्याचा लोंढा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

कोल्हापूर : पंचगंगा नदी ही जिल्ह्यातील सर्वाधिक प्रदूषित नदी म्हणून ओळखली जाऊ लागली आहे. एकेकाळी स्वच्छ व बारमाही वाहणारी ही नदी आज अक्षरशः 'गटारगंगा' बनली आहे. दररोज सुमारे २०० एमएलडी सांडपाणी नदीत मिसळत असल्याने पर्यावरण आणि सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

# वाघोलीत एमडी ड्रग्ज विक्रीसाठी आलेल्या दोघांना अटक; ३१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : एमडी ड्रग्जची विक्री करण्यासाठी आलेल्या दोघांना वाघोली पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून ३१ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अटक आरोपींची नावे योगेश सुभाष कणगरे (३८, लोहगाव) आणि सोनू सिंह ऊर्फ मनुवेंद्र ऊर्फ सोनू शंकर सिंह (४२, टिंगरेनगर) अशी आहेत.

वाघोली पोलिसांचे तपास पथक सातववस्ती रोडवर पेट्रोलिंग करत असताना एक संशयित व्यक्ती पोलिसांना पाहून घाईने निघून जाण्याचा प्रयत्न करत होता. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता १ लाख ८ हजार रुपयांचे ५ ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) आढळून आले. त्याच्याकडील कारसह माल जप्त करून योगेश कणगरे याला अटक करण्यात आली.

चौकशीत त्याने एमडी पावडर मित्र सोनू सिंह याने दिल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी सोनू सिंह याचा शोध घेऊन त्याला



पकडले. त्याच्याकडून १ लाख ४७ हजार रुपयांचे ८ ग्रॅम एमडी, दुचाकी आणि मोबाइल जप्त करण्यात आला. पुढील तपासात त्याच्या घराच्या पार्किंगमधील कारमध्ये ४ लाख ६४ हजार रुपयांचे २३ ग्रॅम एमडी सापडले. ही २० लाख रुपयांची कारही जप्त करण्यात आली.

या दोन कारवायांमध्ये पोलिसांनी एकूण ३७ ग्रॅम एमडी, दोन कार, दुचाकी, मोबाइल असा ३१ लाख ६ हजार रुपयांचा माल जप्त केला. ही कारवाई वरिष्ठ पोलिस निरीक्षक नंदकुमार गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली वाघोली पोलिसांच्या पथकाने केली.

# नाशिकच्या गंभीर प्रकरणानंतर पुण्यातही आयटी कंपन्यांची तपासणी सुरू

## तक्रार निवारण समिती अनिवार्य; सर्व आस्थापनांना माहिती सादर करण्याचे आदेश

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : नाशिकमधील आय.टी. (माहिती तंत्रज्ञान) कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ केल्याचे प्रकरण उघडकीस आले. त्याच्या तपासात पुढे धार्मिक प्रकारही सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे आता कामगार आयुक्त कार्यालयाने पुण्यातही आयटी कंपन्या, तसेच अन्य आस्थापनांच्या व्यवस्थापनाकडे चौकशी करण्यास सुरुवात केली आहे.

नाशिकमधील एका माहिती तंत्रज्ञान कंपनीत लैंगिक छळाच्या प्रकरणातून अन्य गुन्हेगारी स्वरूपाची कृत्ये पुढे आली.



त्यात काही जणांची टोळीच गुंतली असल्याचे पुढे आले. हे सर्वच प्रकरण गंभीर असून राज्यात सर्वत्र त्याची चर्चा सुरू आहे. त्या पार्श्वभूमीवर कामगार आयुक्त कार्यालयाने पुण्यातील आस्थापनांची चौकशी सुरू केली आहे. यात आयटी कंपन्या तर आहेतच, शिवाय अन्य औद्योगिक वसाहतींमधील आस्थापनांचीही चौकशी केली जाणार आहे.

लैंगिक छळाच्या तक्रार निवारणासाठी प्रत्येक कंपनीला कंपनीअंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे कायद्याने बंधनकारक आहे. अशी समिती नसल्याचे व तक्रारीकडे दुर्लक्ष झाल्याचे नाशिकमधील त्या कंपनीतील प्रकरणात लक्षात आले. त्यामुळेच आता त्याची दखल घेत कामगार आयुक्त कार्यालयाने पुणे जिल्ह्यातील सर्व कंपन्यांना निवेदन पाठवले आहे. त्यात कायद्यातील संबंधित कलमाचा उल्लेख करून अशी समिती स्थापन केली किंवा कसे? याची माहिती तत्काळ संबंधित क्षेत्रीय कामगार अधिकारी यांना द्यावी, असे म्हटले आहे. त्याचबरोबर समितीची स्थापना केली नसल्यास कायद्यानुसार ५० हजार रुपयांचा दंड ठोठावण्याची तरतूद असल्याचेही स्पष्ट केले आहे. तसेच समिती नसल्यास ती त्वरित स्थापन करावी, असेही नमूद केले आहे.

# बसमधील महिला वाहकावर चाकू हल्ला; मद्यधुंद प्रवासी फरार

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : मद्यधुंद प्रवाशाने बसमधील महिला वाहकावर चाकूने हल्ला केल्याची धक्कादायक घटना अलंकार चौक परिसरात घडली. या हल्ल्यात सुरेखा बळीराम भालेराव (३८) यांच्या मांडीत गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

भालेराव या पुणे महानगर परिवहन सेवेच्या बसमध्ये महापालिका ते विमाननगर मार्गावर कर्तव्यावर होत्या. जुना बाजार चौकातून बसमध्ये चढलेल्या एका प्रवाशाने येरवड्याचे तिकीट घेतल्यानंतर इतर प्रवाशांना शिवीगाळ सुरू केली. मद्यधुंद अवस्थेमुळे सुरुवातीला प्रवाशांनी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. अलंकार चौकात बस थांबल्यानंतर भालेराव यांनी त्याला खाली उतरण्यास सांगितले. त्याचा राग आल्याने आरोपीने खिशातून चाकू काढून त्यांच्या मांडीत वार केला आणि तेथून पळ काढला.

या प्रकरणी बंडगार्डन पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

# चिखलीतील लॉजवर पोलिसांचा छापा;

## देहविक्री रॅकेटचा पर्दाफाश, ९ महिलांची सुटका: दोघांना अटक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : गेल्या काही दिवसांमध्ये पुणे पोलिसांनी कडक कारवाई करत अवैधरित्या सुरु असलेल्या वेश्या व्यवसाय मोडकळीस आणला. तसेच बनावट ओळखपत्र दाखवून पुण्यात वास्तव्य करणाऱ्या कित्येक बांगलादेशी महिलांना ताब्यात घेतले असल्याची माहिती आहे. अशातच आता चिखली येथील आदित्य लॉजवर पोलिसांनी छापा टाकत एका मोठ्या देहविक्री व्यवसायाचा पर्दाफार्श करण्यात आला. या रॅकेटमधून तब्बल ९ महिलांची सुटका करण्यात आली असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांना देहू-आळंदी रस्त्यावरील आदित्य लॉजवर काहीतरी चुकीचे काम सुरु असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या सूचनेनुसार या लॉजवर छापा टाकण्यात आला. त्या लॉजचा वापर अवैध



वेश्याव्यवसाय चालवण्यासाठी केला जात होता. पोलिसांनी धाड टाकली तेव्हा या लॉजवर ९ तरुणी सापडल्या. बांगलादेशातून तस्करी करून आणलेल्या एका तरुणीसह ९ महिलांची सुटका पोलिसांनी केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी लॉज मॅनेजर अशोक बाबुराव बाबर आणि कामगार अकिबुल खालेक मुल्ला या दोघांना अटक केली आहे. तसेच लॉज चालक सुदर्शन पवार, जागा मालक नाना बोराटे आणि साहिल ऊर्फ शाहीन मंडल यांच्याविरुद्ध चिखली पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता आणि पिटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गॅस बिल भरण्याच्या नावाखाली सायबर चोरांकडून दोघांची १ लाख ४४ हजारांची फसवणूक

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : गॅस बिल भरले नाही तर कनेक्शन बंद होईल, अशी भीती दाखवत सायबर चोरांनी दोन नागरिकांची १ लाख ४४ हजार ६०३ रुपयांची फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी मार्केट यार्ड आणि नऱ्हे पोलीस ठाण्यात अज्ञात सायबर चोरांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या घटनेत, बिबवेवाडी-कोंढवा रस्ता परिसरातील ७१ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला फोन करून गॅस बिल थकीत असल्याचे सांगण्यात आले. कनेक्शन बंद होईल, अशी भीती दाखवत व्हॉट्सॲपवर नोटीस आणि एक लिंक पाठवण्यात आली. ज्येष्ठ नागरिकाने ती लिंक क्लिक करून क्रेडिट कार्डद्वारे बिल भरण्याचा प्रयत्न करताच त्यांच्या खात्यातून २९ हजार रुपये डेबिट झाले. ही घटना ९ एप्रिल रोजी घडली.

दुसऱ्या घटनेत, धायरी-नऱ्हे परिसरातील ४५ वर्षीय व्यक्तीला गॅस बिल भरण्यासाठी एपीके फाईल पाठवण्यात आली. त्यांनी ती फाईल उघडताच त्यांच्या बँक खात्यातून १ लाख १५ हजार ५८७ रुपये डेबिट झाले.

दोन्ही प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यांत गुन्हे दाखल करण्यात आले असून मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात पोलिस निरीक्षक नवले, तर नऱ्हे पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचारी सोनकांबळे पुढील तपास करत आहेत.

# 'शेती डिजिटल' करण्याची राज्य सरकारची अभिनव संकल्पना!

## चार कृषी विद्यापीठांत कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन व नवउद्यम केंद्रे

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : राज्य शासनाच्या महाग्री एआय धोरण २०२५-२०२९ अंतर्गत राज्यातील चार कृषी विद्यापीठांमध्ये आता कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन, नावीन्यता आणि इन्क्युबेशनच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. त्या अंतर्गत कृषी विद्यापीठांतील कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता आणि इनक्युबेशन केंद्रांची स्थापना करण्यात येणार असून, त्यासाठी प्रत्येक कृषी विद्यापीठाला ५० लाख रुपये या प्रमाणे एकूण दोन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.



कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विभाग आणि मत्स्यव्यवसाय विभागाने या बाबतचा शासन निर्णय नुकताच प्रसिद्ध केला. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि अन्य उदयोन्मुख तंत्रज्ञानांची कृषी क्षेत्राला जोड देऊन राज्याच्या कृषी क्षेत्रात क्रांती घडवण्यासाठी महाग्री - एआय धोरण तयार करण्यात आले आहे. राज्यात महात्मा फुले कृषी विद्यापीठ, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ ही चार कृषी विद्यापीठे कार्यरत आहेत. या विद्यापीठांमध्ये कृषीविषयक संशोधन करण्यात येते.

आता महाग्री-एआय धोरणाअंतर्गत या विद्यापीठांच्या स्तरावर सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. तसेच संशोधन, नवउद्यमी परिसंस्था विकसन, क्षमता विकास, तंत्रज्ञानाचा शेतीमध्ये प्रत्यक्ष वापर करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर, चारही कृषी विद्यापीठांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून संशोधनाला चालना देण्यात येणार आहे. तसेच नावीन्यता आणि इन्क्युबेशन सुविधा निर्माण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता नावीन्यता व इन्क्यूबेशन केंद्रांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. त्यासाठी प्रत्येक विद्यापीठाला प्रत्येकी ५० लाख रुपये या प्रमाणे निधी देण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच हा निधी महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेमार्फत विद्यापीठांना वितरित करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

# खानवडी शाळा प्रकरणात प्रभारी गटशिक्षणाधिकाऱ्याचे निलंबन

**जनप्रवास । प्रतिनिधी**

पुणे : खानवडी (ता. पुरंदर) येथील ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळा प्रकरणात चुकीची माहिती प्रसारित केल्याप्रकरणी विस्तार अधिकारी (शिक्षण) तथा प्रभारी गटशिक्षण अधिकारी गोविंद हरिभाऊ लाखे यांना तात्काळ निलंबित करण्यात आले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी गुरुवारी हा आदेश जारी केला.

महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा शिस्त व अपील नियम १९६४ मधील नियम ३(१) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. शाळेला भेट दिल्यानंतर चुकीची माहिती बाहेर प्रसारित करून माध्यमांमध्ये प्रसिद्ध झाल्याने जिल्हा परिषद संस्थेची बदनामी झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले.

# अग्रलेख : ड्रग्जची पाळेमुळे अधिक खोलवरच...!

कुठले ना कुठले अमलीपदार्थ मिळत नाहीत असे शहर, राज्यात सोडाच देशभरात क्वचितच घडत असावे. ड्रग्जच्या व्यापाराने अवघे जग व्यापून टाकले असताना अशा परिस्थितीत देशाची आर्थिक राजधानी मुंबई त्याला अपवाद कशी असावी ? तसे पाहायला गेले तर ड्रग्ज आता गावागावात आणि नाक्यानाक्यावर पोहचले आहेत. पण मुंबईची चर्चा अधिक होण्याचे कारण म्हणजे देशभरात ड्रग्ज पोहचवण्यात मुंबईचा मोठा वाटा आहे. जगभरातल्या प्रत्येक देशासोबत जोडलेले हे शहर ड्रगतस्करीचे एक मोठे आंतरराष्ट्रीय केंद्र आहे. याचे दुष्परिणाम अधूनमधून दिसत असतात.

गोरेगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या म्युझिक कॉन्सर्टदरम्यान ड्रगचे अतिसेवन केल्याने दोन विद्यार्थ्यांचे मृत्यू होण्याची घटना म्हणजे शहरवासियांसाठी धोक्याचा इशारा आहे. तसे कोणतेही ड्रग्ज पावलापावलावरच्या टपरीवरही उपलब्ध असते. पण सर्वसामान्यांना ठाऊक असलेली ही बाब फक्त पोलिसांनाच माहित नसते. रात्री-बेरात्री झिंगलेल्या अवस्थेत फिरणारे व्यसनी तरुण पाहायला मिळत असले तरी गस्त घालणाऱ्या पोलिसांना ते दिसत नाहीत. साता समुद्रापलीकडून येणारे अथवा इथेच तयार होणारे ड्रग सगळीकडे उपलब्ध आहेत. पण ते कोण वितरीत करते हे पोलिसांना समजत नाही. असे कसे होऊ शकते, असा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे. हजारो तरुणतरुणी गोळा होणारे म्युझिक कॉन्सर्टचे इव्हेंट म्हणजे तर ड्रग्जविक्रीचा मोठा बाजार असतो हे पोलिसांना सांगण्याची आवश्यकता नसते. पण पोलीस अशा ठिकाणी अजिबात फिरकत नाहीत. याची कारणे सर्वांनाच ठाऊक आहेत.

अर्थात पोलिस दलाच्या मर्यादित मनुष्यबळात पोलिसांची इतर सर्व कर्तव्ये पार पाडून गल्लीबोळात पसरलेल्या ड्रग्जविक्रेत्यांवर चोवीस तास नजर ठेवणे पोलिसांसाठी शक्य नाही हेही मान्य करावयास हवे. कारण आता ड्रग्जचा नाक्यानाक्यावर होणारा व्यापार मागे पडून तोही ऑनलाईन झाला असल्याने ड्रगविक्रेते आणि खरेदीदार यांच्यातील व्यवहार अन्य कुणाला कळण्याची शक्यता दुरापास्त असते. या सगळ्यावर मार्ग म्हणून आता पोलिसांचे अमलीपदार्थविरोधी विभाग आता अधिक सशक्त करण्याची गरज निर्माण झाली आहे. ते अत्याधुनिक करताना ऑनलाइन बाजार उधळण्यासाठी सायबर सेलसोबतही त्याची सांगड घालणे ही काळाची गरज आहे. बॉलीवूड पापासून मोठमोठ्या इव्हेंटमध्ये नानाविध अमली पदार्थ विकणाऱ्या ड्रग पेडलरना पकडणे फारसे कठीण नाही. ड्रगतस्करांच्या मुसक्या आवळल्या तर ड्रग्जविक्रीला बऱ्याच प्रमाणात आळा बसू शकेल.

काही महिन्यांपूर्वी दुबईत राहून हस्तकांमार्फत अडीचशे कोटी रुपयांच्या मेफेड्रोन ड्रग्जची मुंबईत तस्करी करणाऱ्या मोहम्मद सालीम मोहम्मद सुहेल शेख या कुख्यात तस्कराला मुंबईत आणले गेले होते. त्याच्या टोळीतील मुंबईतील पंधरा जणांना पोलिसांनी आधीच अटक केली होती. मात्र अशी कारवाई क्वचितच होते. असे असंख्य मोहम्मद सालीम सक्रीय आहेत आणि त्या प्रत्येकाला गजाआड करणे ही पोलिसांच्या आवाक्याबाहेरची बाब आहे. कारण पोलिसांची हद्द ठरलेली असते. त्याबाहेर जाऊन आरोपींना पकडण्यासाठी स्थानिक पोलिसांचे केंद्रीय यंत्रणांसोबत समन्वय असणे आवश्यक आहे. त्याचाच मोठा अभाव दिसतो.

ड्रग्जतस्करांचे इतके भक्कम नेटवर्क देशात तयार झाले आहे की, त्याची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत. स्थानिक पोलिसांपासून केंद्रीय यंत्रणाही ते रोखू शकत नाहीत. ड्रग्जमुळे गोरेगावात मृत्युकांड घडलेले असतानाच अंधेरी येथील एमडी कारखान्याचे प्रकरण उजेडात आले. गुजरातमधील फरार ड्रगतस्कर बेधडकपणे मुंबईत ड्रगचा कारखाना थाटतो आणि पोलिसांना त्याची खबर लागत नाही हे आश्चर्यजनक आहे. त्यामुळे ड्रगव्यापारातील गोपनीय वार्ता मिळवण्याबाबतच्या पोलिसांच्या कौशल्यावर प्रश्नचिन्ह उभे रहात आहे. हे प्रकरण वगळले तरी आतापर्यंत राज्यात असे अनेक कारखाने उघडकीस आले आहेत. उघडकीस न आलेल्या कारखान्यांचे प्रमाण भयावह असेल. त्याहीपेक्षा धक्कादायक बाब म्हणजे मुंबई शहरातील अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी ड्रग्जविक्री रॅकेटमध्ये सहभागी असून त्यांच्या मदतीनेच राज्यात पद्धतशीरपणे ड्रग्ज धंदा फोफावल्याचा आरोप ड्रगविक्री प्रकरणात काही वर्षांपूर्वी पकडल्या गेलेल्या धर्मराज काळोखे या पोलिस कर्मचाऱ्याने केला होता.

त्याच्या घरात ११० किलो मेफेड्रोन ड्रग्ज सापडले होते. दहा वर्षांपूर्वीच्या त्या प्रकरणात काळोखे याच्या आरोपातील सत्यासत्यता उघड होऊ शकली नाही. अगदी मुंबईलगतच्या बंदरांमधूनही मोठ्या प्रमाणावर ड्रग्जची तस्करी होत असल्याचे अनेकदा उघडकीस येऊनही ही तस्करी थांबण्याचे नाव घेत नाही. जोवर केंद्र सरकार आणि सर्व राज्य सरकारे हातात हात घालून एकत्रितपणे मनापासून ड्रग्जव्यापार रोखण्यासाठी प्रयत्न करणार नाहीत तोवर ही लढाई जिंकणे अतिशय कठीण आहे. ही एक चळवळ होऊन प्रशासन आणि जनतेने त्यात सहभागी झाले तरच काही परिणाम सध्या होऊ शकतो.

# अंतरंग



## शाश्वत अणुऊर्जेच्या दिशेने...!

गेल्या आठवड्यात भारताने देशाच्या अणुऊर्जा प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा गाठला. असे यश मिळविणारा रशियानंतरचा भारत हा दुसरा देश बनला. हा टप्पा आहे, अणुभट्टीतील अणुभंजनाची साखळी स्वत:हून टिकवून ठेवण्याचा; यामुळे अणुभट्टी स्वत: ऊर्जानिर्मिती करू लागते. अणुविज्ञानाच्या भाषेत याला क्रिटिकॅलिटी गाठणे म्हणतात. तमिळनाडूतील कल्पक्कम येथील प्रोटोटाइप फास्ट ब्रीडर रिक्टरने (पीएफबीआर - प्रारूप द्रुतगती इंधनजनक अणुभट्टी ) हा स्वयं ऊर्जानिर्मितीचा टप्पा गाठण्याला ऊर्जा स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे.

आपल्याकडे थोरियमचा साठा मोठ्या प्रमाणावर असला, तरी त्यापासून अणुविखंडनाची प्रक्रिया होत नसल्याने त्याद्वारे ऊर्जा निर्माण होऊ शकत नाही. थोरियमचा साठा वापरायचा असेल, तर त्याचे 'युरेनियम २३३'मध्ये रूपांतर करणे गरजेचे असते. भारतीय अणुऊर्जा क्षेत्राचे जनक असलेले होमी भाभा यांनी, म्हणूनच देशातील ऊर्जा कार्यक्रमाची तीन टप्प्यांत आखणी केली होती. त्यातील पहिल्या टप्प्यात नैसर्गिक युरेनियमचा वापर करणारी अणुभट्टी अन् दुसऱ्या टप्प्यात प्लुटोनियम-युरेनियम मिश्र अणुभट्टी. हे दोन्ही टप्पे थोरियमसाठी आवश्यक इंधन पुरवणारे असल्याने तिसऱ्या टप्प्यात थोरियमच्या साठ्याचा अधिकाधिक उपयोग करणे शक्य होते. कल्पक्कम येथील द्रुतगती अणुभट्टीने क्रिटिकॅलिटी गाठून थोरियमच्या वापराच्या म्हणजेच शाश्वत अणुऊर्जेच्या दिशेने पाऊल टाकले आहे. देशात थोरियमचा उपलब्ध साठा लक्षात घेता ही अतिशयोक्ती म्हणता येणार नाही. म्हणूनच भारताच्या या यशाला मोठे महत्त्व दिले जात आहे.

कल्पक्कम येथील अणुभट्टीने क्रिटिकॅलिटी गाठण्याची प्रक्रिया आव्हानांनी भरलेली होती. अणुभट्टीत अणूंचे विखंडन होऊन एक साखळी प्रक्रिया होत असते, तिला 'फिशन' असे म्हणतात. या विखंडनातून निर्माण होणारे न्यूट्रॉन पुढील अणूंना तोडतात आणि प्रक्रिया सुरू राहते. दोनाचे चार, चाराचे आठ अशा प्रकारे ही साखळी प्रक्रिया होत असते. विखंडनातून निर्माण होणारे न्यूट्रॉन हे पुढील अणूंना तोडण्याइतपतच असावे लागतात. कमी किंवा अधिक असून चालत नाही. हा समतोल राखणे हे एक प्रमुख आव्हान असते.

द्रुतगती अणुभट्टी न्यूट्रॉनवर कार्यान्वित असल्याने आणि तिच्या अणुगाभ्यातून प्रचंड ऊर्जा निघत असल्याने ती थंड करण्यासाठी द्रव सोडियमचा योग्य प्रमाणात मारा करावा लागतो. ही देखील एक आव्हानात्मक बाब होती. याशिवाय सुरक्षिततेचा मुद्दाही आव्हानात्मक असतो. अशा सर्व आव्हानांवर मात करून द्रुतगती अणुभट्टीने क्रिटिकॅलिटी गाठली असून, ती आता स्वयंऊर्जा निर्मितीच्या अवस्थेत पोहोचली आहे. यामुळे थोरियमचा वापर करता येईल आणि अणुऊर्जेचे प्रमाण वाढविता येईल. भारतात सध्या सुमारे सात गिगावॉट ऊर्जा ही अणुद्वारे निर्माण केली जाते.

देशातील थोरियमचा साठा पाहता पुढील तब्बल चारशे वर्षांपर्यंत दर वर्षी पाचशे गिगावॉट ऊर्जानिर्मिती करता येऊ शकेल. ही क्षमता सध्या निर्माण झाली नसली, तरी कल्पक्कम अणुभट्टीतील सध्याच्या यशाने त्या दिशेने प्रवास सुरू झाला, असे म्हणता येऊ शकते. अणुऊर्जा विभागाने चार अतिरिक्त द्रुतगती अणुभट्ट्या उभारण्यास मान्यता दिली आहे. पाचशे मेगावॉट क्षमतेच्या दोन भट्ट्या या कल्पक्कम येथेच उभारल्या जातील. थोरियमचा वापर करणाऱ्या अशा आणखी काही अणुभट्ट्या उभारत गेल्यास देशातील एकूण ऊर्जानिर्मितीतील अणुऊर्जेचा वापर टप्प्याटप्प्याने वाढत जाईल. साहजिकच अणुउर्जेच्या बाबतीत भारत सक्षम बनत चालला आहे.

ही जमेची बाजू असली तरी ऊर्जेच्या बाबतीत देशासमोरील आव्हान दुहेरी आहे. एकीकडे भौतिक विकास गतिमान करण्यासाठी ऊर्जानिर्मिती वाढवावी लागणार आहे, तर दुसरीकडे यामुळे होणारे प्रदूषण म्हणजेच कार्बन उत्सर्जन कमी करावे लागणार आहे. वाढते कार्बन प्रदूषण ही विशेष डोकेदुखी असून, दिल्ली, नोयडासह अनेक भागात वाढत्या कार्बन प्रदूषणाचे प्रमाण जीवघेणे ठरू लागले आहे. परिणामी त्यासाठी स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जास्रोतांचा वापर वाढवावा लागेल. सध्या देशाची ऊर्जानिर्मितीची क्षमता ५२० गिगावॉट असून, त्यांपैकी ४७ टक्के ऊर्जा ही प्रदूषणकारी जीवाश्म इंधनाच्या म्हणजे कोळसा आदी स्रोतांद्वारे निर्माण केली जाते. अन्य स्रोतांद्वारे, तसेच सौर, पवन आदी अपारंपरिक स्रोतांद्वारे निर्माण होणाऱ्या ऊर्जेचे प्रमाण आता ५२ टक्क्यांवर पोहोचले असले, तरी भविष्यातील गरज लक्षात घेता हे प्रमाण वाढवावे लागणार आहे.

वैश्विक तापमानवाढ रोखण्यासाठी कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करण्यासाठी भारतानेही कटिबद्धता व्यक्त केली आहे. त्याची पूर्तता होण्यासाठीही स्वच्छ ऊर्जास्रोतांची गरज आहे. येथे अणुऊर्जेचे महत्त्व अधोरेखित होते. अणुकचऱ्याचा मुद्दा असला, तरी या स्रोताच्या वापराने कोणतेही प्रदूषण होत नाही. शिवाय भारताची भविष्यातील ऊर्जेची गरज भागविण्याची क्षमताही अणुस्रोतात आहे. थोरियमच्या वापरासाठी कल्पक्कम अणुभट्टीने गाठलेला टप्पा यामुळे महत्त्वाचा ठरतो; देशाच्या अक्षय अणुऊर्जेचा मार्ग तिथूनच जातो.

**बाळासाहेब कन्नुरकर**

# वाजपेयींनी समतोल जपला, तो सरकार मोडतंय

## राजकारण



### तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांचा मोदींवर आरोप





अटलबिहारी वाजपेयी यांनी प्रतिनिधित्वाचा समतोल राखण्यासाठी मतदारसंघ पुनर्रचना गोठवून ठेवली होती. आता केंद्रातील मोदी सरकार हा समतोल का मोडत आहे? असा सवाल तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के स्टॅलिन यांनी उपस्थित केला.

मतदारसंघ पुनर्रचनेच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारला अंतिम इशारा दिल्यानंतर तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी आता थेट संघर्षाची भूमिका घेतली. बुधवारी द्रमुकच्या जिल्हा सचिवांची तातडीची बैठक बोलावल्यानंतर गुरुवारी संपूर्ण राज्यात काळे झेंडे दाखवून केंद्र सरकारचा निषेध करण्याचे आवाहन त्यांनी केले. घटनात्मक आणि संस्थात्मक मार्गांनी केलेल्या आंदोलनाला केंद्राने केराची टोपली दाखवल्यास जनतेचा उठाव अटळ असल्याचा इशाराही स्टॅलिन यांनी दिला. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे दक्षिण भारतातील राज्यांचे लोकसभेतील प्रतिनिधित्व कमी होण्याची भीती त्यांनी दी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केली. त्याविषयीचा हा आढावा

**स्टॅलिन यांचा नेमका आरोप काय?**

भारताची निर्मिती केवळ लोकसंख्येच्या आधारे झालेली नाही; तर ती परस्पर विश्वास, संयम आणि घटनात्मक दृष्टिकोनातून झाली आहे. संविधानाने राज्यांना लोकसंख्या वाढवण्याच्या शर्यतीत उतरण्यास कधीच सांगितले नाही. त्याऐवजी त्यांना जबाबदारीने शासन करण्यास सांगितले होते. ज्या राज्यांनी देशाच्या हितासाठी लोकसंख्या नियंत्रणाचे पाऊल उचलले, त्यांनाच आता शिक्षा दिली जात आहे. एका विशिष्ट पक्षाच्या फायद्यासाठी मतदारसंघांची पुनर्रचना केली जात आहे, असा आरोप स्टॅलिन यांनी केला. लोकशाही बळकट करण्यासाठी किंवा महिला सक्षमीकरणासाठी हे केले जात आहे की केवळ राजकीय सोईसाठी रचना बदलली जात आहे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. स्टॅलिन यांनी या प्रकरणाची तुलना थेट २०१६ मध्ये करण्यात आलेल्या नोटाबंदीशी केली. ते म्हणाले की, केंद्र सरकारचा हा दृष्टिकोन आम्ही यापूर्वीही पाहिला आहे. नोटाबंदीच्या वेळी घाईघाईने घेतलेल्या निर्णयामुळे लोकांनी मेहनतीने कमावलेली रक्कम कवडीमोल झाली. आज मतदारसंघ पुनर्रचनेच्या नावाखाली तमीळ जनतेला त्यांच्या राजकीय हक्कांपासून वंचित ठेवण्याचे आणि त्यांचा आवाज दाबण्याचे काम केले जात आहे.

**अटलबिहारी वाजपेयींचा दिला दाखला**

स्टॅलिन म्हणाले , अटलबिहारी वाजपेयी यांनी मतदारसंघ पुनर्रचना जाणीवपूर्वक गोठवून ठेवली होती. जोपर्यंत देशातील सर्व राज्यांचा विकास सम प्रमाणात होत नाही, तोपर्यंत प्रतिनिधित्वाचा समतोल बिघडू नये, हा त्यामागचा उद्देश होता. ती शहाणपणाची भूमिका आता का सोडली जात आहे? जर प्रतिनिधित्व केवळ लोकसंख्यावाढीच्या आधारावर दिले गेले, तर ते सुशासनाचे फळ नसून एका नव्या अन्यायाची सुरुवात असेल. ज्या राज्यांनी राष्ट्रीय प्राधान्यक्रमांना (लोकसंख्या नियंत्रण) महत्त्व दिले, त्यांना राजकीयदृष्ट्या बाजूला सारणे हे सहकारी संघराज्य संकल्पनेच्या मुळावर घाला घालण्यासारखे आहे. द्रमुकचे संस्थापक 'पेरारिग्नार अण्णा' (सी. एन. अण्णादुराई) यांच्या विचारांचा वारसा सांगताना स्टॅलिन म्हणाले की, आम्ही द्रविडी परंपरेचे आहोत, ज्याने देशाला सामाजिक न्याय, तर्कवाद, राज्य स्वायत्तता व सर्वसमावेशक प्रशासन यांसारख्या ठोस गोष्टी दिल्या आहेत. हा आवाज संसदेत दाबला जाता कामा नये. संघराज्य व्यवस्था ही दिल्लीकडून ठरवलेली केवळ प्रशासकीय व्यवस्था नाही, तर तो घटनात्मक करार आहे.

**वाजपेयी सरकारच्या दूरदृष्टीची आठवण**

संसदीय लोकशाहीत प्रत्येक मताला महत्त्व असते, याची आठवण करून देताना स्टॅलिन म्हणाले की, अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकारही केवळ एका मताने पडले होते. अगदी थोडासा बदलही राष्ट्रीय पातळीवर मोठा परिणाम करू शकतो. कोणत्याही सुरक्षेच्या उपायाशिवाय मतदारसंघाची वाढ करण्याचा निर्णय घेतल्यास तमिळनाडू आणि उत्तर प्रदेश यांसारख्या राज्यांमधील राजकीय दरी वाढू शकते.

या निर्णयामुळे राष्ट्रीय राजकारणात काही विशिष्ट राज्यांचे वर्चस्व वाढेल आणि प्रगतिशील राज्यांचा प्रभाव नगण्य होईल. स्टॅलिन यांनी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या धोरणांचा दाखला देत, केंद्र सरकारवर चांगलेच तोंडसुख घेतले. देशातील राज्यांचा समतोल राखण्यासाठी वाजपेयींनी दाखवलेली दूरदृष्टी सध्याचे सरकार का सोडून देत आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ चैत्रशके संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- चैत्र
ऋतु- सौर वसंत कृष्ण पक्ष तिथि : अमावस्या १७:२१:३३
नक्षत्र:रेवती १२:०२:०३ योग : वैधृति ०७:२१:२३ योग : विष्कुम्भ २७:४४:५७+ करण : चतुष्पाद ०६:४९:४७ करण : नाग १७:२१:३३ करण : किस्तुघ्न २७:४८:०९+ सूर्य : मेष चन्द्र : मेष१२:०२:०३ हिजरी सन् - १४४६
मुस्लिम मास - शव्वाल तारीख - २८ विशेष दर्श अमावास्या नारायणस्वामी पुण्यतिथी - नृसिंहवाडी अमावास्या समाप्ती सायं ५.२२

## राशी भविष्य...

**मेष** आपले काम सेवा या भावनेने करा. आर्थिक परिस्थिती मजबूत राहील. जवळच्या व्यक्तिमुळे घरात तणाव निर्माण होईल. धैर्य राखा निश्चितच फायदा होईल.

**वृषभ** निर्णय घेतांना मर्यादा पाळा. कामकाजात अजचणी आल्यामुळे मन दु:खी राहील. निष्कारण शंकेमुळे बैचन रहाल. कोणतीही गोष्ट स्पष्टपणे बोला.

**मिथून** आपले धैर्य आपल्या कुटुंबात व समाजात मान सन्मान मिळवून देणार आहे. आर्थिक स्थिती चांगली राहील. राजकीय क्षेत्रातील व्यक्तिकडून फायदा मिळण्याची शक्यता आहे.

**कर्क** भावनेने निर्णय घेऊ नका नुकसान होण्याची शक्यता आहे. आपल्या कामाचे चिज होणार नाही. स्वत: आपल्या कामात उत्साह दाखवा. भौतिकवादाकडे ओढा राहील.

**सिंह** आपली आर्थिक स्थिती उत्तम राहील. स्पष्ट बोलण्यामुळे आपली विश्वसनियता वाढेल. व्यापार वाढीकरिता योग्य प्रयत्न करा. सार्वजनिक स्थितीची आपल्याला चिंता राहील.

**कन्या** भौतिक साधने मिळण्याचे योग आहेत. मान सन्मान वाढणार आहे. पैसा अधिक खर्च होईल. दुसऱ्याच्या कामात दखल देऊ नका.

**तूळ** आज चांगल्या संधी आपणास मिळणार नाही. आर्थिक स्थिती चांगली राहील. मुलांची प्रगतीमुळे आपण प्रसन्न रहाल. मान सन्मान मिळण्याचे योग आहे.

**वृश्चिक** सकारात्मक वातावरण निर्माण होईल त्याचा फायदा घ्या. केलेल्या कामाचे समाधान मिळेल. बोलण्यावर नियंत्रण राखा. प्रवासात चोरांपासून सावध रहा.

**धनू** भौतिक सुख साधनाकरिता आपला पैसा खर्च होईल. भावनेच्या आहारी जावून कामे करू नका. आजच्या दिवशी विशेष फायदा होण्याचे योग आहेत.

**मकर** आजचा दिवस धावपळीचा राहील परंतु आर्थिक फायदा भरपूर होईल. एका योग्य समुहाशी आपला संबध जुळण्याचा योग आहे. आळस दूर करा. सर्वांच्या बोलण्याला महत्व द्या.

**कुंभ** आपल्या विचारांची दखल घेतली जाईल. अचानक लाभ होण्याचे योग आहेत. पद, प्रतिष्ठेमध्ये वाढ होईल. मुलांच्या आरोग्याकडे लक्ष द्या. कोणत्यातरी रहस्याचा उलगडा होईल.

**मीन** मनमिळावू स्वभावाचा आज आपल्याला फायदा होणार आहे. दुसऱ्यांची मदत फायदेशीर होईल. आत्मविश्वास वाढीस लागणार आहे.खाण्या-पिण्यावर नियंत्रण राखा.

## पारावरचा फड



लोकसभा, राज्यसभेत ३३ टक्के आरक्षणाचे विधेयक अधिवेशनात सादर झालेय. त्यावर खल चालला आहे, मंजूरही होईल. पण त्यावर चर्चेदरम्यान उत्तर प्रदेशचे खासदार अखिलेश यादव यांनी भाजपचा पोलखोलही केला. प्रत्यक्षात २१ राज्यांमध्ये भाजप सत्तेत असून, मुख्यमंत्रीपदी एकमेव दिल्ली सोडले तर कुठेच मुख्यमंत्रीपदाची संधी मिळाली नाही. एवढेच काय तर सध्या खासदार, आमदारपदावर १० टक्केही संधी देण्याचे धाडस दाखविलेले नाही. उलट त्या तुलनेत अन्य पक्षांकडून हे प्रमाण जास्त आहे. एवढेच काय तर दिल्लीसह अन्य ठिकाणी महिला मुख्यमंत्री किंवा मंत्री, आमदार, खासदारांना कितपत स्वातंत्र्य आहे हे जनतेसमोर स्पष्ट आहे. एकूणच आता ३३ टक्के आरक्षणाने महिलाराज येईल असे म्हटले जात असले तरी प्रत्यक्षात सध्या अन्यत्र महिलांना संधीनुसार कितपत कामाचे स्वातंत्र्य आहे. एकूणच कागदावरचे आरक्षण आणि कारभारी नवरा, पती, मुले, पै-पाहुणे अशा आरक्षणाचा उपयोग काय? यासंदर्भात पारावरची चर्चा...!

**बाबूराव :** देशात एकीकडं आमदार, खासदारकीला ३३ टक्के आरक्शनाचा इशय हारड बनलाय, त्यो मंजुरीला बी येतोया. दुसरीकडं खरातबाबा आन् आशी लईच परकरनं निगाय लागल्याती.

**पांडूनाना :** व्हय, आरं एकादा भोंदू, भामटा उटतुया आन् शे-दीडशे महिलास्नी वासनंचं शिकार बनवतुया, त्येनास्नी फिलमा करून बॅकमेल करतुया, हे कसलं?

**बाबूराव :** म्या तर म्हंतुया, महिला आरक्शन ठिकाय, पर त्येचा स्तोम माजवायाची गरज हाय का?

**पांडूनाना :** आरं महिला, पुरुषास्नी समान आदीकार हावंत. जसं समान नागरी कायदा म्हंत्यात त्यात त्येचा बी समावेश हावा.

**बाबूराव :** पर गल्लीपासनं दिल्लीपातुर समदीकडं पुरुषी कारबाराच बगाय मिळतुया. आगदी मंतरालयात त्या मनिषा म्हैसकर बाईनी बी एका मंतऱ्यानं त्येंच्या आदिकारावं गदा आनत त्येना सचिवपद नाकारल्याचं लिवून मत मांडलं.

**पांडूनाना :** आरं मंतरालयात आसंल तर चावडीपासनं समदीकडं काय खरं?

**बाबूराव :** म्या तर म्हंतुया, ह्या बायांनी आशा आदिकार डावलनाऱ्यास्नी जोड्यानं हानाय हावं.


**पांडूनाना :** खराय, आरक्शन मिळालं तर जे हास्तक्शेप करत्यात त्या नवऱ्यासकट समद्यास्नी घरात बसवावं.

**बाबूराव :** व्हय, न्यायतर नावापुरत्या आरक्शनाचा उपयोग काय? बायांनीच आशा ढोंगी आरक्नाशा इरोद कराय हावा.

**पांडूनाना :** आरं लोकसबा, इधानसबेत तर ताकदीच्या महिला जातील. त्यी बदलाची नांदीच ठरंल.

**बाबूराव :** व्हय, आगे आगे देको! **- अमृत चौगुले**

## उपदेश कथा




**निरपराधित्व आणि शत्रुत्व**

एका राज्यात भारतद्वाज पक्षी राहात होता, तो नेहमी सगळीकडे फिरत असत, त्या राज्यात पारध्यांचे प्रमाण भरपूर होते ते नेहमीच पक्षी पकडत असत, एक भारद्वाज पक्षी एका पारध्याच्या जाळ्यात अडकला.

तो पारध्याला म्हणाला, 'दादा, मी तुझा असा कोणता अपराध केला आहे म्हणून तू मला मारतोस? मी तुझं सोनं चोरलं नाही तर धान्याचे चार दाणे मात्र घेतले. पण पारध्याने त्याच्या बोलण्याकडे अजिबात लक्ष दिले नाही. त्याची मान मुरगाळली व त्याला आपल्या टोपलीत टाकले.

**कथा उपदेश : एकदा शत्रूच्या हाती सापडल्यानंतर आपले कितीही निरपराधित्व सिध्द केले तरी उपयोग होत नाही.**

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

१७११ - चार्लेस पाचवा हब्सबर्ग ऑस्ट्रीयाचा राजेपदी.
१८७५ - सर नेवीली केंबरलेन यांनी 'स्नुकर' विकसित केले.
१९४६ - फ्रान्सकडून सिरियाला स्वातंत्र्य घोषित करण्यात आले.
१९५६ - बलगारियाचे पंतप्रधान टीचरवेनको यांनी राजीनामा दिला.
१९७१ - शेख मुजीबूर रेहमान यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्याची घोषणा केली. त्यांना देशद्रोहाच्या आरोपावरून अटक करून पाकिस्तानात रवाना करण्यात आले.
१९७५ - रॉबर्ट मुगाबे झांबियाक्षे पंतप्रधान बनले.
२००६ - पश्चिम कोलंबियात मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे दरड कोसळून २९ जण ठार झाले.
२००७ - पाकिस्तानमध्ये आपल्या १३ नातेवाईकांची हत्या करणाऱ्या चार भावांना फाशी देण्यात आली.

**राष्ट्रीय**

१९८३ - भारताच्या रोहिणी-डी-३ उपग्रहाचे यशस्वी प्रक्षेपण.
२००२ - स्वामी सच्चिदानंद यांना संयुक्त राष्ट्रसंघाचे युथांट शांततापदक.
२००६ - आंध्र प्रदेशात वीज कोसळल्याने १६ जण ठार झाले.
२००७ - जम्मूत बस दरीत कोसळल्याने १३ जण ठार झाले.

## सोने संचय योजना फायद्याची

सोनं केवळ एक धातू नव्हे तर आपल्या भावना, संस्कृती आणि सुरक्षेशी देखील जोडलेलं आहे. भारतीय घरांमध्ये जितकं सोनं जपून ठेवलं आहे त्यापेक्षा जास्त सोनं जगातील कोणत्याच बॅंकेकडे नाही. लग्नसराई असो किंवा दिवाळीचा सण सोन्याला नेहमीच मोठी मागणी असते. पण आजच्या काळात सोन्याचे भाव गगनाला भिडत असताना दागिने खरेदी करण्यासाठी जास्त किंमत खर्च करणं प्रत्येकालाच परवडणारं नाही. इथेच ज्वेलरी SIP किंवा सोप्या भाषेत ज्वेलरी सेव्हिंग्ज स्कीम कामाला येते. स्वतःच्या किंवा आपल्या कुटुंबासाठी हळूहळू छोटी-छोटी बचत करून सोनं खरेदी करायचं आहे, अशा सर्वसामान्य नोकरी करणाऱ्यांसाठी ही योजना एक वरदान आहे. या आश्वासक गुंतवणुकीचा प्रत्येक तपशील समजून घेऊया. या स्कीमचा कालावधी बहुतेक ११ किंवा १२ महिन्यांच्या असतो. तसेच तुम्ही दरमहिन्याला जमा केलेली रक्कम सोन्याच्या सध्याच्या दरानुसार तुमच्या नावावर डिजिटल स्वरूपात जमा केली जाते किंवा ब्लॉक केली जाते आणि मुदतपूर्ण झाल्यास तुम्ही जमा केलेली रक्कम आणि ब्रँडने दिलेले कोणतेही बोनस वापरून दागिने खरेदी करू शकता. असे झाले तर आपल्याला एकाच वेळी जास्त रक्कम सोन्यासाठी खर्च करावी लागत नाही.

**-वर्षा कांबळे, सांगली**

## जन की बात...



### अनधिकृत फेरीवाल्यांना हटवण्यासाठी करायचे काय ?

राज्यातील जवळपास सर्वच प्रमुख शहरांमध्ये अनधिकृत फेरीवाल्यांची समस्या जटील बनत चालली आहे. मुंबई, ठाणे, नवी मुंबई सारख्या गर्दीच्या शहरांतील जवळपास सर्वच रेल्वे स्थानकांचा आजूबाजूचा परिसर अनधिकृत फेरीवाल्यांनी गिळंकृत केला आहे त्यामुळे शासनाने ठरवलेले फेरीवाला धोरण नक्की कोण राबवते आहे हा यक्षप्रश्न शहरांतील नागरिकांना पडला आहे. रेल्वे स्थानक परिसरातील पदपथ प्रशासनाने नागरिकांना चालण्यासाठी बनवले आहेत की फेरीवाल्यांना आपली दुकाने थाटण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे हा सुध्दा प्रश्नआज पडतो आहे.

मुंबईतील रेल्वे स्थानक परिसर नागरिकांसह विविध प्रकारच्या वाहनांनीही नेहमीच गजबजलेला असतो. एकीकडे पदपथ फेरीवाल्यांनी व्यापलेला असतो तर दुसरीकडे रस्त्याच्या कडेने चालायचं म्हटलं तर जीव मुठीत घेऊन चालावे लागते. कोणते वाहन येऊन पाठीमागून धडकेल याची काहीच शाश्वती नसते. 'मुंबई बरोबर सर्वच राज्यात अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न गंभीर बनला आहे. पोलिसांना या अनधिकृत फेरीवाल्यांना हटवता येत नसेल, तर सैन्याला बोलवायचे का ?' अशा कडक शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने जुलै २०२४ मध्ये आपली उद्विग्नता व्यक्त केली होती.

मात्र त्यानंतरही प्रशासनावर काडीमात्र फरक पडलेला नाही. वाढत्या लोकसंख्येचा मुंबई शहरावर पडणारा अतिरिक्त भार, रस्ते रुंदीकरण, उड्डाणपूल, मेट्रो रेल्वेमार्ग यांसारख्या विकासकामांमुळे रस्त्यांची झालेली दुर्दशा, त्यातच शहरातील वाढत्या वाहनांमुळे ठिकठिकाणी होणारी वाहतूक कोंडी यांमुळे शहराचा श्वास कोंडतो आहे, फेरीवाल्यांनी सारे मार्ग दुतर्फा व्यापून टाकल्यामुळे त्यांच्या मागे असलेली अधिकृत दुकाने जी सरकारला वेळच्या वेळी कर भरतात ती झाकली जात आहेत. ज्याचा परिणाम या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत आहे. महानगरपालिका अधिकारी आणि पोलीस यांपैकी कोणीच या अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत नसल्याने आणि केली तरी ती केवळ नावापुरती असल्याने फेरीवाल्यांपासून सुटका करण्यासाठी सातत्याने कोणीनाकोणी न्यायालयाचे दरवाजे ठोठावत असतात.

**-जगन घाणेकर, घाटकोपर**

## " स्वरांचे चिरतरुण लेणे"



१२ एप्रिल रोजी सुर सम्राज्ञी आशा भोसले यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एका महापर्वाचा अंत झाला. आशाताईंचा महान गायिका आशा भोसले बनण्यापर्यंतचा प्रवास सोपा नव्हता. जीवनातील आणि कला विश्वातील समस्यांवर धडाडीने मात करत त्या यशाच्या शिखरावर पोचल्या. त्यांनी गायन क्षेत्रात चौफेर फटकेबाजी केली. त्यांनी गायलेल्या गाण्यांमध्ये चित्रपटातील सर्व प्रकारच्या भावभावना दाखवणारी गीते, त्यामध्ये प्रेम गीते, गझल, उडत्या चालीची असंख्य गीते यांचा समावेश होता. नाट्य संगीतापासून कॅब्रे गाण्यापर्यंतच्या सर्व प्रकारच्या गायन प्रकारांमध्ये दर्जेदार आणि उत्कृष्ट गाणी देणाऱ्या अत्यंत दुर्मिळ गायिका होत्या. गीताद्वारे मानवी मनाचा ठाव घेण्याची दुर्लभ क्षमता आशाताईंच्या गाण्यांमध्ये होती. प्रत्येक भावनेला न्याय देणे ही गायकाची कसोटी असते ते सर्वांना जमते असे नाही. यामुळे कोणी गझल गायकीपुरता सिमित राहतो, तर कुणी भजन सम्राट होतो, तर कोणी आलापी गायनाद्वारे नाट्यगीते गाऊन रसिकांना मंत्रमुग्ध करतो, तर कुणी भावगीते गाऊन रसिकांच्या भावनांचा विश्वासाचा प्रवास घडवून आणतो. आशाताईंचा आवाज प्रत्येक भावनांना न्याय देणार होता.

**-लीना गाडगीळ, न्यू पनवेल**

# निळवंडेच्या ओव्हरफ्लोमुळे प्रवरा-गोदावरी नदिजोड प्रकल्पाला चालना

## राहाता तालुक्यात जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याची सुरुवात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** पावसाळ्यात निळवंडे धरणाचे ओव्हर फ्लो चे पाणी कातनाल्याद्वरे थेट पुणतांब्या पर्यत जाण्यास सुरवात झाली. जलसपंदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकारातून हा एका अर्थाने प्रवरा ते गोदावरी असा नदिजोड प्रकल्प साकार झाला आहे. त्यामुळे त्या भागातील जिरायत गावे बागायत होऊ लागली. त्याचबरोबर राहाता परिसरातील भुगर्भातील पाण्याची पातळी वाढली. असे प्रतिपादन नगराध्यक्ष डॉ. स्वाधिन गाडेकर यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून संपूर्ण राज्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवड्याचा प्रारंभ झाला. राहाता तालुक्यात या उपक्रमाची सुरुवात आज पंचायत समितीच्या सभागृहात झाली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी शिर्डीच्या नगराध्यक्षा जयश्री थोरात, उपनगराध्यक्ष विजय सदाफळ, जलसंपदा विभागाचे अभियंता प्रदीप हापसे, तालुका कृषी अधिकारी




आबासाहेब भोरे आदि उपस्थित होते. आज पासून तालुक्यात येत्या ३० एप्रिल हा कृती पंधरवडा राबवीला जाईल.

डॉ.गाडेकर म्हणाले, जलसंवर्धनाबरोबरच सिंचन क्षेत्रामध्ये वाढ करण्यासाठी ओढे,नाले अतिक्रमणमुक्त करण्याचा संकल्प जलसंपदा विभागाने केला . प्रत्येक निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून, जलसंपदा विभागाचे प्रशासन अधिक गतिमान करण्याचा निर्धार या निमीत्ताने केला जाईल. या निमीत्ताने गोदा ते नर्मदा जलदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे.

अभियंता प्रदीप हापसे म्हणाले, जलसंपदा विभागाने दोन वर्षांत प्रशासकीय स्तरावर पारदर्शकता आणि तंत्रज्ञान याची योग्य सांगड घातली. गतिमान निर्णय घेतल्यामुळे प्रलंबित सिंचन प्रकल्पांच्या कामाला चालना मिळाली. प्रशासकीय स्तरावर रचनात्मक बदलही होत आहेत. कामेनिर्धारित वेळेत पूर्ण होत आहेत.

> जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलव्यवस्थापन कृती पंधरवाडा आजपासून सुरू झाला. त्यात लोकसहभाग वाढावा यासाठी अधिकारी आणि पदाधिका-यांनी सक्रीय होणे गरजेचे आहे.
>
> – डॉ.स्वाधिन गाडेकर,नगराध्यक्ष, राहाता

# रिसे येथील श्री मुकाई देवीची यात्रा संपन्न

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुरंदर :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील रिसे येथील श्री मुकाई देवी यात्रेची सुरुवात यात्रा कमिटीच्या सदस्यांनी अभिषेक करून तसेच गावचे दंडवत होऊन झाली. संध्याकाळी देवीची उत्सव मूर्ती पालखीमध्ये घेऊन गाव प्रदक्षिणा झाली.त्यानंतर विविध गावच्या ढोल लेझीम खेळाचे सादरीकरण झाले. हनुमंतराव देवकाते यांचा तमाशा झाला.

दुसऱ्या दिवशी जंगी कुस्त्यांचा आखाडा भरला शेवटची कुस्ती ९१ हजार १०० रुपयांवरती गेली.ही कुस्ती कैलास नानेकर तसेच रमेश साळुंखे या दोघांमध्ये झाली. ही कुस्ती कैलास नानेकर यांनी



जिंकली. कुस्तीचे पंच म्हणून देवराम गोळे,महादेव शेंडगे, सागर चव्हाण यांनी काम पाहिले. तसेच यात्रा कमिटी आणि ग्रामस्थांच्या मदतीने यात्रा शांततेत पार पडली.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते चितळे बंधू व्हिजन पार्कचे उद्घाटन

## निर्यात केंद्रीत खाद्यउद्योगासाठी शासन सहकार्य करेल : मुख्यमंत्री

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते रांजे येथे उभारण्यात आलेल्या चितळे बंधू व्हिजन पार्कचे उद्घाटन करण्यात आले. नव्या काळांची आव्हानांना सामोरे जावून ग्लोबल ब्रँड बनविण्याचा आत्मविश्वास चितळे बंधूनी दाखविला आहे. ग्लोबल ब्रँड झालेल्या 'चितळे बंधू' आणि राज्यातील खाद्य उद्योगाला प्रगत ब्रँडच्या रुपात जागतिक पातळीवर नेण्यासाठी आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे,शंकर मांडेकर, इंद्रनील चितळे, गोविंद चितळे, श्रीकृष्ण चितळे, केदार चितळे आदी उपस्थित होते.

व्हिजन पार्कच्या माध्यमातून खाद्य उद्योगातील आधुनिक सुविधा उभ्या रहात असल्याबद्दल समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, चितळे बंधूंची दूरदृष्टी या सुविधेतून पहायला मिळते. स्वच्छता आणि शुद्धतेच्या बाबतीत कुठेही मानवी हस्तक्षेप नसलेली उत्तम दर्जाची यंत्रणा या पार्कमध्ये उभारण्यात आली आहे. परदेशी यंत्रांमध्ये अनुभवाच्या आधारे आवश्यक बदल करून ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. नूतनीकरणीय ऊर्जेचा उपयोग इथे करण्यात आला आहे.

खाद्यपदार्थांचा दर्जा आणि ग्राहकांसाठी तयार करण्यात आलेली गॅलरी हे इथले वैशिष्ट्य आहे. या निरीक्षण गॅलरीमुळे उद्योगात पारदर्शकता येते आणि गुणवत्तेची तपासणीदेखील करता येते. इथून उत्पादनाच्या विविध टप्प्यातील प्रक्रीयेचे अवलोकन करता येते. शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी आणि वितरकांनाही परदेशाप्रमाणे हा अनुभव व्हिजन पार्कमध्ये औद्योगिक सहलीच्या माध्यमातून घेता येईल. महाराष्ट्रीयन उद्योगाने अशा जागतिक मानकांचे पालन करणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे श्री.फडणवीस म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले, फूड एक सॉफ्ट पॉवर आहे. चायनीज, जपानी, फ्रेंच,कोरिअन खाद्य पदार्थांचा आस्वाद लोकं घेतात. भारताच्या प्रत्येक भागात वैशिष्ट्यपूर्ण खाद्यसंस्कृती पहायला मिळते. ही संस्कृती प्रत्येक १०




किलोमीटरवर बदलते. अनेक प्रकारचे चविष्ट व्यंजने आणि पदार्थ यात आहेत. या पारंपरिक पदार्थांना एखाद्या ब्रँडच्या रुपात जगात घेवून जायचे आणि त्यासाठी आवश्यक मानकांचे पालन करण्याचे काम चितळे बंधूनी केले. स्नॅकींगचे चांगले ब्रँड्स् चितळे बंधूंनी तयार केले आहेत. परदेशी नागरिक भारतीय पदार्थांकडे आकर्षित होवू लागले आहेत. अशावेळी चितळे यांचे महाराष्ट्रीयन पदार्थदेखील अशाचप्रकारे जगात पोहोचतील आणि लोकप्रिय होतील, असा विश्वास व्यक्त करून शासन म्हणून 'एक्सपोर्ट ओरिएंटेड' फूड इंडस्ट्रीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

चार पिढ्यांच्या प्रयत्नातून चितळे हा ग्लोबल ब्रँड झाला असून ३५ देशात ही ओळख पोहोचली आहे. पुणेकरांनी चितळेंच्या उत्पादनावर मनापासून प्रेम केले आहे, असेही श्री.फडणवीस म्हणाले. कार्यक्रमापूर्वी मुख्यमंत्र्यांनी व्हिजन पार्कला भेट देऊन सुविधांची माहिती घेतली.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत एप्रिल २०२६ महिन्यात पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यांच्या माध्यमातून जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना विविध नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

रोजगार मेळाव्याचे २० एप्रिल रोजी वीर फिरंगोजी नरसाळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, दौंड, २१ एप्रिल रोजी मालोजीराजे भोसले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, इंदापूर, २२ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, २३ एप्रिल रोजी शहीद राजगुरु शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था खेड (राजगुरुनगर), ता. खेड आणि २७ एप्रिल रोजी तात्या टोपे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिरूर येथे आयोजन करण्यात येणार आहे.

या रोजगार मेळाव्यात दहावी, बारावी, पदविका, पदवीधर व पदव्युत्तर अशा विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी रिक्त पदे उपलब्ध असणार आहेत. नामांकित उद्योजक या मेळाव्यात सहभागी होणार असून उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीद्वरे नोकरीची संधी मिळणार आहे.

इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांची सविस्तर माहिती व अर्ज करण्यासाठी्.ॲक्षसरअॅ.ारहगुिरूरा. सीं.ळपत्रः या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच मेळाव्यास उपस्थित राहताना सर्व शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती व किमान ५ बायोडेटा सोबत आणणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे, ४८१ रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१३३६०६ वर संपर्क साधावा.

बेरोजगार उमेदवारांसाठी ही एक सुवर्णसंधी असून जास्तीत जास्त युवकांनी या रोजगार मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन राजेश धर्माधिकारी, कौशल्य, विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले आहे.

# कौशल्यम लाईटहाऊस सारख्या प्रकल्पामुळे युवकांना रोजगाराच्या नव्या संधी : महापौर रवि लांडगे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निगडी (पुणे) :** कौशल्यम लाईटहाऊससारखे आणखी प्रकल्प निर्माण करण्याची सध्या गरज असून, महापौर युवा रोजगार संकल्प योजनेतून सुद्धा रोजगारनिर्मिती केली जात आहे. अशा प्रकारे प्रत्येक तरुण-तरुणीला रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही सदैव प्रयत्नशील राहू, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

निगडी येथील यमुनानगर परिसरातील कौशल्यम लाईटहाऊस प्रकल्पाची महापौर रवि लांडगे यांनी पाहणी करीत या प्रकल्पाचा आढावा घेतला. येथील प्रशिक्षण प्रक्रियेची माहिती जाणून घेत त्यांनी प्रकल्पातील




यशस्वी युवकांशी संवाद साधला व त्यांच्या यशाचे कौतुक करत त्यांचा गौरव केला.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य उत्तम केंदळे, अनिल घोलप, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, लाईट हाऊस कम्युनिटीजच्या सीईओ अमृता बहुलेकर, प्रकल्प प्रमुख दीपिका केडिया तसेच लखन रोकडे, अक्षय किटे, वैभव कोल्हे, अभिजित कांबळे आदी उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले, बदलत्या काळानुसार कौशल्याधारित शिक्षणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, उद्योगांच्या गरजेनुसार प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांना केवळ नोकरीच नव्हे, तर स्वावलंबी होण्याची संधी मिळत आहे. भविष्यात अशा प्रकल्पांचा विस्तार करून अधिकाधिक तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे,असे देखील त्यांनी सांगितले.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी प्रशिक्षणाची गुणवत्ता, रोजगार संधी आणि विद्यार्थ्यांचा प्रतिसाद याबाबत समाधान व्यक्त केले. या प्रसंगी शिवमूर्ती सोनटक्के, सुमेधा ढाके, सुमित कुंभकरण, शंकर प्रसाद, रुचा लोंढे, अक्षय माने या नोकरी प्राप्त झालेल्या तसेच ओम सुर्वे, सचिन जाधव, प्रीती कोळेकर, आरती होलाडे या स्किल कोर्स पूर्ण केलेल्या युवक-युवतींचा सत्कार करण्यात आला. कौशल्य विकासाच्या माध्यमातून शहरातील अधिकाधिक युवकांना सक्षम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# शिरुरला भारनियमनाविरोधात भूमिपुत्र प्रतिष्ठानचे बेमुदत धरणे

## प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी दिली माहिती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**शिरूर :** शिरूर शहर व ग्रामीण परिसरात होणाऱ्या मोठ्या प्रमाणात भारनियमनाविरोधात वारंवार निवेदन देऊन देखील कुठलीही सुधारणा होत नसल्याने महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने आज शुक्रवार दि.१७ एप्रिल पासून शिरूर महावितरण कार्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करत असून तसे निवेदन शिरूर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता शरद माने यांना देण्यात आले असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी सांगितले.

शहर व परिसरामध्ये अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.यासंदर्भात मागील महिन्यात महावितरणला निवेदन देऊन शहर व परिसरामध्ये होत असलेल्या भारनियमनाबाबत भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने केलेल्या सर्वेक्षणात एका दिवसात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण किमान ४ ते



५ वेळा असून अर्धा तास ते ३ तासापर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे कुटे यांनी सांगितले.

यावेळी कुठलीही नैसर्गिक आपत्ती नसताना देखील वीजपुरवठा खंडित होत असून शहर व परिसरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता अपुरे असणारे रोहित्र व त्यावर देण्यात आलेला अतिरिक्त भार हेच भारनियमनाचे प्रमुख कारण असल्याचे या निवेदनात सांगण्यात आले आहे.

या गंभीर समस्येवर उपयोजना करण्यात महावितरण कार्यालय सपशेल अपयशी ठरल्याने याचा निषेधार्थ शुक्रवार दि १७ पासून महावितरण कार्यालयाबाहेर बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येणार असल्याचे भूमिपुत्र प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी दिलेल्या निवेदनातून इशारा दिला आहे.

# हृदय शल्यचिकित्सक डॉ. स्मृती हिंदारिया-पिसाळ यांना 'आयएमए पुणे यंग अचिव्हर्स अवॉर्ड २०२६' प्रदान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** वैद्यकीय सेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल हृदय शल्यचिकित्सक डॉ. स्मृती हिंदारिया-पिसाळ यांना 'आयएमए पुणे यंग अचिव्हर्स अवॉर्ड २०२६' प्रदान करण्यात आला. डॉ. स्मृती या मिनिमली इन्व्हेजिव्ह शस्त्रक्रिया करणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातील त्या एकमेव महिला डॉक्टर असून, त्यांच्या संशोधन, प्रबंध आणि हृदय शस्त्रक्रिया क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल हा सन्मान करण्यात आला. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या (आयएमए) पुणे शाखेने आयोजिलेल्या समारंभात त्यांना हा सन्मान देण्यात आला. टिळक रोड येथील डॉ. नितू मांडके आयएमए हाऊसमध्ये झालेल्या कार्यक्रमावेळी 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. सुनील इंगळे, डॉ. अविनाश भुतकर, डॉ. रणजित घाडगे, डॉ. अंजली साबणे यांच्यासह वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर आणि कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. स्मृती हिंदारिया-पिसाळ या मिनिमली इन्व्हेसिव्ह हृदय शस्त्रक्रिया क्षेत्रातील वरिष्ठ सल्लागार असून, त्यांनी गेल्या दहा वर्षांत दोन हजारांहून अधिक यशस्वी शस्त्रक्रिया केल्या



आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्णांना कमी वेदना, जलद पुनर्वसन आणि उच्च दर्जाची सेवा देण्यावर त्यांचा भर आहे. पुण्यातील विविध नामांकित रुग्णालयांमध्ये त्यांनी कार्य केले असून, सध्या त्या कार्डिएक सर्जरी क्षेत्रात नवे मानदंड निर्माण करत आहेत. महिलांच्या हृदय आरोग्याविषयी जनजागृती आणि रुग्णकेंद्रित उपचारपद्धती हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य मानले जाते. यापूर्वीही त्यांच्या कार्याला विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले असून, 'आयएमए पुणे यंग अचिव्हर्स अवॉर्ड'मुळे त्यांच्या कार्याची दखल पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. यंग अचिव्हर्स म्हणून झालेल्या सन्मानाबद्दल आनंद व्यक्त करीत डॉ. स्मृती हिंदारिया म्हणाल्या, "मिनिमल इन्वेझिव्ह व रोबोटिक सर्जरीचा लाभ अधिकाधिक रुग्णांना देण्याचे माझे ध्येय आहे. या शस्त्रक्रियांचे प्रमाण वाढले, तर रुग्णांना कमी वेदना होतील, तसेच त्यांचा बरा होण्याचा वेळ कमी होईल. हृदयाच्या आजाराबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी माझा प्रयत्न असतो. या सर्व कार्याला या पुरस्काराने अधिक प्रोत्साहन मिळेल.

# 'सारथी' नागरिक सेवा प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी महापौर रवि लांडगे यांचे कडक निर्देश

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची 'सारथी' ही डिजिटल नागरिक सेवा प्रणाली अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि परिणामकारक करण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी प्रशासनाला कडक निर्देश दिले आहेत. नागरिकांच्या तक्रारींचे त्वरित आणि समाधानकारक निवारण व्हावे, यासाठी 'सारथी २.०' विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महापौरांनी आयुक्तांना पाठविलेल्या पत्रामध्ये 'सारथी' प्रणाली केवळ तक्रार नोंदणीपुरती मर्यादित न राहता ती 'स्मार्ट गव्हर्नन्स प्लॅटफॉर्म' म्हणून विकसित करण्यावर भर दिला आहे. सध्या तक्रारींचे विविध विभागांमध्ये विलंबाने वर्गीकरण, 'ठशीर्श्रींशव' स्थिती आणि प्रत्यक्ष कामामधील विसंगती, डेटा विश्लेषणाचा अभाव, तसेच मोबाईल ॲपच्या User Interface (UI/UX) मधील त्रुटी यांसारख्या समस्यांकडे महापौरांनी लक्ष वेधले आहे.

महत्वाचे निर्देश

महापौरांनी प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविल्या आहेत:

- तक्रारींचे स्वयंचलित वर्गीकरण व योग्य विभागाकडे त्वरित पाठविणे.
- 'Resolved' स्थितीपूर्वी प्रत्यक्ष पडताळणी (Field Verification) अनिवार्य करणे.
- तक्रारींवर मूळ कारण विश्लेषण (Root Cause Analysis - RCA) करून कायमस्वरूपी उपाययोजना.
- विभागनिहाय अधिकाऱ्यांची माहिती प्रणालीत समाविष्ट करणे.
- प्रभावी UI/UX सुधारणा आणि नागरिकांसाठी सुलभ वापर.
- सर्व सेवांसाठी स्पष्ट Service Level Agreement (SLA) निश्चित करणे.
- डेटा सुरक्षा व Disaster Recovery प्रणाली अधिक सक्षम करणे.

# कर्मवीर शंकरराव काळे कारखाना कार्यस्थळावर श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न

■ जनप्रवास वार्ताहार

**कोळपेवाडी :** कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना कार्यास्थळावरील श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक बाल विकास केंद्रामध्ये दरवर्षीप्रमाणे याहीर्षीही श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करून अत्यंत भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

मा.खासदार स्व.कर्मवीर शंकरराव काळे व स्व.सौ. सुशीलामाई काळे यांचे सर्व धार्मिक कार्यात नेहमीच मोठे योगदान राहिले आहे. कारखाना व परिसरातील स्वामींच्या सेवेकऱ्यांना महाराजांची सेवा करता यावी यासाठी कारखाना कार्यस्थळावर दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ केंद्राची स्थापना करून सुरु झालेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांची परंपरा आजतागायत सुरु असून गौतम बँकेच्या माजी संचालिका सौ.पुष्पाताई काळे व माजी आमदार अशोकराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली व आमदार आशुतोष काळे यांच्या सहकार्यातून याहीवर्षी श्री स्वामी समर्थ केंद्रात श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येवून १५० महिला व ३५ पुरुष असे एकूण १८५ पारायणार्थी स्वामी चारित्र पारायण सप्ताहात पारायणाला बसले होते. केंद्रात होणाऱ्या प्रत्येक धार्मिक कार्याला त्यांचे विशेष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभत असून त्यांच्या



पुढाकारामुळेच हा सोहळा अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने पार पडला.

पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या स्वामी चारित्र पारायण सप्ताहात अध्यात्म आणि सेवेचा त्रिवेणी संगम पाहायला मिळाला. या सात दिवसांच्या कालावधीत अहोरात्र प्रहार सेवा देण्यात आली. यामध्ये दोन व्यक्ती माळ जप, दोन व्यक्ती श्री स्वामी चरित्र सारामृत वाचन आणि दोन व्यक्तींचे अखंड वीणा वादन अशा स्वरूपात रात्रंदिवस नामस्मरण सुरू होते. या धार्मिक व शिस्तबद्ध सेवेमुळे एक वेगळीच आध्यात्मिक अनुभूती निर्माण होवून सात दिवस आयोजित करण्यात आलेल्या अखंड नामजप यज्ञ आणि स्वामी चारित्र्य पारायणाने संपूर्ण परिसर स्वामींच्या भक्तीने न्हाऊन निघाला होता. यामध्ये कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व परीसरातील सेवेकऱ्यांसह सुरेगाव, कोळगाव थडी, माहेगाव देशमुख, शहाजापूर, कोळगाव माळ, विघनवाडी आणि वेळापूर येथील अनेक महिला भगिनींसह स्वामी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वामींचरणी आपली सेवा अर्पण केली.

या सोहळ्याची सांगता बुधवार (दि.१५) रोजी महाआरतीने करण्यात येवून नंतर उपस्थित सर्व भाविकांना आणि सेवेकऱ्यांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या पारायण सप्ताहामध्ये दैनंदिन संस्कार,आचार विचारांचे आदान प्रदान करण्यासह अखंड स्वामी नामस्मरण सुरु आसल्याने परिसरात भक्तीचे आणि मांगल्याचे वातावरण निर्माण झाले होते.या सांगता सोहळ्याप्रसंगी कारखान्याचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षीप्त वृत्त

### यंतानी घोषने केले 'जगद्धात्री'चे कौतुक; ती म्हणाली, माया देशमुखने मला अधिक मजबूत बनवले

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** 'जगद्धात्री' मालिकेतील उत्कंठावर्धक वळणांमुळे प्रेक्षक ह्या मालिकेला सतत खिळून राहिले आहेत. अलीकडील भागांमध्ये रुद्र (आयुष श्रीवास्तव) शिवाय (फर्मान हैदर) वर गोळीबार करतो. या हल्ल्यामागे रुद्रच आहे हे जगद्धात्रीला (सोनाक्षी बत्रा) माहीत आहे. न्याय मिळवण्यासाठी ती त्याचा पर्दाफाश करण्याचा प्रयत्न करते, मात्र पुराव्याअभावी तिचे प्रयत्न अपयशी ठरतात कारण रुद्र अतिशय काळजीपूर्वक आपले पुरावे मिटवतो. दरम्यान, माया (सयंतानी घोष) या आरोपांवर विश्वास ठेवण्यास नकार देते आणि आपल्या भावाच्या पाठीशी ठामपणे उभी राहते. जगद्धात्री आणि शिवायवर प्रचंड प्रेम असतानाही केवळ आपले कुटुंब विस्कळीत होऊ नये म्हणून माया कुटुंबाच्या संरक्षणाचा निर्णय घेते. कोणत्याही परिस्थितीत माया आपल्या भावासोबत आणि कुटुंबासोबत ठामपणे उभी राहते. अशा अनेक स्तर असलेली ही व्यक्तिरेखा साकारण्याबाबत सयंतानी घोष म्हणाली, माया देशमुख साकारण्याचा अनुभव माझ्यासाठी अभिनेता म्हणून अत्यंत समृद्ध आणि समाधान देणारा ठरला आहे. माया मला खास वाटते कारण ती केवळ वरवरची मजबूत स्त्री नाही, तर तिच्या व्यक्तिमत्त्वात अनेक भावना, संघर्ष आणि विविध छटा आहेत आणि त्यामुळे ती अतिशय वास्तविक वाटते.

### अशोक काळे यांचे निधन

■ जनप्रवास वार्ताहार



**पुणतांबा :** येथील अशोक गणपत काळे ( वय ७०) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले, त्यांच्या मागे पत्नी दोन मुले दोन, मुली भाऊ, भावजय ,जावई नातू असा मोठा परिवार आहे. ग्रामविकास अधिकारी महेश काळे व हरितक्रांती कृषी सेवा केंद्राचे संचालक तुषार काळे यांचे ते वडील होत,

### गं.भा.सरस्वती बोडखे यांचे निधन

■ जनप्रवास प्रतिनिधी



**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील गं.भा.सरस्वती विश्वनाथ बोडखे यांचे वृध्दापकाळाने नूकतेच निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय ९३ वर्ष होते. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, पुतणे, सूना, नातवंडे असा परिवार असून येथील रावसाहेब व अशोकचे कर्मचारी आबासाहेब बोडखे यांच्या त्या चुलती तर बाबासाहेब बोडखे यांच्या मातोश्री होत.

### सुखी जीवनसाठी सायबर सजग रहाणे अत्यावश्यक : डॉ. दीपक शिकारपूर

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** जगात व्यवहार करतांना एखाद्या चुकीमुळे आपले व कुटुंबाचे आयुष्य धोक्यात येऊन कधीही भरून न येणारे नुकसान होउ शकते.या साठी प्रत्येक नागरिकाने फेस बुक, लिंक्ड इन,ट्विटर ,यु ट्यूब आणि व्हॉटस अप या सारखी सोशल मिडिया, तसेच बँक खाती वापरताना सजगता दाखविणे आवश्यक आहे. आरोग्य,वाहन,जीवन विमा तसेच बँकिंग मध्ये मर्यादित विमा संरक्षण असते परंतु या सारखे कुठल्याही प्रकारचे विमा संरक्षण सायबर गुन्ह्यामुळे झालेल्या नुकसानीसाठी उपलब्ध नाही.या मुळे प्रत्येक नागरिकाने सुखी जीवनसाठी सायबर जगात सुरक्षितेसाठी सजग राहण्याचे आवाहन डॉ. दीपक शिकारपूर यांनी केले. ते कलामंच प्रस्तुत वसंत व्याख्यान मालेत ''सायबर सजगता'' या विषयावर बोलत होते. या वेळी अध्यक्ष वसुधा कर्दळे, नगर सेविका सौ मंजुश्री खर्डेकर आणि अनेक ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

### मुंबई ते पुणे: महाराष्ट्रातील समर्पित शिक्षक वर्गांमध्ये परिवर्तन घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** मुलांमध्ये आवश्यक मानवी कौशल्ये विकसित करण्यासाठी वचनबद्ध असलेल्या 'रंगीत' ने या वर्गांमध्ये अर्थपूर्ण परिवर्तन घडवणाऱ्या शिक्षकांना सन्मानित करण्यासाठी, महाराष्ट्रातील शाळांमध्ये सामाजिक, भावनिक आणि पर्यावरणीय ज्ञान (सीक) कार्यक्रमांतर्गत आपल्या 'रंगीत सीकर समुदाया' साठी 'टीचर्स ऑफ द मंथ' हा उपक्रम सुरू केला आहे. हा उपक्रम प्रथम मुंबई एज्युकेशन इनिशिएटिव्ह आणि ओम्नीऍक्टिव्ह इम्प्रूव्हिंग लाईव्हज फाउंडेशन (ओआयएलएफ) यांच्या भागीदारीत, तसेच मुंबईतील निर्लॉन लिमिटेड आणि पुण्यातील ओम्नीऍक्टिव्ह यांच्या सहकार्याने राबवला जात आहे. रंगीतच्या सीक अभ्यासक्रमाद्वारे, ते विद्यार्थ्यांना सहानुभूती, लवचिकता, सहकार्य आणि पर्यावरण जागरूकता यांसारखी कौशल्ये विकसित करण्यास मदत करत आहेत, जी त्यांच्या दैनंदिन जीवनासाठी वास्तविक आणि समर्पक आहेत. 'टीचर ऑफ द मंथ' हे असे शिक्षक आहेत जे आपल्या वर्गातील शिक्षण आनंददायक बनवतात आणि मुलांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करतात. इतकेच नाही, तर हे शिक्षक 'सीकर' समुदायाशी घट्टपणे जोडलेले आहेत,

### एचडीएफसी बँक परिवर्तनने १५,२०० हून अधिक जलस्रोत संरचना उभारल्या

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :**एचडीएफसी बँक परिवर्तन, एचडीएफसी बँकेचा प्रमुख सीएसआर कार्यक्रम, यांनी जाहीर केले की त्यांनी देशभरात एकूण १५,२८९ पेक्षा अधिक जलसंरचना बांधल्या व पुनरुज्जीवित केल्या आहेत. या उपक्रमामुळे १०,४३० हून अधिक गावांचा समावेश झाला असून १४.९२ लाख घरांना जलसुरक्षेचा लाभ मिळाला आहे. याशिवाय, आरोग्य व स्वच्छता या स्तंभांतर्गत ९५० हून अधिक गावांना सामुदायिक शुद्धीकरण प्रणालीद्वारे सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध झाले आहे.

बँकेने विविध भागांमध्ये शेततळे, चेक डॅम, विकेंद्रित वितरणासाठी जलमिनार, तसेच शाळा, आरोग्य केंद्रे आणि घरांवर पावसाचे पाणी साठवण प्रणाली अशा अनेक जलसंपत्ती बांधल्या व पुनरुज्जीवित केल्या आहेत. मध्य भारतात लिफ्ट सिंचन व रिचार्ज विहिरींमुळे आदिवासी शेतकरी समुदायांना पाणी उपक्रम अंतर्गत पाण्याचा अधिक प्रवेश मिळाला आहे. पिण्याच्या पाण्यासाठी बँकेने स्थानिक स्रोतांच्या विश्लेषणावर आधारित णत, ठज किंवा मल्टी-स्टेज फिल्टरेशन वापरून मिनी शुद्धीकरण यंत्रे बसवली आहेत.

# राहाता नगरपरिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते तर ते संपूर्ण मानवतेचे उद्धारकर्ते होते समता, बंधुत्व व न्याय या तत्त्वांनी त्यांनी समाज व मानवतेची विशेष जडणघडण केली. आपल्या लेखणीव्दारे संविधानाच्या माध्यमातून आपल्या देशाचे उज्वल भविष्य त्यांनी कोरले आहे संविधान पवित्र ग्रंथ आहे यावरच देशाची प्रगतीपथावरची व संवैधानिक वाटचाल सुरू आहे असे प्रतिपादन राहाता नगरपरिषदेचे नगराध्यक्ष डॉ .स्वाधीन गाडेकर यांनी केले आहे

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची आज १३५ वी जयंती निमित्ताने नगरपरिषदेत डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे नगराध्यक्ष डॉ.स्वाधीन गाडेकर व नगरसेवकांच्या हस्ते पूजन करून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन करण्यात आले

यावेळी नगराध्यक्ष डॉ. स्वाधीन गाडेकर म्हणाले, ज्या महामानवाने आपल्या लेखणीने या देशाचे भविष्य कोरले, ज्यांनी कोटीवधी पददलितांना सन्मानाने जगण्याचे बळ दिले ते विश्वरत्न, बोधिसत्व, डॉ.



बाबासाहेब आंबेडकर हे केवळ एका समाजाचे नेते नव्हते, तर ते संपूर्ण मानवतेचे उद्धारकर्ते होते. त्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण हा 'संघर्ष' आणि 'समर्पण' याचे मूर्तिमंत उदाहरण आहे.अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी परदेशात जाऊन उच्च शिक्षण घेतले आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग स्वतःसाठी न करता, या देशातील दीन-दलितांच्या, महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कासाठी केला. ''शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे आणि जो तो प्राशन करेल तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही.'' आणि म्हणून आपल्या मुलांच्या दर्जेदार शिक्षणावर भर देणे हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल. आजचा हा दिवस केवळ उत्सव साजरा करण्याचा नाही, तर त्यांनी दिलेल्या ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' या महामंत्राचे आत्मचिंतन करण्याचा आहे. आणि तो प्रत्यक्षात कृतीत आणण्याचा आहे संविधानाच्या माध्यमातून त्यांनी आपल्याला समता आणि बंधुभावाचा मंत्र दिला. आपल्या शहरात जाती-पातीचे भेद विसरून आपण सर्वजण गुण्यागोविंदाने राहिलो, तरच खऱ्या अर्थाने त्यांचे स्वप्न पूर्ण होईल. जलनीती, कामगार कायदे आणि लोकशाही मूल्यांची पायाभरणी केली. त्यांच्या याच विचारांचा वारसा घेऊन आपल्या नगरपालिकेचा कारभार स्वच्छ, पारदर्शक आणि लोकाभिमुख ठेवण्याचा आपण सर्व मिळून प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत.

यावेळी उपनगराध्यक्ष डॉ विजय सदाफळ, गटनेते व नगरसेवक मुन्ना शहा, नगरसेवक सर्वश्री प्रवीण सदाफळ, अजय आग्रे, राहुल सदाफळ, पुष्पा आरणे, माजी नगरसेवक भीमराज निकाळे, दशरथ तुपे, संदीप मुर्तडक, ॲड मयूर पाळंदे, नितीन गाडेकर, अक्षय बोठे, प्रवीण रुणवाल, विजय गिधाड, प्रभाकर आरणे, योगेश डांगे, सुयोग शेळके, प्रदीप बनकर, अरुण गाडेकर, कार्यालयीन अधीक्षक नानासाहेब टिक्कल आणि कर्मचारी उपस्थित होते.

## तोफखाना पोलीस ठाण्यातील हवालदार ३५ हजारांची लाच घेताना एसीबीच्या जाळ्यात

■ जनप्रवास प्रतिनिधी




**अहिल्यानगर :** तोफखाना पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस हवालदार अनिल अजिनाथ गोसावी याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

तक्रारदार व त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध दाखल असलेल्या कौटुंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी तसेच पोलीस ठाण्यात वारंवार येण्याची गरज भासू नये, यासाठी गोसावी यांनी सुरुवातीला ५० हजार रुपयांची मागणी केली होती. तडजोडीनंतर ही रक्कम ३५ हजारांवर ठरली.

तक्रारदाराच्या तक्रारीनंतर एसीबीने १५ एप्रिल रोजी सापळा रचून तोफखाना पोलीस ठाण्यातच त्याला लाच स्वीकारताना अटक केली.

या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे, गोसावी यांच्यावर यापूर्वीही कोतवाली पोलीस ठाण्यात कार्यरत असताना माळीवाडा एसटी स्टँड परिसरात एसीबीचा ट्रॅप झाला होता. त्यामुळे त्यांच्यावर दुसऱ्यांदा कारवाई झाल्याने मोठी चर्चा रंगली आहे.

## श्री स्वामी समर्थ जेष्ठ नागरिक चौथा वर्धापन दिन उत्साहाने साजरा

■ जनप्रवास प्रतिनिधी



**अहिल्यानगर :** भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वर्षभर विविध आरोग्य शिबिरे, ज्येष्ठ नागरिकांसाठी सहलीचे आयोजन, नेत्र तपासणी शिबिर, दंतरोग तपासणी शिबिर, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस, स्नेह मेळावा, सर्व रोग निदान शिबिर अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.ज्येष्ठ नागरिकांसाठी संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्य कौतुकास्पद आहे. असे प्रतिपादन माजी महापौर तथा नगरसेवक बाबासाहेब वाकळे यांनी केले आहे.

सावेडी येथील भुतकरवाडी येथे श्री स्वामी समर्थ जेष्ठ नागरिक संघाचा चौथा वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला.प्रसिद्ध साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी सेवानिवृत्ती नंतर आनंदी जीवन कसे जगावे?यावर उदबोधक व्याख्यान दिले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पद संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे भूषविले.यावेळी प्रमुख उपस्थितीत माजी महापौर तथा नगरसेवक बाबासाहेब वाकळे, नगरसेवक रवींद्र बारस्कर, सामाजिक कार्यकर्ते विलासराव ताठे, नगरसेविका वंदना ताठे, डॉ.संजय कळमकर, शिवाजी कराळे, आदी उपस्थित होते.

# आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या पाठपुराव्याला यश; 'निपुण सेतू' पोर्टलला मंत्रिमंडळाची मान्यता

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा-नगर मतदारसंघातील आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून, राज्य मंत्रिमंडळाने 'निपुण सेतू' पोर्टलला मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो बेरोजगार व स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्रातील गोरगरीब व होतकरू उमेदवारांना नोकरीच्या पर्यायी संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हे पोर्टल सुरू करण्यात येणार आहे. यामध्ये स्पर्धा परीक्षांच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचलेल्या, मात्र अंतिम निवड न झालेल्या उमेदवारांची माहिती एकत्रित करून ती खाजगी व सरकारी संस्थांना उपलब्ध करून दिली जाणार आहे.

गेल्या वर्षी केंद्रीय लोकसेवा आयोगाने 'प्रतिभा सेतू' नावाने पोर्टल सुरू केले होते. त्याच धर्तीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (महाराष्ट्र लोकसेवा आयोग) देखील अशी योजना सुरू करावी, या मागणीसाठी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना १३ ऑगस्ट २०२५ रोजी निवेदन दिले होते. त्यानंतर त्यांनी या विषयावर सातत्याने पाठपुरावा केला होता.



आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत 'निपुण सेतू' पोर्टलला मंजुरी मिळाल्याने आमदार पाचपुते यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. या निर्णयामुळे अंतिम टप्प्यात अपयश आलेल्या उमेदवारांनाही नोकरीच्या नव्या संधी उपलब्ध होणार असून, त्यांच्या कौशल्याला योग्य व्यासपीठ मिळणार आहे.

आमदार विक्रमसिंह पाचपुते हे अधिवेशनात लक्ष्यवेधीच्या माध्यमातून सातत्याने सर्वसामान्यांचे प्रश्न मांडत असतात. त्यांच्या या प्रयत्नांमुळे राज्यातील तरुणांच्या रोजगाराच्या प्रश्नाला नवे दालन खुले झाले आहे. 'निपुण सेतू' पोर्टल हा निर्णय केवळ योजना नसून, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो बेरोजगार उमेदवारांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, युवा आमदार पाचपुते यांनी मांडलेल्या या उपक्रमामुळे ते तरुणांच्या विश्वासाचे केंद्र बनले असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## पोटनिवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवा : जिल्हाधिकारी

■ जनप्रवास प्रतिनिधी



**अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत,पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयाने काम करावे.तसेच संपूर्ण मतदारसंघात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील यासाठी विशेष दक्षता घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोजित कायदा व सुव्यवस्था आढावा बैठकीत ते बोलत होते.या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.सोमनाथ घार्गे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते,उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील,उपजिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके यांच्यासह संबंधित पोलीस व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, पोटनिवडणुकीच्या कामकाजासाठी नियुक्त सर्व अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय राखत निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडावी.निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पुरेशा प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात यावा.संवेदनशील व इतर सर्व मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पूर्णपणे शांततेत पार पडेल यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे असेही त्यांनी स्पष्ट केले.

## १९ एप्रिल रोजी श्रीराम मंदिर नवीपेठ येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

### प्रखर हिंदुत्ववादी वक्ते सुरेश चव्हाणके व संत हभप गोविंद शास्त्री जाटदेवळेकर महाराज यांची उपस्थिती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यानगर शहराच्या मध्यवस्तीत कापड बाजार भागात होणाऱ्या विराट हिंदू संमेलनाच्या निमित्ताने सायंकाळी साडेचार वाजता आडते बाजार येथील प्रभू श्रीराम मंदिर येथून भव्य शोभायत्रेचे आयोजन करण्यात आले आहे.शोभा यात्रेचा मार्ग डाळ मंडई,तेली खुंट चौक,शहाजीराजे मार्ग, भिंगारवाला चौक,अर्बन बँक रोड,शहर सहकारी बँक येथे शोभा यात्रेचा समारोप होणार आहे.

या शोभायात्रेत मंगल कलश घेऊन महिला तसेच पारंपारिक पोशाखामध्ये हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे. तसेच या मिरवणुकीमध्ये भव्य श्रीरामाची मूर्ती,स्वसंरक्षणासाठी लाठी, काठी व तलवारबाजी करणाऱ्या मुली व भगवे ध्वज, तसेच विविध महापुरुषांच्या वेशभूषा केलेली बालके हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. मिरवणुकीचा समारोप नवीपेठ येथील श्रीराम मंदिर येथे होणार आहे.

# बनावट कागदपत्रांच्या आधारे विहीर व रस्ता बळकावल्याचा आरोप

## महिलेचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** देवसडे जेऊर (ता. नेवासा) येथील महिला शेतकरी संगीता परशुराम मिसाळ यांनी जागेची बनावट कागदपत्रे तयार करून शेतातील विहीर आणि रस्ता बळकावल्याचा गंभीर आरोप करत पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करून न्याय मिळावा, अशी त्यांची मागणी आहे.

मिसाळ यांनी सांगितले की, गेल्या सात ते आठ महिन्यांपासून त्या नेवासा पोलीस ठाणे आणि पोलीस अधीक्षक कार्यालयात न्यायासाठी चकरा मारत आहेत. अप्पर पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर यांच्याकडे दोन वेळा निवेदन देऊनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. उलट गुन्हा करणाऱ्यांना पोलीसांकडून अभय दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.



पाण्याअभावी शेती पडीत पडली असून कुटुंबावर उपासमारीची वेळ आली असल्याचे त्यांनी सांगितले. आरोपींकडून सतत धमक्या दिल्या जात असून गावातून हाकलून देण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचाही आरोप मिसाळ कुटुंबीयांनी केला आहे. विहिरीच्या जागेचे बनावट दस्त तयार करून विहीर व रस्त्यावर बेकायदेशीर ताबा मिळवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

# माळवाडगाव येथे धर्मध्वज चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त पंचदिवशीय कीर्तन महोत्सवाचे आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**माळवाडगाव :** माळवाडगाव येथे धर्मध्वज चतुर्थ वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंचदिवशीय कीर्तन महोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. हनुमान मंदिर परिसरात उभारण्यात आलेल्या ऐतिहासिक ७५ फूट उंच भव्य धर्मध्वजाच्या साक्षीने हा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे.

या महोत्सवाचे आयोजन ब्रह्मलीन सद्गुरु नारायणगिरीजी महाराज यांच्या अनंत कृपाशीर्वादाने तसेच शांतीब्रह्म गुरुवर्य भास्करगिरी महाराज श्रीक्षेत्र देवगड, हिंदू धर्मरक्षक गुरुवर्य महंत रामगिरीजी महाराज श्रीक्षेत्र सरला बेट यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून विविध मान्यवर संतांच्या उपस्थितीत कार्यक्रमाची शोभा वाढणार आहे. दीपप्रज्वलन सोहळा श्रीक्षेत्र अडबंगनाथ संस्थांनचे महंत स्वामी अरुणनाथगिरी महाराज व श्रीरामपूर विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या हस्ते शुक्रवार दि. १७ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता होऊन कार्यक्रमास प्रारंभ होणार आहे.

या सप्ताह कालावधीत दररोज सायंकाळी ५:३० वा. हरिपाठ व ६:३० ते ८:३० यावेळेत कीर्तनाचा कार्यक्रम होणार असून गावातील भक्तांसाठी दररोज प्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये राज्यातील नामांकित कीर्तनकार सहभागी होत असून भाविकांसाठी ही एक मोठी आध्यात्मिक पर्वणी ठरणार आहे. याकालावधीत दि. १७/०४/२०२५ ह.भ.प. कवीराज महाराज झावरे, दि. १८/०४/२०२५ ह.भ.प. ज्योतीताई धनवे, दि. १९/०४/२०२५ ह.भ.प. अर्जुन गिरीजी महाराज दि. २०/०४/२०२५ ह.भ.प. कृष्णा महाराज रासवे तसेच २१ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता हिंदू धर्म रक्षक गुरुवर्य महंत रामगिरीजी महाराज यांचे काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताह कालावधीत गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज, स्वामी अरुणनाथगिरीजी महाराज, प्रेम मूर्ती हरिशरणगिरीजी महाराज, महंत विश्वनाथगिरीजी महाराज, आचार्य शुभमजी महाराज खांडेकर व हभप रवींद्र महाराज मुठे यासह आदी संत महंत, विविध क्षेत्रातील मान्यवर पदाधिकारी कार्यक्रमास भेट देणार आहेत. या महोत्सवासाठी तरुण मंडळे, भजनी मंडळ व ग्रामस्थांनी पुढाकार घेतला असून मंडप व्यवस्था, लाईटिंग, पाणी सेवा, भजन मंडळे आदी सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. परिसरातील अनेक गावांतील भजन मंडळे या सोहळ्यात सहभागी होणार आहेत. हा कीर्तन महोत्सव म्हणजे श्रद्धा, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचा संगम असून मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन धर्मध्वज उत्सव समिती व समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिवादन

## बाबासाहेबांनी दिलेला समता, शिक्षण आणि संविधानाचा मार्गच खरा : विजय भालसिंग



■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शहरातील मार्केटयार्ड परिसरात त्यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून बाबासाहेबांच्या विचारांना आदरांजली वाहण्यात आली.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग व नाना डोंगरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाला पंकज लोखंडे, प्राजक्ता लोखंडे, जयश्री गायकवाड, विठ्ठल उमाप, ज्योती साठे, राजू डोईफोडे, राजेंद्र लोखंडे, अमित लोखंडे, प्राजक्ता लोखंडे, नितीन साठे, पूजा लोखंडे, राजू उमाप, जावेद सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते. विजय भालसिंग म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले शिक्षण, समता आणि बंधुता यांचे मूल्य आजही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यांनी भारतीय समाजाला संविधानाच्या माध्यमातून न्याय, स्वातंत्र्य आणि समानतेचा मार्ग दाखवला. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजातील अन्याय, अंधश्रद्धा आणि विषमता दूर करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. फक्त जयंती साजरी करून थांबून चालणार नाही, तर बाबासाहेबांचे विचार आचरणात आणणे गरजेचे आहे. शिक्षण हीच खरी शक्ती असून, प्रत्येक युवकाने ज्ञानाच्या बळावर स्वतः सह समाजाचा विकास साधण्याचे त्यांनी आवाहन केले. पै. नाना डोंगरे म्हणाले की, संविधान हा देशाचा कणा आहे. त्याच्या माध्यमातून सर्व घटकांना समान न्याय मिळतो. समाजात एकोपा आणि बंधुभाव टिकवण्यासाठी त्यांच्या विचारांचा प्रसार होणे आवश्यक आहे. धर्मनिरपेक्षता, बंधुता आणि सामाजिक समता यांचे धडे बाबासाहेबांनी दिले.

# कोपरगाव तालुक्यात जिओची सेवा कोलमडली कॉलसह इंटरनेट सुविधा बंद, जिओ ग्राहकांचा संताप

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** क्कोपरगाव तालुका प्रतिनिधी :- कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी, सुरेगाव परिसरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून रिलायन्स जिओची मोबाईल सेवा पूर्णपणे विस्कळीत झाली असल्याने हजारो जिओ ग्राहकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. कॉल लागत नसल्याने जिओ ग्राहकांचा मोबाईल वरून संपर्क होत नसून इंटरनेटचा वेगही अतिशय मंदावल्यामुळे युपीआय पेमेंट सेवाही पूर्ण होत नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

सध्याच्या डिजिटल युगात मोबाईल आणि इंटरनेट हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत. मोफत सेवेचे आमिष दाखवून लाखो मोबाईल धारकांना आपल्या जाळ्यात ओढणारी रिलायन्स जिओ कंपनी इंटरनेट सेवा देत आहे. हि कंपनी चांगल्या दर्जाची सेवा देत असल्यामुळे या कंपनीचा मोठा ग्राहक वर्ग आहे. मात्र चांगल्या सेवेची सवय लागलेल्या लाखो ग्राहकांना दोन दिवसांपासून विस्कळीत झालेल्या इंटरनेट सेवेचा चांगलाच फटका बसला आहे. कोपरगाव तालुक्यातील बहुतांश नागरिक जिओ कंपनीचे ग्राहक आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून या जिओ कंपनीची इंटरनेट सेवा विस्कळीत झाली आहे. त्यामुळे जिओच्या सीमकार्डवरून कॉल न लागणे, नेटवर्क नसणे अशा असंख्य अडचणी येत आहेत. कोळपेवाडी, सुरेगाव परिसरात नेटवर्कची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली असून अनेक वेळा मोबाईलला नेटवर्क दिसत असूनही प्रत्यक्षात कॉल मात्र लागत नाही. जर कॉल लागलाच तर समोरच्या व्यक्तीचा आवाज ऐकू येत नाही किंवा मध्येच संपर्क तुटतो किंवा समोरची व्यक्ती दुसऱ्या कुणाशी बोलत आहे असा व्हाईस मेसेज येतो. त्यामुळे वारंवार संपर्क करूनही समोरची व्यक्ती बोलत नाही यातून गैरसमज निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत तातडीच्या कामासाठी कोणाशी संपर्क साधणे कठीण होवून बसले आहे. संपर्कासाठी पूर्णपणे मोबाईलवर अवलंबून असल्यामुळे एखाद्या संकटाच्या वेळी किंवा अचानक उद्भवणाऱ्या प्रसंगावेळी जर संपर्क होवू शकला नाही तर काय करायचे असा प्रश्न नागरिकांना विस्कळीत झालेल्या इंटरनेट सेवेमुळे पडला आहे.

आजकाल सगळेच व्यवहार कॅशलेस होत असल्यामुळे खिशात रोख पैसे बाळगण्याची सवय जवळपास बंद झाली आहे. त्यामुळे बहुतांश वेळेस जिओचे नेटवर्क नसल्यामुळे आर्थिक व्यवहार करतांना देखील अडचणी येत आहे. इंटरनेटचा वेग संथ असल्याने हे व्यवहार पूर्ण होत नसून खरेदीसाठी गेलेल्या नागरीकांची चांगलीच पंचाईत होत असून याचा थेट परिणाम बाजार पेठेतील खरेदी विक्रीवर झाला आहे. शिक्षण क्षेत्र आणि नोकरदारांचीही अवस्था बिकट झाली आहे. वर्क फ्रॉम होम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तर नेटवर्क अभावी आपली नोकरी टिकवणे अवघड झाले आहे. जिओ कंपनीने त्यांचे रिचार्जचे दर अफलातून वाढवले असतांना देखील ग्राहकांची जिवोला पसंती आहे मात्र त्या तुलनेत उच्च दर्जाची सेवा मिळत नसल्याने जिओ ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

## बजाज पल्सर १८० परतली! आता नवे ग्राफिक्स, एलईडी हेडलॅम्प आणि ब्लूटूथ कनेक्टिव्हिटीसह

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** बजाज ऑटो या जगातील सर्वात व्हॅल्यूएबल टू-व्हीलर आणि थ्री-व्हीलर कंपनीने आज भारतातील सर्वाधिक लोकप्रिय आणि आयकॉनिक मोटरसायकल्सपैकी एक असलेल्या पल्सर १८० च्या पुनरागमनाची घोषणा केली आहे! नव्या ग्राफिक्स, एलईडी हेडलॅम्प, ब्लिंकर्स आणि ब्लूटूथ कनेक्टेड डिजिटल कन्सोलसह सुसज्ज असलेली ही मोटरसायकल, रायडर्सच्या दमदार मागणीमुळे पुन्हा सादर करण्यात आली आहे. पल्सर ब्रँडच्या दोन महत्त्वाच्या मॉडेल्सपैकी पल्सर १५० आणि पल्सर १८० यांच्या लाँचला २५ वर्षे पूर्ण होत असताना, ही मोटरसायकल अधिक शार्प आणि विकसित अवतारात परतली आहे. या पुनरागमनामुळे पल्सर ब्रँडच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा अधोरेखित झाला आहे. भारतामध्ये पल्सर १८० लाँच करण्यात आली तेव्हा, परफॉरमन्स मोटरसायकलिंगमध्ये नवे मापदंड निश्चित झाले होते. उच्च सीसी मोटरसायकलच्या परफॉरमन्स आणि दैनंदिन वापरातील सोयी यांची सांगड घालण्यात आली.

## शेतकरी न्यायासाठी युवक काँग्रेसचा सत्याग्रह



■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** भारत-अमेरिका कराराविरोधात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसतर्फे करण्यात आलेल्या शेतकरी न्याय सत्याग्रहाला पुणे जिल्ह्यातील युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा निर्णय भारतीय शेतकऱ्यांच्या अस्तित्वावर घाला असून, तो तात्काळ मागे घेतला गेला नाही, तर काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून अधिक तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा काँग्रेस कार्यकर्त्यांनी दिला.

या सत्याग्रहाला माजी आमदार रामहरी रुपनवर व पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष लहू निवंगूने यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष प्रथमेश आबनावे, वीरधवल गाडे, विश्वजीत जाधव, पुणे जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पवार, पिंपरी-चिंचवड युवक काँग्रेसचे अध्यक्ष कौस्तुभ नवले, सौरभ अमराळे, यशवंत मोहोळ, वैभव यादव, अशोक घोलप, सौरभ रुपनवर, वैभव बुरंगुले, संकेत गवारी, राहुल जाधव, संदिप सातकर आदी पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. या आंदोलनाला शेतकरी, युवक व सर्वसामान्य नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असून, आगामी काळात हा लढा अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

उमेश पवार यांनी केंद्र सरकारच्या या तथाकथित किसान ट्रेड डीलवर तीव्र टीका केली. ते म्हणाले, ''शेतकऱ्यांच्या न्यायासाठी काँग्रेसने नेहमीच पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकारने घेतलेली धोरणे शेतकऱ्यांसाठी मारक आहेत. कर्जमाफी होत नाही. शेतीमालाला एमएसपीनुसार भाव मिळत नाही. परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत आहेत. त्यामुळे पुणे ग्रामीण युवक काँग्रेसच्या माध्यमातून गावागावातून युवकांना एकत्र करून हा लढा अधिक बळकट करण्यात येईल. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील. 'शेतकरी वाचवा, युवक वाचवा, भारत वाचवा' हा नारा जनमानसात पोहोचवण्याची गरज आहे.

## आढळगावचे अनिल ठवाळ यांची बीएसएनएल दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेतून प्रेरणा घेत अनिल ठवाळ यांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य उभारले आहे.

समानता, शिक्षण आणि सामाजिक न्याय या मूल्यांना केंद्रस्थानी ठेवत त्यांनी आपल्या कामाची दिशा ठरवली.

गेल्या तीन ते साडेतीन दशकांपासून ठवाळ यांनी तळागाळातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. कोणत्याही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता विविध सामाजिक उपक्रम राबवून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

त्यांच्या या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि खासदार निलेश लंके यांच्या शिफारसीनंतर केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे



यांच्या स्वाक्षरीने त्यांची भारत सरकारच्या बीएसएनएल दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव येथील रहिवासी असलेल्या ठवाळ यांच्या या निवडीमुळे परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

साध्या कार्यकर्त्यापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आता केंद्र सरकारच्या पातळीपर्यंत पोहोचला असून, त्यांच्या जिद्द, संघर्ष आणि सामाजिक बांधिलकीचे हे फलित मानले जात आहे.

# महापुरुषांचा विचार 'इम्पा' ने जपला : प्रा. अजित खरसडे

- फुले आंबेडकर जयंतीनिमित्त इम्पाकडून विविध कार्यक्रमांचे आयोजन
- इम्पा नूतन कार्यकारिणी पदग्रहण समारंभ संपन्न
- 'इम्पा जीवनगौरव २०२६' पुरस्काराने डॉ. प्रेम भट्टड व संजीव कथुरिया सन्मानित

■ जनप्रवास प्रतिनिधी

**श्रीगोंदा :** इम्पा संघटना (इंडियन मेडिकल प्रोफेशनल असोसिएशन दिल्ली) या राष्ट्रीय संघटनेच्या श्रीगोंदा तालुका शाखा आयोजित नुतन कार्यकारिणी पदग्रहण समारंभ व ''महात्मा जोतीराव फुले तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर (गुरु-शिष्य) यांचा संयुक्त जयंती सोहळा'', दि.१४ एप्रिल २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत काष्टी येथे संपन्न झाला.

यानिमित्ताने यादिवशी इम्पा संघटना आयोजित सकाळच्या सत्रामध्ये निमगाव खलु येथे शेतकरी मेळावा घेण्यात आला तसेच दुपारी डॉ.पाखरे हॉस्पिटल, श्रीगोंदा कारखाना येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले.

सायंकाळी काष्टी मध्ये राजनंदीनी हॉलमध्ये झालेल्या भव्य दिव्य कार्यक्रमात वैद्यकिय क्षेत्रातील समर्पण, कौशल्य, रुग्णकेंद्रित वृत्ती व सामाजिक बांधिलकी याबद्दल ''इम्पा जीवनगौरव पुरस्कार २०२६'' व सन्मानचिन्ह दौंड येथील प्रसिध्द नेत्ररोग तज्ज्ञ गुरुवर्य डॉ.प्रेमकुमार भट्टड व श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे जेष्ठ सदस्य व मार्गदर्शक नामवंत डॉ. संजीव कथुरिया यांना मान्यवरांकडून प्रदान करण्यात आला.

यावेळी व्याख्याते प्रा.अजित खरसडे यांचे ''भारतीय व्यवस्थेतील महापुरुषांचे योगदान'' या विषयावर व्याख्यान झाले. त्यात त्यांनी इम्पाच्या विविध उपक्रमांचे कौतुक केले व इम्पा खऱ्या अर्थाने महापुरुषांच्या विचारधारेवर चालणारी संघटना आहे असे प्रतिपादन केले.

तसेच यावेळी जीर्ण व्याधींवर नैसर्गिक आरोग्य चिकित्सा आणि उपचार पद्धतीमध्ये विशेष



आयुर्वेदिक उपचार याबद्दल भारत भूषण पुरस्कारप्राप्त व इतर अनेक पुरस्कारप्राप्त डॉ. प्रविण बढे सर (अध्यक्ष, प्रधानमंत्री जनकल्याणकारी योजना अभिमान, महाराष्ट्र राज्य) यांचेही मार्गदर्शनपर व्याख्यान झाले.

यावेळी इम्पा संघटनेचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल कोकाटे व डॉ.राजेश पाखरे तसेच दौंड मेडिकल असोसिएशनचे सचिव डॉ. मुकुंद दादा भोर, दौंड निमा संघटनेचे अध्यक्ष डॉ. विशाल मिसाळ, दौंड मेडिकल असोसिएशन / रोटरी क्लब ऑफ दौंडचे माजी अध्यक्ष डॉ. राजेश दाते, दौंड डळझक्र ग्रूपचे वैद्यकीय अधिकारी डॉ.नितीन भोसले , श्रीगोंदा होमिओपॅथिक संघटनेच्या नवनिर्वाचित अध्यक्षपदी डॉ. सौ.मीनाक्षी मोटे यांची निवड झाल्याबद्दल, चि.समर्थ चंद्रकांत राहिंज याची तेंग सुडो शालेय क्रिडा स्पर्धेत नॅशनल स्तरावर निवड झाल्याबद्दल इम्पा संघटनेच्या वतीने सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनचे कार्यक्षम अध्यक्ष डॉ.मोहन लबडे सर यांनी भुषविले. श्रीगोंदा इम्पा संघटनेचे गव्हर्नर डॉ. प्रमोद गायकवाड , अध्यक्ष डॉ गणेश बारगळ पाटील, उपाध्यक्ष डॉ सौ किरण पवार, सचिव सागर ठवाळ ,खजिनदार डॉ. विजय लाळगे, सह सचिव डॉ सोनाली गदादे, सह खजिनदार डॉ सौ चैताली मखरे व सर्व सदस्यांनी व आदी मान्यवरांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी सामाजिक, राजकीय व शैक्षणिक, क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## सौर ऊर्जेतून कृषिपंपाना वीज देण्यात महावितरणची कामगिरी दिशादर्शक

■ जनप्रवास प्रतिनिधी

**मुंबई :** मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० तसेच मागेल त्याला सौर कृषिपंप या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महावितरणची कामगिरी इतर राज्यांसाठी दिशादर्शक आहे. राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी सुरु असलेल्या या योजनांची माहिती घेतल्यानंतर मध्यप्रदेशच्या पथकाकडून हे गौरवोद्गार काढण्यात आले.

मध्यप्रदेशच्या पथकाने अभ्यास दौऱ्यात बुधवारी (१५ एप्रिल) महावितरणचे मुख्यालय प्रकाशगड येथे सौर ऊर्जेतून कृषिपंपांना वीजपुरवठा करणाऱ्या योजनांची सविस्तर माहिती घेतली. संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, कार्यकारी संचालक दत्तात्रय पडळकर, मुख्य अभियंते ज्ञानेश कुलकर्णी, पंकज तगलपल्लेवार, विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी सादरीकरणाच्या माध्मातून योजनांची सविस्तर माहिती दिली. मध्यप्रदेशच्या पथकात मध्यप्रदेश पॉवर मॅनेजमेंट कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक गुरुदीप सिंग कनुजा, सहाय्यक महाव्यवस्थापक धिरज कुमार मुनिया, अधीक्षक अभियंता चिंतामणी ठाकर, व्यवस्थापक शंकर नारायण अग्रवाल, विनोद राऊत यांचा समावेश होता. जगातील सर्वांत मोठा १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत ३ हजार १८७ कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १२ लाख ८२ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा ४ हजार ७७९ मेगावॅट विजेचा पुरवठा उपलब्ध झाला आहे.

# लाठ्या काठ्याने जबर मारहाण, उपचारादरम्यान शेतकऱ्याचा मृत्यू

## २४ तासांत आरोपी खर्डा पोलिसांच्या ताब्यात

■ जनप्रवास प्रतिनिधी

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील पिंपळगाव उंडा या गावात दि १२ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७ वाजता लाठ्या काठय़ांनी जबर मारहाणीची घटना घडली. या हल्ल्यात पिंपळगाव येथील शेतकरी विष्णु मुरलीधर मोहळकर व त्यांच्या मुलाला आरोपी रविंद्र अर्जुन शिंदे, कृष्णा रविंद्र शिंदे, समर्थ राजेंद्र शिंदे व सुवर्णा रविंद्र शिंदे (सर्व रा. पिंपळगाव उंडा) यांनी लाठ्या, लोखंडी गज व लाथाबुक्यांनी मारहाण जबर केली. यामध्ये मुरलीधर दगडू मोहळकर (७०) यांना डोक्यात,छातीत व पाठीवर जीवे मारण्याच्या उद्देशाने वार केले यामध्ये ते गंभीर जखमी झाले .त्यांच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते मात्र

उपचारादरम्यान १५ एप्रिल रोजी दुपारी ३:१५ वाजता त्यांचा मृत्यू झाला. याबाबत खर्डा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ५१/२०२६ मध्ये भारतीय न्याय संहिता कलम १०३ (हत्या), १०९(१), ११८(१), ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी विष्णू मुरलीधर मोहळकर यांनी फिर्यादीत म्हटले आहे की आरोपींनी आमच्या घरासमोर धावत येऊन ''तू कोण आम्हाला आडवणारा? आम्ही कोठूनही ट्रेन शेतात बसेन, तुला काय करायचं ते कर'' असे म्हणून शिवीगाळ व धमक्या दिल्या.तसेच आरोपी रविंद्र शिंदे,कृष्णा शिंदे, समर्थ शिंदे, सुवर्णा शिंदे यांनी लाकडी काठीने विष्णू व त्यांच्या मुलाची पाठीवर मारहाण केली तर मुरलीधर यांना डोक्यात व पाठीवर वार केले.

सदर मारहाणीचा १३ एप्रिल रोजी गुन्हा दाखल केला होता. मुरलीधर दगडु मोहळकर यांच्या मृत्यूनंतर गून्हयात हत्येचे कलम वाढवले.




वरिष्ठांच्या आदेशानुसार खर्डा पोलीस स्टेशनचे स.पो. नि.उज्वलसिंह राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली

सहाय्यक फौजदार रईस सय्यद, पोहेकॉ संभाजी शेंडे, गोकुळ इंगवले, पोकॉ. शशी म्हस्के, राहुल शिंदे, गणेश बडे यांच्या पथकाने तातडीने आरोपींचा शोध घेतला असता रविंद्र शिंदे याला २४ तासांत अटक केली. उरलेल्या तीन आरोपींचा शोध सुरू आहे.

# बायको तुमच्यावर सतत भडकतेय? सतत फुगून बसतेय?

लग्न नावाच्या नात्यात एकमेकांना वेळ देणं जितकं गरजेचं तितकंच लहानसहान गोष्टींकडे लक्ष ठेवणंही. ते चुकलं तर संसाराचा तोल आणि ताल चुकायला लागतो.

अनेकदा नवऱ्याला वाटतं की आपण इतकं चांगलं वागतो, इतके पैसे कमावून आणतो. बायको जे जे मागेल ते ते देतो. तिला काही कमी पडू देत नाही. संसाराच्या गरजा भागवतो, त्यासाठी मरमर राबतो तरी हिचं तोंड वाकडंच. कायम पापड मोडलेला. सतत चिडचिड. टोमणे मारणं. हिला काय कमी पडतं हेच कळत नाही. सतत भांडणं उकरून काढते. ती असं का वागत असेल? याचा जर नीट अभ्यास केला तर ढोबळमानानं काही कारणं सापडतात. ही कारणं म्हणजे हमखास नवरा बायकोच्या भांडणाचं मूळ. बाकी व्यक्तिगत कारणं तर असतातच. पण ही कारणं अशी आहेत की, बायकोला वाटतं नवऱ्याचं आपल्याकडे दुर्लक्ष होतं. त्याचं आपल्याकडे लक्ष नाही. तो आपल्याला भाव देत नाही. आणि आपण नवऱ्यासाठी काहीच महत्वाच्या नाही. असं वाटतं म्हणून ती कटकटत राहते. कधी उघड नाराजी व्यक्त करते कधी हुप्प फुगा होते. तर तो ता फुगा का होतो याची ही ५ कारणं. पुरुष या चूका करतात आणि म्हणून बायकोचा फुगा होतो.



**१) काही कॉम्प्लिमेण्ट देत नाही.**

अनेक पुरुष बायकोला चुकून कधी कॉम्प्लिमेण्ट देत नाही. म्हणजे कुठं बाहेर जायचं असो, तिनं नवीन ड्रेस घातलेला असो, नवीन दागिना, हेअरस्टाईल, पर्स हे सारं ते नोटीस करत नाहीत. विचारलं कसं दिसतं तरी बरंय यापलिकडे काही बोलत नाहीत. किंवा फार काही भारी नाही म्हणत टवाळी करतात.आणि बायको भडकते.

**२) बायकोचा फोटो**

अलिकडे ऑफिसात डेस्कवर फॅमिली फोटो ठेवतात. पाकिटात ठेवतात. घरात फ्रेम करुन ठेवतात. मोबाइल स्क्रीन सेव्हर. फेसबूक प्रोफाइल, कुठंही बायकोचा चेहरा दिसत नाही. चुकून कधी बायकोचा फोटो पोस्ट केला जात नाही. मग बायकोला वाटतं की आपण याला आवडत नाही, याचं आपल्याकडे लक्ष नाही.

**३) कहीं पे निगाहे**

बाहेर जेवायला, फिरायला गेलं तरी लक्ष दुसऱ्या बाईकडे. किंवा मोबाईलवर मैत्रिणीशी बोलणं, बायको चिडणार नाही तर काय?

**४) गिफ्ट कधी दिलं?**


अनेक नवरे वर्षानुवर्षे बायकोला गिफ्ट देत नाही. शेवटचं कधी गिफ्ट दिलं त्यांना आठवत नाही. वाढदिवसालाही तुला आवडेल ते घेवून ये असंच सांगतात. त्यानं बायकोचा मूड जातो.

**५) सतत फोनमध्ये लक्ष**

बायको बोलतेय, पण आपलं लक्ष सतत फोनमध्ये. फोनवर गेम खेळताय नाही तर व्हॉट्सअॅप. बायकोचा भडका उडतो तो इथेच.

■■■

# फूड पॉयझनिंगवर रामबाण ठरतील हे साधेसोपे उपाय



उन्हाळ्यात बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरते. या मोसमात खाद्य पदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइझनिंगचा त्रास उद्भवतो. यापासून बचावासाठी काही टिप्स लक्षात ठेवा...

**लिंबू-पाणी :** लिंबामध्ये अँटी-इंफ्लेमेटरी, अँटिबॅक्टेरियल आणि अँटिव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू-पाणी प्यायल्याने बॅक्टेरिया मरतात. अनशापोटी लिंबू-पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून घेऊ शकता. मात्र, पाणी स्वच्छ असावे.

**दही :** दही एका प्रकारे अँटिबायोटिक आहे आणि यात जरासे काळे मीठ घालून त्याचे सेवन केल्यास आराम मिळेल. यामुळे फूड पॉयझनिंग होण्याची शक्यता कमी राहते.

**लसूण :** लसणामध्ये अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.

**तुळस :** तुळशीत आढळणारे अँटिमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांचा सामना करतात. तुळस अनेक प्रकारे आहारात समाविष्ट करता येईल. एक वाटी दह्यात तुळशीचे पान, काळी मिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

# स्मार्टनेसमुळे आत्मविश्वास वाढतो

आजच्या धावपळीच्या जगात जो तो 'परफेक्ट' बनण्याचा प्रयत्न करीत असताना आपला आत्मविश्वास कसा वाढेल, याकडे लक्ष देतो. विश्वास ही एक अशी चावी आहे, जिचा वापर केल्याने आपल्या प्रगतीची कवाडे चुटकीसरशी खुली होऊ शकतात. पण ते म्हणतात ना की, अल्लाउद्दीनचा दिवा मिळाला तर जीवनच बदलून जाते. पण तो कुठे मिळतच नाही. अगदी याचप्रमाणे आत्मविश्वासदेखील प्रत्येकाकडे असतोच असे नाही. तो प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग ठरतोय असे नाही. याच कारणास्तव एक चांगला बुद्धिमान मनुष्य पात्रता असूनही तिथंपर्यंत पोहोचू शकत नाही जिथंपर्यंत त्याने पोहोचायला हवे होते. आपल्या व्यक्तिमत्त्वात आत्मविश्वास असेल, तर एक चांगली पोस्ट आपल्या हातून कुठेच गेली नाही, हे नक्की समजा 'आपण स्मार्ट किंवा गुडलुकिंग नाही त्याचं काय ?' हा विचार आपल्या डोक्यातून सर्वांत पहिल्यांदा काढून टाका. गुडलुकिंग नसल्याने आपण कॉन्फिडन्ट होऊ शकत नाही, हा आपला गैरसमज आहे. स्मार्टनेसमुळे आत्मविश्वास वाढतो हे नक्की; मात्र आपले विचार चांगले असतील, तर आपणही 'कॉन्फिडन्ट पर्सनॅलिटी' बनू शकता.

आपले विचार हे नेहमी सकारात्मकतेला धरून असावेत. आपल्या डायरीच्या पानांवर आपल्या चुका वा स्वतःबद्दल वाईट-साईट लिहिण्यापेक्षा आपल्या हातून घडलेल्या चांगल्या कामांची नोंद करा.

# आपल्या घरात छोटे मूल असेल तर खालील दक्षता पाळा

मुले खट्याळ असणे स्वाभाविक असते व बऱ्याचदा मुलांच्या खोड्यांमुळे त्यांच्या सोबतच मोठ्यंनाही त्रास होतो. जर आपल्या घरात छोटे मूल असेल, तर ते सुरक्षित राहण्यासाठी आपण सावध राहायला हवे. खालील दक्षता बाळगायला हवी.

0 ब्लेड, कात्री, रेझर, चाकू इ. सारख्या सर्व धारदार वस्तू बाळाच्या हाती लागणार नाही अशा ठेवा. पेन्सिल, पेनही दूर ठेवा.

0 पेट्रोल, डिझेल, रॉकेल, अॅसिड इ. स्टोअररूममध्येच ठेवा.

0 बूट पॉलीश, ब्रश, टूथपेस्ट, क्रीम, आफ्टर शेव्ह लोशन इ. वापरल्यानंतर कपाटातच ठेवा.

0 औषधे, मद्य, वेदनाशामक गोळ्या, बाम बंद कपाटात ठेवा.

0 बाथरूमचा दरवाजा कधीही उघडा ठेवू नका.

0 सुई, बटणे, पीना, हेयरपीना इ. वस्तू भक्कम झाकणाच्या डब्यात ठेवा.

0 सायकल, मोटारसायकल, स्कूटर इ. वाहने साइडस्टॅण्डवर उभी करू नका.



0 विजेची बटणे, प्लग इ. जर खाली असतील तर ती टेपने झाका.

0 मुलांच्या गळ्यात दोरा, ताइत इ. कधीही जास्त आवळून बांधू नका.

0 गॅस सिलेंडरपासून मुलांना नेहमी दूर ठेवा. कधीही त्याच्याशी मुलांना खेळू वा छेडछाड करू देऊ नका.

0 रूममध्ये कोठेही कमी उंचीवर खिळा असेल, तर तो त्वरीत काढून टाका.

0 मेणबत्ती, उदबत्ती, धूप इ. कधीही मुलांच्या हाती लागेल अशी ठेवू नका.

# ऑफिसात आपले वागणे संयमित असावे...

यश मिळविण्यासाठी ही जाणीव आपल्याकडे असणे अत्यंत जरुरीचे आहे. तुम्ही कामाच्या ठिकाणी खूप मेहनत करता शिवाय आपली योग्यताही इतरांच्या तुलनेत जास्त असते; पण जेव्हा प्रमोशन होण्याची वेळ येते, तेव्हा मात्र, आपल्यापेक्षा कमी योग्यतेची व्यक्ती बाजी मारते. असे प्रसंग बऱ्याचदा घडत असतात. मग मात्र, तुमचा राग अनावर होणार हे निश्चित ! पण त्यावेळी रागावण्यापेक्षा किंवा उगाचच स्वत:ला त्रास करुन घेण्यापेक्षा त्या गोष्टीच्या मुळापर्यंत जाऊन शोध घ्या की, त्या तुमच्या सहकाऱ्यांमध्ये अशी कोणती गोष्ट होती, ज्यामुळे तुम्हाला प्रमोशन मिळण्याऐवजी ते त्याच्या पदरात पडते ?

ऑफिसमध्ये आपण जसे, वागतो, त्याचा सरळ सरळ परिणाम आपल्या प्रगतीवर होत असतो, याची जाणीव आपल्याजवळ असायला हवी. यशप्राप्तीसाठी केवळ बुद्धीच उपयोगी पडते असे नव्हे, तर त्यासाठी आपले वर्तनही तसे असावे लागते. आपल्या कामाच्या ठिकाणी गेलेले योग्य वर्तन आपल्याला आपल्या ध्येयप्रत पोहोचवू शकते ! ऑफिसात आपले वागणे संयमित असले पाहिजे. आपल्या व्यक्तीमत्त्वातून घाबरटपणा, अहंकार, दांभिकता आदी अवगुणांचे दर्शन घडता कामा नये. याचाच अर्थ असा की, गुड सेन्स ऑफ ह्युमर आणि सीरियसनेस दोघांचे संतुलन असायला पाहिजे. तुम्ही जर उच्चपदस्थ असाल, तर आपल्या पदाचा मान कसा राखता येईल, याकडे लक्ष देणे अत्यंत महत्वाचे आहे. सहकाऱ्यांच्या भावना दुखवतील, असे वागू नका. आपली प्रगती होण्यात आपल्या सहकाऱ्यांचेही मोठे योगदान असते.



♦आपल्या सहकाऱ्यांशी, नातेवाईकांशी अथवा मित्राशी बोलताना आपल्या बोलण्याच्या शैलीवर विशेष लक्ष द्या .

♦खरे तर बोलण्याची पद्धत ही प्रत्येक ठिकाणी धरुनच असली पाहिजे.

♦ऑफिसमध्ये काम करताना, आपण कितीही कॅपेबल किंवा स्मार्ट का असेनात, आपली बोलण्याची पद्धत ठीक नसेल, तर आपल्याला कुणीही पसंत करणार नाही.

♦आपल्या मुद्दा विश्वासपूर्वक मांडा, बोलताना गडबड गोंधळ करु नका.

♦ऑफिसमधील राजकारणात पडू नका. कारण असे करण्याने तुमचा फायदा

# जो पती आपल्या पत्नीचा उत्तम मित्र बनतो

जो पती आपल्या पत्नीचा उत्तम मित्र होऊन राहतो त्याचे वैवाहिक जीवन आनंदाचे भरलेले राहाते व त्यात ताणतणावाला वावच राहात नाही. जर आपणही आपल्या पत्नीचे दोस्त होऊ इच्छित असाल तर फक्त काही गोष्टी लक्षात ठेवा.

जो आपल्या मनातील विचार बिनदिक्कत बोलतो तोच खरा मित्र असतो. यासाठी आपली सुख-दु:खे, प्रत्येक छोटी-मोठी गोष्ट आपल्या पत्नीशी शेअर करा.

आपल्या कुटुंबियांसाठी ज्या आदराची अपेक्षा आपण आपल्या पत्नीकडून करता तोच आदर तिच्या माहेरच्या कुटुंबियांसाठी करा. यामुळे आपले संबंध दाट होतील व पत्नी स्वत:च तिच्या सासरच्या माणसांचा मान राखील.

कोणताही निर्णय घेण्यापूर्वी पत्नीचा सल्ला अवश्य घ्या. मित्र नेहमी चांगला सल्ला देतात व पत्नीहून चांगला मित्र मिळणे अत्यंत कठीण असते.

घरातील व बाहेरील कामांमध्ये पत्नीला मदत करा. घरातील कामे करायला कचरू नका. प्रत्येक कामात तिला मदत करण्याचा प्रयत्न करा.

बहुधा पतींना पत्नींच्या वाढदिवसाच्या, लग्नाच्या तारखा लक्षात राहत नाहीत. प्रयत्नपूर्वक लक्षात ठेवून त्यावेळी तिला सरप्राइज द्या.

वेळोवेळी पत्नीला उपहार (भले एखादे फूल का होईना) देत राहा. तो आपल्या या मैत्रिणीच्या चेहऱ्यावर हास्य फुलवू शकतो.

काही पतिराज पत्नीवर हुकमत गाजवणे आपली शान समजतात. अशा जोडप्यांमध्ये मनस्वी प्रेम निर्माण होत नाही. पत्नी सतत घाबरलेली राहते. यासाठी पत्नीला भीती दाखवून नव्हे, तर प्रेमाने जिंका.

जर आपली पत्नी कमावती असेल व आपल्या कमाईतून सर्व खरेदी करण्याचे तिला स्वातंत्र्य असेल तरी आपली कमाईही तिला आणून द्या. पतीची कमाई हाती येणे तिला गौरवास्पद वाटते.

# काही लोक एखाद्याची चूक विसरतात



आपण जसजसे यशस्वी होत जातो, तसतशी आपल्याला यशाची धुंदी चढत जाते. मी यशस्वी होतोय. मी धंद्यात यशस्वीपणे मोर्चेबांधणी करतोय. माझे व्यावसायिक अंदाज कधीच चुकत नाहीत. या गोष्टी आपल्याला यशाची नशा आणतात आणि असे यश जेव्हा प्रमाणाच्या बाहेर शरीरात भिनते. तेव्हा ताठा, गर्व व दुसऱ्याची अवहेलना करण्याची प्रवृत्तीही बळावते. 'तू चुकलास कान धर !' 'पुन्हा माझ्यासमोर, उभा राहू नकोस.' 'मूर्ख आहेस, एवढं साधं कळत नाही, असं म्हणत आपण आपल्या हाताखालच्या लोकांवर डाफरू लागतो. पण हे आपण लक्षात घेत नाही की, त्याला जर आपल्याएवढीच बुद्धी असती तर तो कदाचित आपल्या खुर्चीवर बसला असता ! नशीब हा भाग वेगळा !

खरं तर जेवढे आपण यशस्वी होत जातो. तेवढेच आपण आपले आयुष्य गुंतागुंतीचे करत असतो आणि हा वाढलेला व्याप सांभाळायला कोणीतरी हवा असतो. जवळचा, विश्वासातला ! असा जवळपास कोणी दिसत नसेल तर ही यशाची धुंदी उतरवण्यासाठी आपल्यात क्षमाभाव असणे अत्यंत गरजेचे असते. जर आपण असेल धुंदीत वागत गेलो तर एक दिवस असा येईल की, जवळपास आपला असा कोणीच असणार नाही. काही लोक त्यांच्याबरोबर झालेल्या चुकीच्या व्यवहारास कधीही विसरत नाहीत. चुकणाऱ्याला सारखे धारेवर धरत असतात. काही लोक एखाद्याची चूक विसरतात पण क्षमा करत नाहीत. या जगात दयेपेक्षा, विसरणे व क्षमा करणे अधिक सोपे आहे. विसरण्यासाठी व क्षमा करण्यासाठी तुम्ही श्रीमंत असले पाहिजे असेही काही नाही. फक्त तुम्ही तुमची विचार करण्याची पद्धत बदला. त्यासाठी परिपक्व बनणे गरजेचे असते. परिपक्व विचार तुम्हाला इतरांना कसे सांभाळून घ्यावे, हे शिकवतो. याबाबत इंग्रीड बेगमन हा विचारवंत म्हणतो की, खरा आनंद फक्त चांगली प्रकृती आणि वाईट स्मरणशक्ती यांच्यातच सामावलेला आहे. वाईट स्मरणशक्ती तुम्हाला क्षमा करण्यास व विसरण्यास योग्य बनवते. क्षमा करा व विसरा हे तत्व तुमच्या यशस्वीतेला चार चाँद लावेल.

याबाबतची एक सत्यकथा अशी आहे : प्रख्यात संशोधक थॉमस एल्वा एडिसन यांनी आपल्या प्रयोगशाळेच्या देखरेखीसाठी एक पहारेकरी नियुक्त केला व त्याला सूचित केले की, माझ्या प्रयोगशाळेत कुणाही अस्वच्छ, गचाळ माणसाला आत सोडू नकोस. माझं डोकं खातील अशांना तर मी उभंही करू इच्छित नाही. पहारेकरी हो म्हणाला व पहाऱ्यावर उभा राहिला. पहारेकरी आठ तास खडा पहारा देऊन निघून जात असे व दुसऱ्या दिवशी अगदी चकाचक बनून ड्युटीवर येत असे. पहातो तर काय, एक दिवस एक गबाळ्या, दाढी वाढलेला इसम प्रयोगशाळेचे दार उघडतो आहे. त्या पहारेकऱ्याने त्याला अडवले व म्हणाला, एडिसनसाहेबांनी कुणाही गचाळ, गबाळ्याला आत सोडू नकोस म्हणून सांगितले आहे. कृपया तुम्ही येथून जा. अरे बाबा, मीच तो एडिसन आहे. आठ दिवस मी माझ्या कामात गर्क होतो म्हणून माझी अशी अवस्था झाली आहे. ते मला माहीत नाही पहारेकरी म्हणाला. अखेर एडिसन महाशयांना दुसऱ्यांना बोलावून आणून स्वतःची ओळख पटवावी लागली. एडिसनने त्या पहारेकऱ्याला मोठ्या मनाने क्षमा केली. काही वेळा आपणच आपल्या यशस्वीतेसाठी काही नियम बनवतो व ते आपल्यालाच जाचक ठरतात. एडिसनने समाजोपयोगी हजारच्यावर वस्तूंचे संशोधन केले. जगन्मान्य होते ते. पण दयाळू, क्षमाशील व फार विसराळूसुद्धा होते.

# जेवण हे साध्य नसून शरीर तरतरीत व तंदुरुस्त ठेवण्याचे साधन

काहीजण म्हणतील हा काय प्रश्न झाला. भूक लागली की जमेल तसे जेवावे. परंतु हे योग्य नव्हे. कारण आपण शरीर क्रियाशील राखण्यासाठी व निरोगी ठेवण्यासाठी जेवत असतो. जेवण हे साध्य नसून शरीर तरतरीत व तंदुरुस्त ठेवण्याचे साधन आहे.

- जेव्हा थकले-दमलेले असाल तेव्हा जेवू नका. थोडेसे फ्रेश होऊनच जेवा. यासाठी तोंड, हात, पाय धुणे व डोळ्यांवर पाण्याचा सपकारा मारणे हा उत्तम व स्वस्त उपाय आहे.
- ठराविक वेळीच जेवा. शांत चित्ताने, मांडी घालून, तणावरहित होऊन जेवावे. अन्न व्यवस्थित चावून खाल्ल्यामुळे ते सुपाच्य होते व चटकन पचते. त्यात लाळ जास्त प्रमाणात मिसळते. पोटातही पाचक द्रव्यांची पचनास मदत होते.



- भूक असेल तरच जेवावे. शक्यतो ठरलेल्या वेळीच जेवावे. जर भूक नसेल तर एखाद्या वेळचे जेवण रद्द करावे.
- भुकेच्या वेळी जेवण न केल्यास खूपच हानी होते.
- भूक टाळणे योग्य नव्हे. यामुळे अशक्तपणा येऊ लागतो.
- फक्त दोन मुख्य जेवणे करावीत व एकदा नाश्ता घ्यावा. तीनदा जेवण घेतल्यानेही माणूस रोगट होतो.
- नाश्ता व दुपारच्या जेवणात ४ तासांचे अंतर असावे. दोन्ही मुख्य जेवण्यात ७ तासांचे अंतर असावे. रात्रीच्या जेवणात व नाश्त्यामध्ये ११ तासांचे अंतर योग्य समजले जाते.
- झोपण्यात व जेवणास तसेच संभोग व रात्रीचे जेवण यामध्ये किमान दोन तासांचे अंतर असावे. रात्रीच्या जेवणानंतर शतपावली म्हणजेच फिरणे आवश्यक असते.
- आठवड्यातून एक उपवास करावा व त्या दिवशी हलका आहार घ्यावा.
- अन्न चावून खाल्ल्यास दात व हिरड्यांना बळकटी येते.
- भूक लागल्यानंतर जेवल्यास अन्न सहजतेने पचते. ढेकर शुध्द येतात. गॅस कमी तयार होतो व सहजपणे बाहेर पडतो.

# शेव्हिंग करणे म्हणजे एक मोठे कामच

शेव्हिंग करणे म्हणजे एक मोठे कामच असते. कितीही दक्षता बाळगली तरी दरवेळी त्वचा कापली जाते. हा त्रास टाळण्यासाठी खालील दक्षता बाळगा.

0 शेव्ह करण्यापूर्वी पाणी लावायला विसरू नये. जर वेट शेव्ह आवडत असेल, तर पाणी जास्त वापरावे.

स्किन सुरक्षित राखण्याची उत्तम पध्दत म्हणजे ती प्रथम स्टीम करणे. यामुळे त्वचा जास्त स्वच्छ, ओली राहील व पोर्स मोकळे राहिल्यामुळे त्वचेची आग कमी होईल.



0 आपल्या सोयीनुसार तेच शेव्हिंग क्रीम व रेझर वापरावे जे सॉफ्ट स्किनसाठी बनवलेले असेल व ज्यामध्ये रेझर बर्न प्रोटेक्शन असेल. जेलऐवजी क्रीमच खरेदी करावे कारण क्रीम जास्त आर्द्र असते व ते शेव्हिंग दरम्यान होणाऱ्या जळजळीपासून आराम देते क्रीम लावण्याने शेव्हिंग करणे सोपे जाते.

0 इलेक्ट्रिक रेझरने मुलायम त्वचेसाठी असणारी एलोस्ट्रिप असावी. त्या रेझरचे हॅण्डल लांब असावे.

0 आपल्या त्वचेसाठी उपयुक्त रेझर कोणते याबाबत फार्मासिस्टचा सल्ला घ्यावा.

0 शेव्हिंग क्रीम वाचवण्यासाठी ते कमी वापरू नये. रेझर बर्न टाळण्यासाठी जास्त क्रीम वापरावे. शेव्हिंग करताना रेझरचा योग्य अँगल ठेवावा.

रेझरचा त्वचेवर जास्त दाब देऊ नये. हलक्याशा दाबानेही उत्तम शेव्हिंग होऊ शकते.

0 त्वचा कापली गेल्यास त्वचेला आराम द्यावा. मॉइश्चरायझर लावल्यास त्वचा मऊ मुलायम होईल.

आग होत असल्यास गरम पाणी पाणी लावण्यानेही आराम पडतो. कापलेल्या त्वचेसाठी अनेक स्किन सेव्हिंग प्रॉडक्टस् बाजारात मिळतात.

**महत्वाच्या सूचना -**

0 रेझरमध्ये नेहमी नवे ब्लेड वापरावे. जुन्या ब्लेडने दाढी केल्यास त्वचेत आग होते.

0 जर दाढी जास्त वाढली असेल तर गरजेनुसार ब्लेड वापरावे.

0 शेव्हिंग क्रीम नेहमी थंड पाण्याने धुवावे.

0 शेव्हिंग नंतर त्वचा सुकवावी. त्वचा कापल्यास त्यावर अॅण्टिसेप्टिक क्रीम लावावे.

# आईच्या हास्यात एक वेगळेच महत्व

निसर्गाने आपल्याला ज्या अनमोल देणग्या दिल्या आहेत, त्यातील एक अनमोल देणगी म्हणजे मधुर स्मित. जी प्रेम आणि मैत्रीचा संदेश देते. हसरा चेहरा सर्वांनाच आवडतो. स्मितहास्य एखाद्या कामात यश देण्यात महत्वाचे योगदान देते. बाळाचे स्मित निश्चिल असते. हसरे बाळ अतिशय गोंडस वाटते. त्याला चटकन उचलून घ्यावेसे वाटते. बऱ्याचदा बाळाच्या हास्यातून त्याचा अवखळणा दिसत असतो.

आईच्या हास्यात बाळाबद्दलची ममता, जिव्हाळा दडलेला असतो. बाळ आईच्या हास्याने आनंदीत होते. त्याला सुरक्षित वाटू लागते. डॉक्टरांचे हास्य रोग्याला अमृतासारखे वाटते. जर डॉक्टर हसतमुख स्वभावाचे असतील, तर रोगी त्यांच्याकउे आदराने पाहतो. तर चिडखोर व चेहऱ्यावर नेहमी रागीट भाव राखणाऱ्या डॉक्टरांबद्दल रोग्याला आदर वाटत नाही. उलट त्याच्या मनात एक भीती राहते. दोन माणसांमधील मैत्री वाढविण्यात हास्याचे एक वेगळेच महत्व असते. बरेचजण हास्याला मैत्रीची पहिली पायरी समजतात. त्यांच्यामते हास्य मैत्रीचा हा पुढे करण्याची प्रेरणा देते. शिक्षकांच्या हास्याला विद्यार्थी आपल्या अभ्यासाचे श्रमाचे सार्थक मानतात. शिक्षक आपल्या हास्यातून विद्यार्थ्यांबद्दलची आपली आत्मियता व्यक्त करीत असतात. जेव्हा आपण तणावग्रस्त असतो तेव्हा हास्य आपल्याला तणावापासून मुक्त करते. एखाद्याचा हसरा चेहरा पाहून मन प्रसन्न होते, टवटवीत होते. आपल्या दु:खाचे सुखात रुपांतर करण्याची शक्ती हास्यामध्ये आहे. स्मितहास्याचे आपल्याला अनेक फायदे होतात. तर मग या सुखाला, आनंदाला जीवनातील प्रत्येक क्षणी जोपासण्यासाठी नेहमी हसतमुख रहा.

■■■

# सुरकुत्या नष्ट करण्यासाठी जमिनीवर अथवा खुर्चीवर सरळ बसावे

साधारणत: वाढत्या वयाबरोबर त्वचेतील पेशींची क्रियाशीलता कमी होत जाते. परंतु नियमित स्वरूपात योग्य व्यायाम केल्याने यापेशी सदैव अॅक्टिव्ह राहू शकतात. यामुळे चेहरा व मान या भागांतील सुरकुत्यांवर अटकाव होतो आणि त्वचेतील ताण टिकून राहातो. यासाठी योग्य व्यायाम आणि उचित खानपानाची आवश्यकता असते. यामुळे त्वचा तरूण राहण्यास साह्य मिळते.तथापि एक वेळ अशी येते की, त्वचेची लवचिकता कमी होऊन चेहऱ्याची चमक कमी होते आणि वाढते वय दिसून येते. त्वचेची अशी स्थिती होण्यामागची अनेक कारणे आहेत, जसे शरीराचे वजन एकदम कमी होणे, व्यस्त जीवनशैली, वयाचा परिणाम, आहारातील पोषक तत्वांचा अभाव, ताण-तणाव वगैरे या सर्व कारणांमुळे त्वचेतील ताण कमी होऊन त्यावर सुरकुत्या येऊ लागतात. या कारणे चेहऱ्याला आकर्षपणा कमी होतो.

प्रत्येकाची इच्छा असते, की आपण तरूण आणि सुंदर दिसावे. म्हणून कित्येक महिला आपल्या वाढत्या वयाचा परिणाम कमी करण्यासाठी कित्येक प्रकारचे ब्यूटी प्रॉडक्टस्चा उपयोग करतात. तसेच ब्यूटीपार्लर्सचा आधार होतात.



0 मानेच्या भागातील सुरकुत्या नष्ट करण्यासाठी प्रथम जमिनीवर अथवा खुर्चीवर सरळ बसावे आणि डोके मागच्या बाजूला वाकवून आकाशाकडे पाहावे.

या दरम्यान ओठ बंद ठेवून तोंडाची हालचाल अशाप्रकारे करावी, जणू आपण काही चावत आहात. आपणास जाणवेल, की आपल्या मानेच्या नसांत ताण आला आहे, असे वीस ते तीस वेळा करावे.काही दिवसांतच प्रभाव दिसून येईल.

0 हनुवटीलायोग्य आकार आणण्यासाठी डोके मागच्या दिशेने नेऊन तोंड उघडावे आणि पुन्हा बंद करावे. असे पंधरा ते वीस वेळा करावे. लवकरच आपल्या हनुवटीला योग्य शेप येईल.

0 चेहऱ्याची त्वचा आकर्षक होण्यासाठी चेहऱ्याचे स्नायू ओढून घ्यावेत आणि पुन्हा शिथिल करावेत. नंतर जबडा खोलावा आणि ताणून बंद करावा, असे कमीत कमी वीस वेळा करावे. याने चेहऱ्याच्या भागातील नसांवर ताण येऊन चेहऱ्याची त्वचा आकर्षक व तरूण दिसू लागते.

0 भुवया आणि त्यांमधील भागात लवकर सुरकुत्या दिसू लागतात. यासाठीही व्यायाम उपयुक्त ठरतो यासाठी प्रथम आपल्या भुवया वरच्या दिशेने ताणून घ्याव्यात आणि डोळे जास्तीत जास्त उघडण्याचा प्रयत्न करावा. अशा प्रकारच्या साध्या-साध्या व्यायामांनी चेहरा आकर्षक होण्यास मदत होईल.

# कडक उन्हाळ्यात दह्यात 'या' 3 खास गोष्टी मिसळून लावा चेहऱ्याला

## फेशियलसारखा ग्लो, स्कीन थंड, मऊ ठेवणारा सोपा उपाय



उन्हाळ्यात त्वचेवर उष्णता, घाम आणि प्रदूषणाचा परिणाम होऊन टॅनिंग, निस्तेजपणा आणि तेलकटपणा वाढतो. अशावेळी दह्याचा फेस पॅक हा एक नैसर्गिक आणि प्रभावी उपाय ठरतो. दह्यामध्ये असलेले लॅक्टिक ॲसिड त्वचेचे सौम्य एक्सफोलिएशन करून मृत पेशी काढून टाकते आणि त्वचेला मऊ बनवते. दही त्वचेला थंडावा देऊन जळजळ कमी करते आणि ओलावा टिकवून ठेवते. मध, बेसन, हळद, काकडी किंवा ओट्स मिसळून वेगवेगळे फेस पॅक तयार करता येतात. योग्य पद्धतीने आणि मर्यादित प्रमाणात वापरल्यास त्वचा निरोगी, स्वच्छ आणि टवटवीत दिसते.

**उन्हाळ्यात दह्याचा वापर का करावा?**

उन्हाळ्यातील प्रखर उष्णता, सततचा घाम, धूळ आणि प्रदूषण यांचा आपल्या त्वचेवर खोलवर परिणाम होतो. यामुळे त्वचा निस्तेज होणे, टॅनिंग होणे, चेहऱ्यावर अति तेल साचणे किंवा काही वेळा त्वचा कोरडी पडणे अशा समस्या उद्भवतात. अशा काळात जड ब्युटी प्रोडक्ट्स वापरण्याऐवजी अनेकजण नैसर्गिक आणि थंड पर्यायांना पसंती देतात. 'दही' हा उन्हाळ्यातील स्किनकेअरसाठी एक उत्तम आणि सहज उपलब्ध होणारा पर्याय आहे. एक त्वचाविकार तज्ज्ञ म्हणून मला सांगावेसे वाटते की, दह्यामध्ये असलेल्या 'लॅक्टिक ॲसिड'मुळे त्वचेचे सौम्य एक्सफोलिएशन होते, ज्यामुळे मृत पेशी निघून जातात. दह्याचा नैसर्गिक थंडावा उन्हामुळे आग होणाऱ्या त्वचेला शांत करतो आणि त्वचेचा ओलावा टिकवून तिला मऊ आणि संतुलित ठेवतो.

**उन्हाळ्यात दह्याचा वापर का करावा?**

दह्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे ते सर्व प्रकारच्या त्वचेसाठी उपयुक्त ठरू शकते. हे त्वचेतील अतिरिक्त तेल नियंत्रित करते आणि त्याच वेळी आर्द्रताही टिकवून ठेवते. दह्याच्या नियमित वापरामुळे त्वचेचा पोत सुधारतो आणि चेहऱ्यावर एक प्रकारचा ताजेपणा येतो. हे अत्यंत सौम्य असल्यामुळे त्वचेवर कोणताही जडपणा न जाणवता तुम्ही याचा वापर करू शकता.

**दह्यासोबत काय मिसळावे?**

तुमच्या त्वचेच्या गरजेनुसार तुम्ही दह्यामध्ये खालील घटक मिसळून फेस पॅक तयार करू शकता:

**दही + बेसन :** हे मिश्रण त्वचेला खोलवर स्वच्छ करते आणि अतिरिक्त तेल काढून टाकते. यामुळे त्वचा कोरडी न पडता उजळते.

**दही + मध :** जर तुमची त्वचा कोरडी किंवा थकलेली वाटत असेल, तर मध ओलावा टिकवून ठेवण्यास आणि नैसर्गिक चमक वाढवण्यास मदत करते.

# स्वस्तात मस्त राहायचे असल्यास 'हे' उपाय करा

आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर त्यात आहाराचा महत्त्वाचा वाटा असतो. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयींमुळेच आपल्याला आरोग्याच्या विविध तक्रारी उद्भवतात. पण तसे होऊ नये म्हणून योग्य वेळी, योग्य तो आहार घेणे गरेजेचे असते. आता चांगला आहार म्हणजे सफरचंद, सुकामेवा किंवा आणखी काही महागडे पदार्थ असे आपल्याला अगदी सहज वाटून जाते. मात्र तुम्हाला आरोग्य चांगले ठेवायचे असेल तर जास्ती पैसे खर्च करावे लागतात असे नाही. अगदी कमी खर्चातही तुम्ही खाण्यापिण्याचे तंत्र सहज सांभाळू शकता. पण त्यासाठी तुम्हाला योग्य गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. त्याबरोबरच इतरही गोष्टींची योग्य ती काळजी घ्यायला हवी.

**चालणे**

उत्तम आरोग्यासाठी चालणे हा अतिशय उत्तम व्यायाम आहे. आरोग्य चांगले ठेवायचे असल्यास तुम्ही फिट आणि कार्यशील असणे आवश्यक असते. आता फिट राहायचे म्हटल्यावर अनेक जण जिम किंवा ॲरोबिक्स, पॉवर योगा यांसारखे क्लासेस लावतात. पण आरोग्य उत्तम राहण्यासाठी



त्याची गरज नसते. तर केवळ चालण्यानेही तुमचा चांगला व्यायाम होऊ शकतो. मात्र यामध्ये सातत्य असणे अतिशय आवश्यक असते.

**भरपूर पाणी प्या**

शरीरातील बहुतांश भाग हा पाण्याने व्यापलेला असतो. पाण्याचे शरीरातील स्थान माहित असूनही आपण कामाच्या नादात किंवा इतर गोष्टींमुळे पाणी पिणे विसरतो. पण शरीराचे सर्व कार्य सुरळीत चालू आहे हे पाहण्यासाठी जास्तीत जास्त पाणी पिणे आवश्यक असते. त्यामुळे आरोग्याचा समतोल राखण्यास चांगली मदत होते.

**तुमचे अन्न घरीच बनवा**

तुम्ही तुमच्यासाठी घरी अन्न बनवता तेव्हा तुम्ही केवळ पैसे वाचवत नाही तर तुम्ही आरोग्यदायी अन्न खाता. आपल्यातील अनेकांना नेहमी जंक फूड खायची सवय असते. एखादवेळी असे पदार्थ खाणे ठिक आहे पण कायम जंकफूड खाणे आरोग्यासाठी अतिशय हानिकारक असते. त्यामुळे घरच्या घरी अन्नपदार्थ बनवा जे तुमच्या आरोग्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्याही परवडणारे असेल.

**स्वयंपाकातील आवश्यक मसाले घरच्या घरी पिकवा**

बागकाम करणे हा एक उत्तम छंद आहे. त्यामुळे तुम्ही रिलॅक्स तर होताच तसेच तुम्हाला मन फ्रेश वाटायला लागते. कोथिंबिर, मिरची, आलं, ओवा, कडिपत्ता यांसारखे लहान पदार्थ तुम्ही घरच्या घरी पिकवू शकता. यासाठी तुमचे घर खूप मोठे असायला हवे असेही नाही. कुंड्यांमध्येही याची रोपे चांगल्या पद्धतीने तग धरु शकतात. त्यामुळे तुमचा बाहेरुन या गोष्टी आणण्याचा खर्चही वाचतो आणि आपल्या हाताने पिकवलेल्या गोष्टी खाल्ल्याचा आनंद वेगळाच असतो.

# व्यवहार ज्ञानासाठी काही उपयुक्त टिप्स

समाजाची सरंचना पूर्णपणे युवा अवस्थेवर अवलंबून असते. समाजाची प्रगती युवकांमार्फतच होऊ शकते. आजचा युवा वर्गच उद्याची पारिवारिक स्थिती सांभाळेल व येणारी नवीन पिढी त्यांचे अनुकरण करेल. वर्तमान व भविष्य दोन्ही युवाच सांभाळू शकतील. युवावर्ग ही एक अशी शक्ती आहे की प्रगतीची क्रांती करुन विकासाचा मार्ग बनवू शकते. परंतु असे दिसून येते की, आपले व्यक्तीमत्व आकर्षक बनविण्यासाठी वर-वरती चमकधमक महत्वाची आहे असे आजकालचे युवा मानतात. चांगले कपडे घालणे, गाड्यांमध्ये फिरणे, पार्ट्यांना जाणे, महाग सौंदर्य प्रसाधने, वापरणे, महाग भेटवस्तू मित्र मंडळींना देणे इ. हे सर्व क्षणिक आकर्षण आहे. वास्तविक आकर्षण तर एखाद्या व्यक्तीच्या व्यवहारावरुन, त्याच्या सवयीवरुन व त्याच्यातील गुणांवरुन ठरविले जाते. व्यवहारिक ज्ञान कोणत्या शाळेतून, कॉलेजमधून पुस्तके वाचून मिळत नसते तर ते घर परिवार, शेजारी, समाज यांच्या निरीक्षणातून, ऐकून बघून प्राप्त होते.



- आपल्या व्यवहारात नेहमी सॉरी व थँक यू' हे दोन शब्दप्रयोग वापरा. तुमची प्रत्येक ठिकाणी स्तुती करतील.
- जीवनरुपी शृंगाराचा अत्यावश्यक हिस्सा म्हणजे विनम्रता यामुळे तुमचे व्यक्तीमत्व अजून उजळेल.
- आपल्या पेक्षा मोठ्यांचा आदर व लहांनाना स्नेहपूर्वक वागणूक द्या. समाजात स्नेह व सन्मान या एकमेकांच्या कड्या आहेत.
- घरात, नातेवाईकांमध्ये, मित्रांमध्ये वावरताना वातावरण शांतीपूर्ण असेल याकडे लक्ष द्या. आपल्या वाणीत माधुर्य आणा.
- आपली चूक स्वीकारायला शिका, त्यामुळे नवीन काही शिकायला मिळेल.
- इतरांची निंदा करण्याची प्रवृत्ती टाळा. त्यामुळे तुम्ही दुसऱ्यांच्या नजरेतून पडू शकता.
- मित्रांची खोटी स्तुती करु नका. उलट त्यांच्या चुका, कमजोरी, वाईट सवयी, दुर्गुण त्यांच्या निदर्शनास आणून द्या व सुधारण्यासाठी त्यांना मदत करा.
- इतरांना मदत करण्याची सहयोगी देण्याची सवय अंगी बाळगा दुसऱ्यांच्या सुख-दु:खात, आजारपणात त्यांची मदत करा.
- वेळेचे महत्व समजून घ्या व वेळेचा सदुपयोग करा.
- क्रोधाला आवर घाला, त्यापासून सावध रहा कारण क्रोध मनुष्याच्या स्वास्थाला व डोक्याला मेंदूला अतिशय हानिकारक आहे.
- मनात व डोक्यात नेहमी चांगले विचार ठेवा. सकुंचित विचार डोक्यातून काढून टाका.
- अंधविश्वासू बनू नका. कोणतीही गोष्ट तर्कशुद्ध कसोटीवर परिपूर्ण ठरल्यानंतरच तिचे पालन करा.
- नेहमी नव-नवीन शिकण्याची इच्छा बाळगा. शिकण्यासाठी वयाची अट नसते हे लक्षात ठेवा. प्रत्येकामध्ये काही ना काही चांगले गुण असतात ते गुण आत्मसात करण्याचा प्रयत्न करा.
- आपल्या कामात नेहमी मेहनत, इमानदारी आणि मन लावून काम करणे इ. चा समावेश असू द्या.
- स्वावलंबी बना. इतरांवर आपले काम सोपवू नका.

---

अ‍ॅड. सोमवंशी पी.एस.

**जाहिर नोटीस / समन्स.**

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र. १५) अहिल्यानगर यांचे कोर्टात.

**अपील अर्ज क्रमांक**
०२/२०२६
**नेमलेली तारीख :- २२/०४/२०२६**

**अपेलंट**
राजाराम सिताराम चौधरी व इतर
**रेस्पाँण्डट**
बाळु पिराजी चौधरी व इतर

ज्याअर्थी, सदरचे आर.टी.एस. अपील हे अपेलंट यांनी रेस्पॉण्डट यांचे विरुध्द मंजूर फेरफार क्र.८१६ दाखल केलेले आहे. सदर अपील अर्जातील **रेस्पॉण्डट क्र. ५) छावा सुरेश गायखे, १०) सुमन ज्ञानदेव तांबोळी, अ.क्र. ५ व १० रा.मु.काळेवाडी, पो. आणे, ता. जुन्नर, जि. पुणे १८) पोपट भागा चौधरी, रा. मंगळूर पारगांव, ता. जुन्नर, जि. पुणे २५ क ) छाया एकनाथ आहेर, रा. आणे, ता. जुन्नर, जि. पुणे रा. मु.पो. पिंपरखेड, ता. आंबेगाव, जि. पुणे ४१२४१० २५ इ) जिजा रमेश दाभाडे,** ४१०५०४ यांना वेळोवेळी आर.टी.एस. अपीलाचे नोटीस/समन्स पाठवुन देखील त्यांना नोटीस / समन्सची बजावणी होत नसल्याने व त्याचा रिपोर्ट देखील मे.कोर्टात येत नसल्याने सदर अर्जाचे कामकाज लांबणीवर पडत चालले आहे.

सबब, प्रस्तुत आर. टी. एस. अपीलामधील वर नमूद रेस्पाँण्डट यांना या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, आपण सदर आर.टी.एस. अपील क्र.०२/२०२६ चे कामी मे. कोर्टाने नेमलेली तारीख २२/०४/२०२६ रोजी स्वत: अगर आपण निर्देशीष्ट केलेल्या वकीलांमार्फत मे. कोर्टामध्ये हजर व्हावे व आपले म्हणणे सादर करावे, तसे न केल्यास सदर अर्जाबाबत आपले काही एक म्हणणे नाही, असे समजुन सदरील अपीलामध्ये आपल्या विरुध्द एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल. तसेच याव्दारे तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येते की, तुम्ही निर्दिष्ट दिनाकांस किंवा त्यापुर्वी बजावणी करण्यास तुमचा पत्ता मे कोर्टामध्ये देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

कामगिरी क्लर्क,
उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.१५) अहिल्यानगर

उपजिल्हाधिकारी (भुसंपादन क्र.१५)
अहिल्यानगर

---

**जाहिर प्रसिध्दी**

तमाम लोकांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीची (सिलींग कायद्यानुसार) मिळकत ही **सौ. ललिता अनिल भिसे, रा. नाझरे सुपे, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्या मालकी व ताबे वहिवाटीची असुन सदर मिळकत त्यांनी १) श्री. संजय दत्ताजीराव शिंदे, रा. सि.स.नं. ४०४, निर्माण विवा सोसायटी, आंबेगाव बु॥, पुणे ४११०४६, २) श्री. राजेंद्र वसंतराव घाटगे, रा. बी १४ / १, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१** यांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्यास भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही बक्षिस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इ. कोणत्याही स्वरुपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी पुणे/तहसिलदार कार्यालय पुरंदर मुळ कागदपत्रानिशी खात्री पटवनु द्यावी अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ती जाणीवपुर्वक सोडुन दिलेले आहेत असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेणेत यावी. जमीन विक्रीकामी जमीन मालक यांनी विकी परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ते **१) श्री. संजय दत्ताजीराव शिंदे, रा. सि. स.नं. ४०४, निर्माण विवा सोसायटी, आंबेगाव बु॥, पुणे ४११०४६, २) श्री.राजेंद्र वसंतराव घाटगे, रा.बी १४/१, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१ यांना उक्ती रक्कम रुपये ७,३०,००० /- रुपये फक्तला विक्री करणार आहेत.** महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ चे कलम २९ व महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे अतिरिक्त जमिनीचे वाटप ) आणि (सुधारणा नियम १९७५) व सुधारणा नियम (२००१) प्रमाणे दिलेल्या सुचनेनुसार गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किंमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरुपात १५ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय यांना कळवावे.

**परिशिष्ट**

जिल्हा पुणे तालुका पुरंदर गाव / ग्रामपंचायत पांडेश्वर येथील मिळकतीचे वर्णन :- **गट नं. ७७४ यांसी क्षेत्र १४ हे. ९८ आर, पो.ख.००हे.२० आर यांसी आकार १३ रू.९४ पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०० हे. ४६आर, पो.ख. ००हे. ०२आर अशी एकुण पोखसह ०० हे.४८** आर संपुर्ण मिळकत यांसी चतु:सिमा:- पुर्व पश्चिम गट नंबर ७६६ व ७६७, उत्तर-पांडेश्वर आंबेगाव शिव, दक्षिण- गट नंबर ७७२ व ७७३,गट नंबर ७५०.

सही/-
अ‍ॅड. बाबास नामदेव पिलाणे
बी.ए.एल.एल.बी.अ‍ॅडव्होकेट
(मो. ९८५०८१०५८९)
ऑफिस : उद्यम बीजहब, ऑफिस नं. ३०४,
तिसरा मजला, जेजुरी नाका, सासवड,
ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०१

---

**जाहिर प्रसिध्दी**

तमाम लोकांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीची (सिलींग कायद्यानुसार) मिळकत ही **श्री. जालिंदर शंकर खरात, रा. नाझरे सुपे, ता. पुरंदर, जि. पुणे यांच्या मालकी व ताबे वहिवाटीची असुन सदर मिळकत त्यांनी १) श्री. संजय दत्ताजीराव शिंदे, रा. सि.स.नं. ४०४, निर्माण विवा सोसायटी, आंबेगाव बु॥, पुणे ४११०४६, २) श्री. राजेंद्र वसंतराव घाटगे, रा. बी १४/१, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१** यांना कायम खुपखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्यास भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही बक्षिस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इ. कोणत्याही स्वरुपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी पुणे/तहसिलदार कार्यालय पुरंदर मुळ कागदपत्रानिशी खात्री पटवनु द्यावी अन्यथा - सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ती जाणीवपुर्वक सोडुन दिलेले आहेत. असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेणेत यावी. जमीन विक्रीकामी जमीन मालक यांनी विकी परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ते **१) श्री. संजय दत्ताजीराव शिंदे, रा. सि. स.नं. ४०४, निर्माण विवा सोसायटी, आंबेगाव बु॥, पुणे ४११०४६, २) श्री. राजेंद्र वसंतराव घाटगे, रा. बी १४/१, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१ यांना उक्ती रक्कम रुपये ७,३०,००० /- रुपये फक्तला विक्री करणार आहेत.** महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ चे कलम २९ व महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे अतिरिक्त जमिनीचे वाटप ) आणि (सुधारणा नियम १९७५) व सुधारणा नियम (२००१) प्रमाणे दिलेल्या सुचनेनुसार गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किंमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरुपात १५ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय / जिल्हाधिकारी कार्यालय यांना कळवावे.

**परिशिष्ट**

जिल्हा पुणे तालुका पुरंदर गाव / ग्रामपंचायत पांडेश्वर येथील मिळकतीचे वर्णन गट नं. ७७४ यांसी क्षेत्र १४ हे. ९८ आर, पो.ख. ००हे. २० आर यांसी आकार १३ रू. ९४ पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ००हे. ४६ आर, पो.ख. ००. ०९आर अशी एकुण पोखसह ०० हे. ४७आर संपुर्ण मिळकत यांसी चतु:सिमा:- पुर्व - पांडेश्वर आंबेगाव शिव, दक्षिण- गट नंबर ७७२ व ७७३, पश्चिम -गट नंबर ७६६ व ७६७ उत्तर - गट नंबर ७५०.

सही/-
अ‍ॅड. बाबास नामदेव पिलाणे
बी.ए.एल.एल.बी.अ‍ॅडव्होकेट
(मो. ९८५०८१०५८९)
ऑफिस : उद्यम बीजहब, ऑफिस नं. ३०४,
तिसरा मजला, जेजुरी नाका, सासवड,
ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०१

---

**जाहिर प्रसिध्दी**

तमाम लोकांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीची (सिलींग कायद्यानुसार) मिळकत ही **१) श्री. रविंद्र आत्माराम दाते, रा. रामदास नगर, चिखली बु॥, पुणे, २) सौ. नंदा दत्तात्रय कुंभार, रा. छाया निवास, पहिला मजला, रोड नं. १६, टी.एस.सी. शाळेमागे, किसननगर, ठाणे, ३) सौ. मंदा रमेश शिरसे, रा. कुंभारवाडा, ९९०, कसबा पेठ, पुणे, व ४) सौ. संगिता शंकर जमादार, रा. रामदास नगर, चिखली बु॥, पुणे यांच्या मालकी व ताबे वहिवाटीची असुन सदर मिळकत त्यांनी १) श्री. संजय दत्ताजीराव शिंदे, रा. सि.स.नं. ४०४, निर्माण विवा सोसायटी, आंबेगाव बु॥, पुणे ४११०४६, २) श्री. राजेंद्र वसंतराव घाटगे, रा. बी १४/१, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१** यांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्यास भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही बक्षिस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इ. कोणत्याही स्वरुपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी पुणे/तहसिलदार कार्यालय पुरंदर मुळ कागदपत्रानिशी खात्री पटवनु द्यावी अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ती जाणीवपुर्वक सोडुन दिलेले आहेत असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेणेत यावी. जमीन विक्रीकामी जमीन मालक यांनी विकी परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ते **१) श्री. संजय दत्ताजीराव शिंदे, रा. सि.स.नं. ४०४, निर्माण विवा सोसायटी, आंबेगाव बु॥, पुणे ४११०४६, २) श्री. राजेंद्र वसंतराव घाटगे, रा. बी १४/१, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१ यांना उक्ती रक्कम रुपये शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) ७,३०,०००/- रुपये फक्तला विक्री करणार आहेत.** महाराष्ट्र अधिनियम १९६१ चे कलम २९ व महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे अतिरिक्त जमिनीचे वाटप) आणि (सुधारणा नियम १९७५) व सुधारणा नियम (२००१) प्रमाणे दिलेल्या सुचनेनुसार गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किंमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरुपात १५ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय / जिल्हाधिकारी कार्यालय यांना कळवावे.

**परिशिष्ट**

जिल्हा पुणे तालुका पुरंदर गाव / ग्रामपंचायत पांडेश्वर येथील मिळकतीचे वर्णन :- गट नं. ७७४ यांसी क्षेत्र १४ हे. ९८ आर, पो.ख. ००हे. २० आर यांसी आकार १३ रू. ९४ पैसे या मिळकतीपैकी क्षेत्र ०० हे. ४६ आर, पो.ख. ००हे. ०१आर अशी एकुण पोखसह ०० हे. ४७ आर संपुर्ण मिळकत यांसी चतु:सिमा :- पुर्व -पांडेश्वर आंबेगाव शिव, दक्षिण- गट नंबर ७७२ व ७७३, पश्चिम- गट नंबर ७६६ व ७६७ उत्तर - गट नंबर ७५०.

सही/-
अ‍ॅड. बाबास नामदेव पिलाणे
बी.ए.एल.एल.बी.अ‍ॅडव्होकेट
(मो. ९८५०८१०५८९)
ऑफिस : उद्यम बीजहब, ऑफिस नं. ३०४,
तिसरा मजला, जेजुरी नाका, सासवड,
ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०१

---

**जाहिर प्रसिध्दी**

तमाम लोकांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीची (सिलींग कायद्यानुसार) मिळकत ही **श्री. महेश विठ्ठल बेल्हेकर, रा. बेल्हेकर ( वस्ती), मांजरी बु॥, पुणे यांच्या मालकी व ताबे वहिवाटीची असुन सदर मिळकत त्यांनी १) श्री. विश्वजीत संजय शिंदे, रा. मळनगाव, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली, २) श्री. उत्कर्ष राजेंद्र घाटगे, रा. बी १४ / १, मीरानगर गार्डन सोसायटी, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१** यांना कायम खुषखरेदी देण्याचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्यास भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीवर कोणत्याही बक्षिस, गहाण, दान, लीन, लीज, पोटगी, चोळीबांगडी, खरेदी, साठेखत, करार-मदार, कुळ वहिवाट, इसारपावती इ. कोणत्याही स्वरुपाचा हक्कसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसांचे आत जिल्हाधिकारी पुणे/तहसिलदार कार्यालय पुरंदर मुळ कागदपत्रानिशी खात्री पटवनु द्यावी अन्यथा सदर मिळकतीत असे कोणाचेही हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ती जाणीवपुर्वक सोडुन दिलेले आहेत असे समजुन सदरचा व्यवहार पुर्ण करणेत येईल व नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घेणेत यावी. जमीन विक्रीकामी जमीन मालक यांनी विकी परवानगी मागितलेली आहे. सदरची जमीन ते **१) श्री. विश्वजीत संजय शिंदे, रा. मळनगाव, ता. कवठेमहाकाळ, जि. सांगली, व २) श्री. उत्कर्ष राजेंद्र घाटगे यांना उक्ती रक्कम रुपये १५,५०,०००/- रुपये फक्तला विक्री करणार आहेत.** महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ चे कलम २९ व महाराष्ट्र शेतजमिन (जमीन धारणेची कमाल मर्यादा कमी करणे अतिरिक्त जमिनीचे वाटप) आणि (सुधारणा नियम १९७५) व सुधारणा नियम (२००१) प्रमाणे दिलेल्या सुचनेनुसार गावाच्या ५ किलोमीटर परिसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किंमतीस खरेदी घेणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरुपात १५ दिवसांच्या आत तहसिल कार्यालय/जिल्हाधिकारी कार्यालय यांना कळवावे.

**परिशिष्ट**

जिल्हा पुणे तालुका पुरंदर गाव/ग्रामपंचायत पांडेश्वर येथील मिळकतीचे वर्णन :- **गट नं. ८६५ यांसी क्षेत्र ०९ हे. ८६ आर, पो.ख. ०० हे. ४३ आर यांसी आकार ०८ रू. ६९ पैसे** येणेप्रमाणे शेतजमिन मिळकतीपैकी क्षेत्र ०१ हे. ०२ आर मिळकत चतु:सिमा:- पुर्व-याच गटातील उर्वरित क्षेत्र, दक्षिण - पांडेश्वर सुपा रस्ता व त्यानंतर गटातील उर्वरित क्षेत्र, पश्चिम पांडेश्वर राजुरी रस्ता, उत्तर -याच गटातील उर्वरित क्षेत्र.

सही/-
अ‍ॅड. बाबास नामदेव पिलाणे
बी.ए.एल.एल.बी.अ‍ॅडव्होकेट
(मो. ९८५०८१०५८९)
ऑफिस : उद्यम बीजहब, ऑफिस नं. ३०४,
तिसरा मजला, जेजुरी नाका, सासवड,
ता. पुरंदर, जि. पुणे - ४१२३०१

---

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय**

**जाहीर प्रसिध्दकरण** — **जा.क्र.फौज/कावि/११०२/२०२५**
**दिनांक १५-०४-२०२६**

**१) अमजद बाबुलाल बागवान**
रा. इंदापूर ता. इंदापूर जि.पुणे — अर्जदार
विरुध्द
१) ग्रामसेवक/निबंधक
न.पा. इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे — सामनेवाला

विषय: जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३(२)(३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार अमजद बाबुलाल बागवान हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार अमजद बाबुलाल बागवान यांचा जन्म दिनांक ०७-०३-१९७९ रोजी मौजे न.पा. इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे येथील अर्जदार यांच्या राहत्या घरी/दवाखान्यात झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म रजिस्टरला नोंद नसल्यामुळे त्यांनी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२)(३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख-१८-०५-२०२६ रोजीपर्यंत स्वत: अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक-१५-०४-२०२६ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे

ठिकाण:-बारामती
दिनांका १५-०४-२०२६

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती

---

**जाहिर समंस**
नमुना क्रमांक २
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड
श्री. वसंत एस. यादव यांचे न्यायालयात
८वे सह दिवाणी न्यायाधीश वस्तर बीड, बीड, बीड.

सम विवाह अर्ज/८९/२०२५

यादप्रांच्या निधीसाठी
(आज्ञावली ५, नियम १५)

जयश्री भाऊसाहेब जाधव उर्फ जयश्री पि सुखदेव खामकर
वि.भाऊसाहेब दत्तात्रय जाधव पुढिल
तारिख ०८.०५.२०२६

प्रति,
भाऊसाहेब दत्तात्रय जाधव
कुंजरवाडी ता.हवेली जि.पुणे, PUNE, MAHARASHTRA

ज्याअर्थी **जयश्री भ्र भाऊसाहेब जाधव उर्फ जयश्री पि सुखदेव खामकर,** यांनी तुमच्याविरुध्द बद्यल दावा दाखल केला आहे; म्हणून सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी **०८-०५-२०२६** रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयात जातीने किंवा ज्यास यथायोग्य सूचना दिलेल्या असून जो दाव्यासंबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा किंवा अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकणारी व्यक्ती ज्यांच्याबरोबर असेल अशा वकिलामार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोल-ावण्यात येत आहे आणि उक्त दिवशी तुमच्या बचावाचे प्रतिवादपत्र दाखल करण्याचा आणि तुमचा बचाव किंवा वजावटीची हममागणी किंवा प्रतिहनागणी ज्यांच्यावर आधारलेली असेल असे तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेले सर्व दस्तऐवज हजर करण्याचा निदेश तुम्हाला याद्वारे देण्यात येत आहे आणि तुमच्या बचावाच्या किंवा हकमानजीच्या पुष्टयर्थ पुरावा म्हणून तुम्ही तुमच्या कब्जात किंवा अखत्यारात असलेल्या किंवा नसलेल्या अशा अन्य कोणत्याही दस्तऐवजांवर अवलंबून असाल त्याबाबतीत, तुम्ही प्रतिवादपत्रासोबत जोडावयाच्या यादीमध्ये अशा दस्तऐवजांची नोंद केली पाहिजे.

यापुर्वी नमूद केलेल्या दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास, तुमच्या गैरहजेरीत दाव्याची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज ०८.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**८वे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर**
**बीड**

---

**जाहीर निविदा**
ग्रामपंचायत तिरपाड (तालुका आंबेगाव) जि. पुणे निविदा
निविदा नोटिस क्र.१ सन २०२६-२७

ग्रामपंचायत तिरपाड (तालुका आंबेगाव) जि.पुणे खालील कामाचे सीलबंद निविदा योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून (तीन पाकिटे) बंद लिफाफा पद्धतीने मागवत आहोत. को-या निविदा मा. सरपंच ग्रामपंचायत तिरपाड (तालुका आंबेगाव) जि.पुणे यांच्या कार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सुट्टीचे दिवस वगळता दि.१७/०४/२०२६ ते दि.२१/०४/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत देण्यात येतील. व भरून पाठवलेल्या मोहोरबंद निविदा/दरपत्रक सुट्टीचे दिवस वगळता दि.१७/०४/२०२६ ते दि.२१/०४/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. दि.२२/०४/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता किंवा तदनंतर त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडल्या जातील.

१) कोणत्याही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर आगर नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कडे राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रू. | टेंडर फी रू. | कंत्राटदार वर्ग | निविदा प्रकार | कामाची मुदत | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत तिरपाड येथे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प काम करणे | ४,१९,०३५/- | १% | ५००/- | खुला | बी १ | ६ महिने | स्वच्छ भारत अभियान व ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग |

२) को-या निविदा नमुन्याची रक्कम चलनाने ग्रामपंचायत तिरपाड ता. आंबेगाव यांचे कार्यालयात भरून उपलब्ध होतील.
३) अनामत रक्कम रोख स्वरुपात चलनाने, धनादेशने, डिमांड ड्राफ्ट अथवा एफ डी स्वरुपात भरावी.
४) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
५) कामाच्या अटी व शर्थीचा तपशील को-या निविदा संचासोबत प्राप्त होतील.
६) दरपत्रक स्वीकृतीनंतर तक्रार हरकत विचारात घेतली जाणार नाही.
७) उपरोक्त नमूद मुदतीनंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत तिरपाड
ता. आंबेगाव जि पुणे

सरपंच
ग्रामपंचायत तिरपाड
ता.आंबेगाव जि. पुणे

---

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय**

**जाहीर प्रसिध्दकरण** — **जा.क्र. फौज/कावि/११०१/२०२५**
**दिनांक- १५-०४-२०२६**

**१) नर्गिस तय्यबभाई बागवान**
रा.इंदापूर ता.इंदापूर जि.पुणे — अर्जदार
विरुध्द
१) ग्रामसेवक/निबंधक
न.पा.इंदापूर ता.इंदापूर जि.पुणे — सामनेवाला

विषय: जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२)(३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार नर्गिस तय्यबभाई बागवान हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार नर्गिस तय्यबभाई बागवान यांचा जन्म दिनांक ०३-०१-१९८४ रोजी मौजे न.पा. इंदापूर ता.इंदापूर जि.पुणे येथील अर्जदार यांच्या राहत्या घरी/दवाखान्यात झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म रजिस्टरला नोंद नसल्यामुळे त्यांनी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२)(३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख-१८-०५-२०२६ रोजीपर्यंत स्वत: अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक-१५-०४-२०२६ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे.

ठिकाण:-बारामती
दिनांक:- १५-०४-२०२६

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती

---

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती यांचे कार्यालय**

**जाहीर प्रसिध्दकरण** — **जा.क्र. फौज/कावि/११००/२०२५**
**दिनांक- १५-०४-२०२६**

**१) अस्लम तय्यबभाई बागवान**
रा.इंदापूर ता.इंदापूर जि.पुणे — अर्जदार
विरुध्द
१) ग्रामसेवक/निबंधक
न.पा.इंदापूर ता.इंदापूर जि.पुणे — सामनेवाला

विषय: जन्म-मृत्यु नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ कलम १३ (२)(३) प्रमाणे अर्ज

ज्याअर्थी, यातील अर्जदार अस्लम तय्यबभाई बागवान हे वर नमूद पत्त्यावरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार अस्लम तय्यबभाई बागवान यांचा जन्म दिनांक २१-०५-१९७४ रोजी मौजे न.पा. इंदापूर ता. इंदापूर जि. पुणे येथील अर्जदार यांच्या राहत्या घरी/दवाखान्यात झालेला आहे. अर्जदार यांची कार्यालयात जन्म रजिस्टरला नोंद नसल्यामुळे त्यांनी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२)(३) प्रमाणे नोंद होऊन जन्म दाखला दाखला मिळण्याकामी विनंती केली आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांना जन्म दाखला मिळणेकामी कोणाची काही हरकत अथवा म्हणने असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत किंवा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, बारामती या कार्यालयात नेमलेली तारीख-१८-०५-२०२६ रोजीपर्यंत स्वत: अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहून आपले म्हणने मांडावे. कोणाचीही काही हरकत अथवा म्हणने मुदतीत न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजुन या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला घेण्यात येईल.

सदरचे जाहिर प्रसिध्दीकरण आज दिनांक-१५-०४-२०२६ रोजी आमचे सही शिक्याने प्रसिध्द केले असे

ठिकाण:-बारामती
दिनांक:- १५-०४-२०२६

शिक्का

सही/-
उपविभागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी बारामती

---

पुणे महानगरपालिका

**भवन रचना विभाग**
**निविदा प्रक्रिया कक्ष**
**निविदा जाहिरात फेर निविदा कामे**
**पुणे महानगरपालिका**

पुणे अद्वितीय & Unique

विक्री कालावधी दि :-१७/०४/२०२६ दु.२.३० वाजेनंतर ते २७/०४/२०२६ दु.०२.३० वाजेपर्यंत.
स्वीकृती दिनांक :-१७/०४/२०२६ दु.२.३० वाजेनंतर ते २७/०४/२०२६ दु.०२.३० वाजेपर्यंत.
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :-२८/०४/२०२६ दु.०३.०० वा.

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रुपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पी.एम.सी/भवन /२७०/२०२५-२६ | भवन रचना विभाग | पुणे मेन कोथरूड यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची दुरुस्ती विषयक कामे करणे. | २२७९८५६३ | १५०००० | ६ महिने (पावसाळा कालावधीसह) | ११९७९ | श्री.संग्राम पाटील ८४८३९२२१५३ |

जाहिरात क्र.२/१८४२ दि.२४/०३/२०२६ रोजीच्या यापूर्वी मजकूर हा वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेला आहे.

जाहिरात क्र. : २/४३
दिनांक :- १६/०४/२०२६

सही/-
कार्यकारी अभियंता
भवन रचना विभाग
पुणे महानगरपालिका

# उद्योगस्नेही वातावरणामुळे राज्यात उद्योगांचे नवे पर्व : मुख्यमंत्री फडणवीस

## श्याम स्टील आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूहाची राज्यात गुंतवणूक

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यात गुंतवणूक येऊन त्याचे उद्योगात रूपांतर करण्यासाठी अनेक धोरणात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत. राज्य शासन महाराष्ट्रामध्ये उद्योग उभारण्यासाठी गुंतवणूकदारांना पुरेपूर सहकार्य करीत आहे. त्यामुळे राज्यामध्ये सद्यस्थितीत उद्योगांचे नवे पर्व सुरू झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. श्याम स्टील आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूह राज्यात करीत असलेली गुंतवणूक त्याचे मूर्तीमंत उदाहरण असल्याचे सांगितले. राज्यात गुंतवणुकीसाठी येत असलेल्या उद्योग समूहांना राज्य शासन सर्व सहकार्य करीत आहे, गुंतवणूकदारांनी राज्यात गुंतवणुकीसाठी यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

उद्योग विभागासोबत श्याम स्टील उद्योग आणि जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूहाने राज्यात गुंतवणुकीसाठी वर्षा निवासस्थानी आयोजित बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यात गुंतवणुकीसाठी स्वारस्य दाखविलेल्या उद्योग समूहांना प्रत्यक्षपणे उद्योग सुरू करण्यास सुटसुटीत प्रक्रिया करण्यात आली आहे. राज्यात शाश्वत ऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये जेडब्ल्यू ग्लोबल च्या माध्यमातून गुंतवणूक येत आहे. केंद्र शासनाने सिव्हिल न्यूक्लिअर एनर्जी क्षेत्रामध्ये गुंतवणुकीला परवानगी दिली आहे. त्यानुसार राज्याने ' स्मॉल मॉड्युलर न्यूक्लिअर रिक्टर ' मध्ये गुंतवणूक करण्यास देशात पुढाकार घेतला असून यासाठी दोन सामंजस्य करारही करण्यात आले आहेत. राज्याच्या कुठल्याही भागामध्ये गुंतवणूक करण्यास स्वारस्य दाखवल्यास राज्य शासन सबंधित उद्योग समूहाला पुरेपूर सहकार्य करेल.

पश्चिम बंगालमधील श्याम स्टील उद्योग समूह चंद्रपूर जिल्ह्यात गोडपिंपरी तालुक्यामध्ये दहा हजार कोटीची गुंतवणूक करून स्टील उद्योग उभारत आहे. या माध्यमातून जवळपास ८ हजार पेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच जेडब्ल्यू ग्लोबल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड कंपनी राज्यात जवळपास एक लाख ६५ हजार कोटींची गुंतवणूक करीत आहे. सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणात फ्लोटिंग सोलर पावर अँड एनर्जी स्टोरेज च्या माध्यमातून कंपनी १४ हजार ९७६ कोटींची गुंतवणूक करीत असून त्यामुळे कायमस्वरूपी ५०० रोजगार निर्मिती होणार आहे. तसेच शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता कॅम्पस आणि डाटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन प्रकल्प, स्मॉल मॉड्युलर न्यूक्लिअर रिऍक्टर या क्षेत्रात जेडब्ल्यू ग्लोबल उद्योग समूह गुंतवणूक करीत आहे. या संपूर्ण गुंतवणुकीमुळे राज्यात जवळपास ३ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. बैठकीस उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बळगण, उद्योग विभागाचे सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, मुख्यमंत्री यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, श्याम स्टील उद्योग समूहाचे अध्यक्ष पुरुषोत्तम बेरीवाला, व्यवस्थापकीय संचालक सिद्धार्थ बेरिवाला, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राणा, जेडब्ल्यू उद्योग समूहाचे अध्यक्ष जयदीप वानखेडे, व्यवस्थापकीय संचालक ख्रिस्ती रेनेहान, संचालक संजय वाजे, अतुल गुप्ता, थॉमस पुर्दी आदी उपस्थित होते.

# शिधावाटप भरारी पथकाची डोमिनोज पिझ्झा स्टोअरवर धाड

## ४.५९ लाखांचा सिलेंडर साठा जप्त; एक आरोपी ताब्यात

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : शिधावाटप भरारी पथकाने मोठी कारवाई करत ठाण्यातील वंडर मॉल परिसरातील डोमिनोज पिझ्झा स्टोअरवर धाड टाकून ४.५९ लाखांचा सिलेंडर साठा जप्त केल्याची माहिती नियंत्रक शिधावाटप कार्यालयामार्फत देण्यात आली आहे. धाडीदरम्यान स्टोअरच्या तळघरात विविध तेल कंपन्यांचे सिलेंडर मोठ्या प्रमाणात साठवून ठेवलेले आढळले. यामध्ये एचपीसीएल, बीपीसीएल, आयओसी आणि गो गॅस कंपनीचे एकूण १४० सिलेंडर जप्त करण्यात आले. त्यापैकी ५५ सिलेंडर भरलेले तर ८५ सिलेंडर रिकामे असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

जप्त करण्यात आलेल्या सिलेंडरची एकूण किंमत ४ लाख ५९ हजार ४०० रुपये इतकी असून हा संपूर्ण मुद्देमाल सीलबंद करण्यात आला आहे. ही कारवाई अवैध साठा व नियमबाह्य वापराच्या संशयावरून करण्यात आली. या प्रकरणात एक आरोपीला अटक करण्यात आली असून त्याला चितळसर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. संबंधिताविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ अंतर्गत गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू आहे.

नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, चर्चगेट यांच्या आदेशानुसार तसेच उपनियंत्रक शिधावाटप फ' परिमंडळ, ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईत भरारी पथकातील अधिकारी, शिधावाटप कार्यालय क्र. ४१ फ' ठाणे येथील कर्मचारी तसेच पोलिस अधिकारी सहभागी होते. व्यावसायिक ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा गैरवापर आणि बेकायदेशीर साठा रोखण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून कडक पावले उचलली जात आहे.

# जागतिक स्तरावर महाराष्ट्राच्या पर्यटनाचे ब्रॅंडिंग करणार : पर्यटन मंत्री शंभूराज देसाई

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : महाराष्ट्र राज्याच्या पर्यटन स्थळांची देश-विदेशात व्यापक प्रचार आणि प्रसिद्धी करण्यासाठी पर्यटन विभागाने सर्वसमावेशक 'ब्रॅंडिंग आणि मार्केटिंग प्लॅन' तयार केला आहे यामुळे जागतिक स्तरावर महाराष्ट्राचे ब्रॅंडींग होणार आहे. हा आराखडा अधिक सर्वसमावेशक करण्याचे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृहात पर्यटन विभागाच्या मीडिया प्लॅनसंदर्भात आयोजित बैठकीत पर्यटन मंत्री शंभूराज देसाई बोलत होते. यावेळी पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक डॉ. बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, पर्यटन विभागाचे सहसंचालक संतोष जाधव यावेळी उपस्थित होते.

पर्यटन मंत्री शंभूराज देसाई म्हणाले की, राज्यातील ऐतिहासिक वास्तू, गड-किल्ले, समुद्रकिनारे, तीर्थक्षेत्र, आरोग्य, जंगले व प्रसिध्द ठिकाणे, हंगामी पर्यटन, खाद्यसंस्कृती, लोकसंस्कृती अशा प्रत्येक घटकातील पर्यटन स्थळांची माहिती आधुनिक माध्यमांतून लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ब्रॅंडिग करण्यात यावे. यासाठी डिजिटल मीडिया, वृत्तपत्रे आणि इतर माध्यमांचा प्रभावी वापर करून पर्यटकांची संख्या वाढली पाहिजे या दृष्टीने प्रसत्न करण्यात यावेत. या मीडिया प्लॅनमध्ये पर्यटन विभागामार्फत २०२६-२७ या आर्थिक वर्षात नियोजित असलेल्या तरतुदीतून जागतिक, आंतरराज्य व राज्यात पर्यटन विभागाचा सर्वसमावेशक आराखडा तयार आहे.

# महिला सुरक्षेसाठी यंत्रणा अधिक मजबूत करण्याचे : उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांचे निर्देश

## सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करण्यासाठी मानक कार्यपद्धती तयार होणार

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : राज्यातील महिला सुरक्षेशी संबंधित शासकीय यंत्रणा आणि सामाजिक संस्थांमध्ये अधिक प्रभावी समन्वय साधून महिलांना तातडीने न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत यंत्रणा अधिक सक्षम करण्याचे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. भरोसा सेल, कौटुंबिक संरक्षण अधिकारी आणि समुपदेशन केंद्र यांच्या सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी मानक कार्यपद्धती तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

महिला सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या वन स्टॉप क्रायसिस सेंटर (सखी केंद्र) तसेच शासकीय महिला आधारगृहांमधील सेवांचा, सखी केंद्रे आणि महिला आधारगृहांमधील निवारा, कायदेशीर मदत, समुपदेशन आणि कौशल्य प्रशिक्षण या सेवांचा सविस्तर आढावा घेण्यासाठी विधानभवनात डॉ. गोऱ्हे अध्यक्षतेखाली बैठक झाली.

या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे सहसचिव बागुल, अवर सचिव शिंदे, महिला व बाल विकास विभागाचे उपायुक्त राहुल मोरे, महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या अध्यक्षा शारदा साठे, स्त्री आधार केंद्राच्या विश्वस्त झेलम जोशी, स्त्री मुक्ती परिषदेच्या सदस्य तृप्ती पंचाल, केरकर, तनेजा, कोलीटकर तसेच महिला आयोगाच्या माजी सदस्या संगीता चव्हाण आदी उपस्थित होते.

उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, संकटग्रस्त महिलांना संरक्षण, न्याय आणि विविध शासकीय योजनांचा लाभ वेळेवर मिळावा यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. महिला व बालविकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व सेवा एकत्रित स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे.


राज्याच्या चौथ्या महिला धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीद्वारे महिलांच्या अनेक समस्यांचे निराकरण होऊ शकते. राज्यभर सखी केंद्रे व महिला आधारगृहांमध्ये एकसमान आणि परिणामकारक सेवा प्रणाली विकसित करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

बैठकीत सेवाभावी संस्थांची नोंदणी प्रक्रिया सुलभ करणे, न्यायालयीन प्रकरणांवर आधारित महिलांना योजनांचा लाभ देणे, कौटुंबिक सल्ला व समुपदेशन केंद्रांना अनुदान वाढविणे तसेच पोलीस ठाण्यांतील स्पेशल सेलच्या समुपदेशकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

कौटुंबिक हिंसाचार प्रकरणांमध्ये सर्विस प्रोव्हायडर' नोंदणी व्यवस्था पुढील तीन महिन्यांत पुन्हा सुरू करावी. तसेच, वन स्टॉप क्रायसिस सेंटरच्या कामकाजाचा नियमित आढावा घ्यावा

# राज्यात उष्णतेचा लाटेचा इशारा; नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी : राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे आवाहन

जनप्रवास : प्रतिनिधी




मुंबई : राज्यात पुढील काही दिवसांत उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. विविध भागांमध्ये तापमान लक्षणीय वाढण्याची शक्यता असून नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी असे आवाहन राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने केले आहे.

मध्य महाराष्ट्रात १५ ते १८ एप्रिलदरम्यान, मराठवाड्यात १६ ते १८ एप्रिलदरम्यान, विदर्भात १५ ते १९ एप्रिलदरम्यान तर कोकणात १५ ते १७ एप्रिलदरम्यान काही ठिकाणी उष्ण व दमट हवामान राहण्याची शक्यता असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे,

उष्णतेपासून बचावासाठी नागरिकांनी भरपूर पाणी व ओआरएस घ्यावे, हलके व सैल कपडे वापरावेत तसेच बाहेर जाताना टोपी किंवा छत्रीचा वापर करावा. सावलीत विश्रांती घेणे व घरात राहण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. विशेषतः जेष्ठ नागरिक व मुलांची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हात जाणे टाळावे, मद्यपान व कॅफिनयुक्त पेये टाळावीत आणि उष्णतेच्या तीव्रतेत जास्त काम करणे टाळावे. लहान मुले किंवा प्राण्यांना उन्हात पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये, असेही प्रसिद्धीपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय करणे, जिल्हास्तरावर उष्णता रोधक आराखडा कार्यान्वित करणे तसेच रुग्णालयांत आवश्यक औषध साठा ठेवणे यावर भर दिला आहे. शाळांना सूचना देणे, गरजेनुसार वेळेत बदल करणे आणि माध्यमांद्वारे जनजागृती करणे यासंदर्भातही उपाययोजना करण्यात येत आहेत.

जनसमूहाच्या कार्यक्रमांसाठी सावली व पाण्याची सोय करावी, वैद्यकीय मदत व ओआरएस उपलब्ध ठेवावे तसेच कार्यक्रमाचा वेळ शक्यतो बदलावी, असे सांगण्यात आले आहे. कामगार, शेतकरी व बाहेर काम करणाऱ्यांनी सकाळी किंवा संध्याकाळी काम करावे, नियमित पाणी प्यावे, विश्रांती घ्यावी आणि उष्माघाताची लक्षणे लक्षात ठेवावीत.

नागरिक, स्थानिक संस्था व उद्योग क्षेत्राने

# आंतरराष्ट्रीय सहकार्य अधिक बळकट करण्यावर भर : राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : परस्पर आंतरराष्ट्रीय संबंध दृढ करण्यासाठी सर्व देशांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले. स्वीडनचे महावाणिज्यदूत स्वेन ओस्टबर्ग यांची कौन्सिल ऑफ कॉर्प्स असोसिएशन ऑफ मुंबई'चे नवे डीन म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल जागतिक व्यापार केंद्र येथे आयोजित कार्यक्रमात राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते त्यांचा आणि नव्या कार्यकारिणीचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. जागतिक व्यापार केंद्राचे अध्यक्ष विजय कलंत्री यांच्यासह विविध देशांचे महावाणिज्यदूत यावेळी उपस्थित होते.

राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल म्हणाले, मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात कार्यरत वाणिज्यदूतांच्या माध्यमातून व्यापार वृद्धी, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि लोकांमधील संबंध अधिक दृढ होण्यास मोठी मदत होत आहे. कौन्सिल ऑफ कॉर्प्स' ही संस्था या सर्व प्रयत्नांना दिशा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. महाराष्ट्र शासन राजनैतिक समुदायाशी अधिक दृढ संवाद आणि सहकार्य वाढविण्यास कटिबद्ध असल्याचे सांगताना, विविध क्षेत्रांमध्ये सहकार्याच्या नव्या संधी निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जागतिक पातळीवर शांतता, प्रगती आणि सहकार्य यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असून कौन्सिल ऑफ कॉर्प्स'सारख्या संस्थांमुळे हा उद्देश साध्य होऊ शकतो, असे मत व्यक्त करत मंत्री रावल यांनी सर्वांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.


# कला विश्व

## त्याने मला चुकीच्या पद्धतीने, बॉलीवूड अभिनेत्रीबरोबर दिग्दर्शकाने केलेले गैरवर्तन



मनोरंजन क्षेत्रात काम करताना अनेक स्त्री कलाकारांना विविध वाईट आणि कठीण प्रसंगातून जावं लागतं. अनेकींना इंडस्ट्रीत कास्टिंग काऊचसारख्या घटनांनाही सामोरं जावं लागलं आहे. याबद्दल अनेक अभिनेत्री आता पुढे येऊन मुलाखतींमधून व्यक्त होताना दिसतात. अशातच बॉलीवूडच्या अभिनेत्रीनेही तिच्याबरोबरचा एक वाईट प्रसंग शेअर केला आहे. ही अभिनेत्री म्हणजे डेझी शाह. दाक्षिणात्य मनोरंजन सृष्टीतल्या एका दिग्दर्शकाने कास्टिंगच्या बहाण्याने तिच्याशी गैरवर्तन केल्याचे तिने सांगितले. दिलेल्या मुलाखतीत डेझीने तिच्याबरोबरचा प्रसंग सांगितला. डेझीने खुलासा केला की, हा दिग्दर्शक ऑडिशनसाठी मुंबईत आला होता आणि अनेक अभिनेत्री त्याला भेटण्यासाठी जमल्या होत्या. डेझी म्हणाली, एका दाक्षिणात्य दिग्दर्शकाने मला चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला होता. तो कास्टिंगसाठी मुंबईत आला होता आणि आम्ही ६-७ मुली त्याला भेटायला गेलो होतो. तो प्रत्येकीला वैयक्तिकरित्या भेटत होता. मला भेटल्यानंतर त्याने ज्याप्रकारे माझा हात पकडला आणि मला स्पर्श केला, ते मला अजिबातच आवडलं नाही. ती पुढे म्हणाली, मला कोणीही स्पर्श केलेला आवडत नाही. अगदी महिलांकडून मसाज करून घेणेही मला आवडत नाही, तिथे पुरुषाचा स्पर्श तर लांबची गोष्ट आहे. त्या प्रकारामुळे मी खूप चिडले होते. मी त्याला कळवते असे सांगितले, पण त्यानंतर मी त्याच्याशी कधीच संपर्क केला नाही. या घटनेने डेझीच्या मनावर मोठा परिणाम केला आणि तिला सुरक्षेबाबत एक महत्त्वाचा धडा मिळाला. त्याबद्दल बोलताना ती म्हणाली, या घटनेने मला शिकवले की, कामाच्या निमित्ताने कोणालाही कधीही एकट्याने भेटू नये. याच मुलाखतीत डेझीने तिच्या करिअरबद्दल होणाऱ्या चर्चे वरही प्रतिक्रिया दिली. 'डेझी शाहचे करिअर फक्त सलमान खानमुळेच सुरू आहे', या टीकेवर ती म्हणाली, जेव्हा एखादी महिला चांगले काम करते, तेव्हा लोकांना वाटते की तिला नक्कीच कोणाचा तरी पाठिंबा आहे. यात काही चुकीचे नाही. आज जर मी कोणाला मदत करत असेल, तर ते यासाठी कारण कधीकाळी मला कोणीतरी मदत केली होती. हे एक चक्र आहे. पण लोक याकडे सकारात्मकतेने पाहत नाहीत. आता मला या गोष्टींचे वाईट वाटत नाही, मला आता अशा टीकेची सवय झाली आहे. दरम्यान, डेझीच्या कामाबद्दल सांगायचं झाल्यास, तिनं अनेक वर्षे बॅकग्राऊंड डान्सर म्हणून काम केलं आहे. नंतर २०११ साली आलेल्या कन्नड चित्रपट 'भद्र'मधून ती अभिनय क्षेत्रात आली. पुढे सलमान खानच्या 'जय हो' चित्रपटात डेझी मुख्य भूमिकेत दिसली. यामुळे तिला भरपूर प्रसिद्धी आणि लोकप्रियता मिळाली. यासह तिने 'हेट स्टोरी ३', 'रेस ३', 'गुजरात ११', 'मिस्ट्री ऑफ द टॅटू' यांसारख्या चित्रपटांमध्येही काम केले आहे.

## जेव्हा स्टेजवर भावूक झाला होता रणवीर सिंग, शाहरुख खानने मिश्किल शैलीत घेतलेलं सावरून!



५ एप्रिल रोजी मुंबईत 'चेतक स्क्रीन अवॉर्ड्स' झाले. त्यानिमित्ताने, २०११ मधील स्क्रीन अवॉर्ड्सच्या एका अविस्मरणीय आठवणीला उजाळा देऊया. १७ व्या स्क्रीन अवॉर्ड्समध्ये रणवीर सिंगच्या करिअरमधील एक महत्त्वाचा क्षण पाहायला मिळाला होता. 'बँड बाजा बारात' या पदार्पणातील चित्रपटासाठी 'मोस्ट प्रॉमिसिंग न्यूकमर' हा पुरस्कार स्वीकारताना रणवीरला आपले अश्रू अनावर झाले होते. रणवीर हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी मंचावर गेला, तेव्हा तिथे करण जोहर, शाहरुख खान आणि शाहिद कपूर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारताना भावुक झालेला रणवीर म्हणाला, मला माफ करा, पण हा क्षण माझ्यासाठी खूप मोठा आहे. मी लहानपणापासून अभिनेता व्हायचं स्वप्न पाहिलं होतं आणि आज या दिग्गज मंडळींसोबत मंच शेअर करताना मला स्वप्नवत वाटत आहे. आदि सर, माझ्यावर विश्वास ठेवल्याबद्दल धन्यवाद. हा पुरस्कार 'बँड बाजा बारात'च्या टीमसाठी आहे. तुम्ही सर्वजण माझ्यासाठी खूप खास आहात. रणवीरचं हे बोलणं ऐकून प्रेक्षकांमध्ये बसलेला सलमान खानही भावूक झाल्याचं दिसून आलं. रणवीर पुढे म्हणालेला, आई, बाबा आणि माझी लाडकी बहीण रितिका-मी जे काही करतो ते फक्त तुम्हाला अभिमान वाटवा म्हणूनच करतो. तुम्हा सर्वांचे खूप खूप आभार. मी तुम्हाला वचन देतो की, भविष्यात मी अजून खूप चांगलं काम करेन. रणवीर सिंग आपलं भाषण संपवून मंचावरून खाली उतरू लागला असतानाच शाहरुख खानने त्याला थांबवलं. आपल्या मिश्किल शैलीत शाहरुखने वातावरण हलकं-फुलकं केलं आणि रणवीरच्या येण्याने चित्रपटसृष्टीतील इतर कलाकारांवर काय परिणाम होईल, याबद्दल गंमत केली. शाहरुख म्हणाला, कुठे चालला आहेस? का रडतोय? आता आम्हाला तुझी गरज आहे. तू इंडस्ट्रीत आल्यावर आता आमचं काय होणार? इकडे ये, आम्हाला मिठी मार, तुझे प्रेम व्यक्त कर. तू खूप चांगला आणि देखणा अभिनेता आहेस. शाहरुख नंतर प्रेक्षकांना आवाहन करत म्हणाला, मंडळी, रणवीरसाठी एकदा जोरदार टाळ्या होऊ द्या. तो आताच्या काळातील सर्वात गुणी अभिनेत्यांपैकी एक आहे. हसत हसत शाहरुख पुढे म्हणाला, मित्रा, माझी एक इच्छा आहे, ती प्लीज पूर्ण कर. शाहिद कपूर आणि करण जोहर सुद्धा हेच विचारत होते. आम्ही बॅकस्टेजला चर्चा करत होतो आम्हाला प्लीज 'ऐंवी ऐंवी' गाण्याची हुक स्टेप आम्हाला शिकव. यानंतर सर्व कलाकारांनी रणवीरला फॉलो करत त्याच्या 'बँड बाजा बारात' या पहिल्या चित्रपटातील प्रसिद्ध डान्स स्टेप्स केल्या.

* मुख्य संपादक - संजय प्रल्हाद भोकरे * संपादक -सिद्धार्थ संजय भोकरे * सरव्यवस्थापक - सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन - ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com